


रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड | शनिवार । दि. २५ जुलै २०२६ । अंक ४९ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in



पाहिजेत

रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे. ठिकाण - सासवणे.

संपर्क : ९६०७१०२३५७


## वे|ध|क



### लालपरीची बस, टेम्पोला मागून धडक

**पोलादपूर** : मुंबई-गोवा महामार्गावर एसटी बस अपघाताचे सातत्य कायम राहिले असून, शुक्रवारी सकाळी ९ वाजता पोलादपूर बस स्थानकातून बोरीवलीकडे जाणाऱ्या लालपरी एसटी गाडीची महामार्गावरील हॉटेल राजमुद्राजवळ चिपळूण-बदलापूर एसटी बस आणि टेम्पोला मागून धडक बसली. या धडकेमुळे बसमधील काही प्रवाशांच्या नाका-तोंडाला किरकोळ मार लागला पान २ वर

### जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

**नागोठणे** : नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध धंद्यांविरोधातील कारवाईला वेग आला असून, त्याच मोहिमेंतर्गत नागोठणे मोहल्ला परिसरातील एका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकत सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत जुगारासाठी वापरलेले साहित्य आणि रोख रकमेसह एकूण ६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्रभारी अधिकारी रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिसांनी २२ जुलै रोजी रात्री ८.३५ वाजण्याच्या सुमारास मोहल्ला परिसरातील समीर पानसरे यांच्या दोन पान २ वर

### आज 'ड्राय डे'

**मुंबई** : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शनिवार (दि. २५) रोजी महाराष्ट्रात ड्राय डे पाळण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व दारूची दुकाने, बार, पब तसेच मद्यविक्रीचा परवाना असलेली आस्थापने दिवसभर बंद राहणार आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियमांनुसार धार्मिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन हा निर्णय दरवर्षीप्रमाणे यंदाही लागू करण्यात आला आहे. आषाढी एकादशी हा महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचा धार्मिक सण मानला जातो. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून दरवर्षी मद्यविक्रीवर बंदी घालण्यात येते. त्यानुसार यंदाही मुंबई, पुणे, नागपूरसह राज्यातील सर्व जिल्ह्यांत ड्राय डे लागू राहणार आहे. राज्य उत्पादन शुल्क नियमांनुसार अधिसूचना जारी केली आहे.

# सरकार झुकलं; पण...

- विद्यार्थ्यांच्या दोन मागण्या मान्य
- शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यावर विद्यार्थी ठाम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नीट पेपरफुटी प्रकरणावर अखेर केंद्र सरकारला विद्यार्थ्यांसोबत चर्चेसाठी बसावे लागले. दिल्लीतील कॉन्स्टीट्यूशन क्लबमध्ये विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी सौरभ दास आणि आशुतोष रांका आणि केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांच्यात शुक्रवारी (दि. २४) तब्बल ५० मिनिटे बैठक पार पडली. या बैठकीत सरकारने विद्यार्थ्यांच्या तीनपैकी दोन प्रमुख मागण्या मान्य करण्याची तयारी दर्शवली. मात्र, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर पान २ वर



### पेपर फोडल्यास १० वर्षांची शिक्षा, १० कोटींचा दंड

नवी दिल्ली : देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. पेपरफुटी रोखण्यासाठी सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायद्यात सुधारणा करणाऱ्या नव्या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या विधेयकात दोषींवर अधिक कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली असून, लवकरच ते संसदेत मांडले जाणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या विधेयकाला हिरवा कंदील देण्यात आला. नव्या तरतुदीनुसार पेपरफुटीच्या गुन्ह्यांची सुनावणी जलदगती न्यायालयात करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच दोषी आढळणाऱ्यांना १० वर्षांपर्यंत कारावास आणि १० कोटी रुपयांपर्यंत दंड होऊ शकणार आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ३ ते ५ वर्षांच्या कारावासाची आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

### जंतरमंतरवर 'अंगठा लावा अभियान' सुरू

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा एक नवीन मार्ग स्वीकारला आहे. आंदोलनस्थळी अंगठा लावा अभियान (अंगठ्याचे ठसे उमटवण्याची मोहीम) सुरू करण्यात आले आहे. येथे झाडाच्या फांद्यांचे चित्र असलेला एक मोठा कॅनव्हास उभारण्यात आला आहे. विद्यार्थी, तरुण आणि सामान्य नागरिकांसह सहभागी लोक पानांच्या जागी आपल्या अंगठ्याचे ठसे उमटवत आहेत. देशभरातील तरुण त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत, हा संदेश शिक्षण मंत्र्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे अंगठ्याचे ठसे त्यांना पाठवले जाणार असल्याचे आंदोलकांनी सांगितले आहे.

### चुकीबद्दल मुलांची माफी मागा : राहुल गांधी

दिल्ली पोलिसांनी दिल्लीत एका शांततापूर्ण आंदोलनात सहभागी झालेल्या १६ वर्षीय साहिलच्या चेहऱ्यावर पेलेट गनने हल्ला केला. साहिल हा दिल्ली विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. पण कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी तो अर्धवेळ कार चालवण्याचे कामही करतो. तो आंदोलनात सामील झाला होता. आज, त्याच्या एका डोळ्याची दृष्टी कायमची जाण्याचा धोका आहे. प्रश्न विचारल्याबद्दल आणि जबाबदारीची मागणी केल्याबद्दल आपल्या विद्यार्थ्यांना ही शिक्षा मिळाली आहे. आम्ही साहिलच्या पाठीशी उभे आहोत. मोदीजी, या चुकीबद्दल देशातील मुलांची माफी मागा, जबाबदार लोकांवर कठोर कारवाई करा आणि धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ बडतर्फ करा, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली.

# रविवारी तिरंगा मार्च

## महविकास आघाडी मुंबईत धडकणार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दिल्ली येथील जंतरमंतर येथे झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडी आक्रमक झाली आहे. येत्या रविवारी (दि.२६) मुंबईच्या दादर येथील शिवाजी पार्क येथे या पार्श्वभूमीवर तिरंगा मार्च काढण्यात येणार आहे. या मोर्चात शेतकरी कामगार पक्षाचे असंख्य कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. या मोर्चातून महाविकास आघाडी मुंबईत धडकणार आहे.

नीट पेपरफुटीप्रकरणी संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी अभिजित दिपके यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथील जंतर मंतर येथे आंदोलन सुरु केले. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह पेपर फुटीप्रकरणाची चौकशी पारदर्शक व सखोल करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी हजारो तरुण, तरुणी या आंदोलनात सहभागी झाले होते. मात्र, सरकारने पोलीस बलाचा वापर करीत त्यांच्यावर लाठीहल्ला करण्यात आला. या अमानुष हल्ल्यात असंख्य तरुण जखमी झाले असून, तर काही तरुण मृत पावले. या घटनेचे पडसाद महाराष्ट्रात उमटले. या प्रकाराबाबत महाविकास आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या रविवारी कोणत्याही पक्षाचा झेंडा हाती न घेता, भारताचा तिरंगा हाती घेऊन मुंबईत तिरंगा मार्च काढण्यात येणार आहे. या मोर्चात हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरणार आहेत.

### शेकापचा सहभाग

मुंबईतील दादर येथील मार्चमध्ये सरकारचा तीव्र निषेध व्यक्त केला जाणार आहे. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चाला सुरुवात केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या तिरंगा मार्चमध्ये रायगड जिल्ह्यातून शेकापचे असंख्य कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

# जिल्हा रुग्णालयाच्या दारातच रुग्णाची हेळसांड!






**। चौल । प्रतिनिधी ।**

वेळ दुपारी दोन वाजताची... बाहेर वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळत होता. त्याचवेळी सायरन वाजवत एक रुग्णवाहिका जिल्हा रुग्णालयाच्या अपघात कक्षाच्या दारात येऊन थांबली. डॉक्टर, नर्स आणि वॉर्डबॉय स्ट्रेचरसह सज्ज होते. रुग्ण अत्यवस्थ होता. त्याला आधीच ऑक्सिजन लावण्यात आला होता. मात्र, रुग्णालयाच्या दारात पोहोचल्यानंतरही त्याला सुरक्षितपणे आत नेता आले नाही. कारण, अपघात कक्षासमोर साधी शेडही नव्हती. अखेर भरपावसात छत्रीचा आधार घेत रुग्णाला बाहेर काढण्याची नामुष्की ओढवली आणि जिल्हा रुग्णालयाच्या निष्काळजी कारभाराचे विदारक वास्तव पुन्हा एकदा समोर आले.

जिल्हा रुग्णालय सातत्याने कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत राहात आहे. पान २ वर

### डॉ. निशिकांत पाटील, गांभीर्याने घ्या!

रुग्णांच्या जीवाशी संबंधित अशा मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन अपघात विभागासमोर कायमस्वरूपी संरक्षक शेड उभारण्याची मागणी रुग्णांच्या नातेवाईकांकडून होत आहे.

## शहापूर भूसंपादन घोटाळ्यात

# महसूल यंत्रणा जाळ्यात

- मंडळ अधिकारी, जमीनधारक व एजंट अटकेत, तलाठी फरार
- ४३.१५ लाखांच्या मोबदल्यातील गैरव्यवहार उघड

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील विस्तारीत शहापूर औद्योगिक क्षेत्रासाठीच्या भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या कथित आर्थिक गैरव्यवहारामुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे. चुकीच्या लाभार्थ्यांना ४३ लाख १५ हजार ३८ रुपयांचा भूसंपादन मोबदला वितरित केल्याप्रकरणी पोयनाड पोलिसांनी मंडळ अधिकारी, तलाठी, मूळ जमीनधारक आणि व्यवहारातील मध्यस्थ अशा पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात मंडळ अधिकारी रविदास सदुसिंग जाधव, जमीनधारक रितेश किसन पाटील आणि एजंट कुमार नारायण बैंकर यांना अटक करण्यात आली असून, तलाठी सतीश भानुदास ढवले फरार असल्याची माहिती समोर आली आहे.

तक्रारदार किशोर रतिलाल शाह यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शहापूर येथील संबंधित जमिनी त्यांनी कायदेशीररित्या खरेदी करून त्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची परवानगीही पान २ वर

### मोठे मासे कधी अडकणार?

या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना माहिती अधिकार कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते, केवळ तलाठी किंवा मंडळ अधिकाऱ्यांवर कारवाई करून हा घोटाळा संपणार नाही, तर शहापूर औद्योगिक भूसंपादनात कोट्यवधी रुपयांचे व्यवहार झाले असून, निवासी उपजिल्हाधिकारी आणि वरिष्ठ महसूल पदांसाठी कथित बोली लावणारे तसेच या प्रक्रियेचे सूत्रधार असलेले वरिष्ठ अधिकारीही चौकशीच्या कक्षेत यायला हवेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# औषध निर्माण अधिकाऱ्यांकडून निषेध



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

औषध निर्माण अधिकाऱ्यावर धुळफेककेल्याप्रकरणीशुक्रवारी(दि. २४) महाराष्ट्र औषध निर्माण अधिकारी संघटना रायगडच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांनी निदर्शने केली.त्यानंतर जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन संबंधिताविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निलेश कार्लेकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील सर्व औषध निर्माण अधिकारी एकवटले.

निवेदनाद्वारे मिळालेल्या माहितीनुसार, म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयातील औषध निर्माण अधिकारी सागर सानप यांच्या अंगावर मनसेचे जिल्हाअध्यक्ष राज पारटे यांनी धुळ फेकली. त्या घटनेचा निषेध पान २ वर

# वर्धापन दिनात सहभागी व्हा : सुरेश खैरे

## मुरुडमध्ये शेकापच्या कार्यकर्त्यांची आढावा बैठक

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष हा तळागाळातील घटकांचा विचार करणारा पक्ष आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगारांचा आवाज असणारा पक्ष आजही घराघरात पोहोचला आहे. सध्याच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत शेतकरी कामगार पक्ष खंबीरपणे उभा आहे. सत्तेसाठी पक्षाने काम केले नाही, मात्र गोरगरीबांना केंद्रबिंदू ठेवून काम केले आहे. ७९ वर्षांत पक्षाने सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. येत्या दोन ऑगस्ट रोजी पक्षाचा वर्धापन दिन खालापूरमध्ये होणार आहे. हा सोहळा जल्लोषात साजरा करण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने पान २ वर




### सोमवारी अलिबागमध्ये शेकापची बैठक

**रायगड** : शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात सोमवारी (दि. २७) सकाळी दहा वाजता ही बैठक रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील यांच्यासह तालुका चिटणीस सुरेश घरत व वेगवेगळ्या पान २ वर

# घराची भिंत कोसळली




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरातील भवरा येथील एनबीसीसी चाळीत शुक्रवारी सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास फैयाज शेख यांच्या घराची भिंत अचानक कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत घराचे मोठे नुकसान झाले असले, तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास घराची भिंत अचानक कोसळल्याने कुटुंबियांसह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मोठा आवाज होताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. घटनेची माहिती तात्काळ प्रशासनाला देण्यात आली. पान २ वर

बाळ-बाळंतीण सुखरुप | जांभुळपाडा आरोग्य केंद्रातील डॉक्टरांची धाडसी कामगिरी

# मोबाईल टॉर्चच्या उजेडात यशस्वी प्रसूती!

**। पाली । प्रतिनिधी ।**

बाहेर मुसळधार पाऊस, आरोग्य केंद्रात काळाकुट्ट अंधार... प्रसूती वेदनेने विव्हळणारी माता आणि प्रत्येक क्षणाशी सुरू असलेली जीवाची लढाई. अशा थरारक क्षणी विजेने साथ सोडली; मात्र डॉक्टरांनी नाही. तीन मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात जांभूळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय पथकाने प्रसूती यशस्वीरित्या पार पाडत आई आणि बाळाला नवजीवन दिले. सेवाभाव, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेचे हे हृदयस्पर्शी उदाहरण सध्या सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे.



जांभूळपाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास रोहिणी रवी वाघमारे (२६) यांना प्रसूती वेदना सुरू झाल्याने दाखल करण्यात आले. मात्र, सकाळी १० वाजल्यापासून आरोग्य केंद्राचा वीजपुरवठा खंडित झाला. त्यातच सौरऊर्जा यंत्रणेतही बिघाड झाल्याने संपूर्ण आरोग्य केंद्र अंधारात गेले.

अशा गंभीर आणि आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय पथकाने हार न मानता तीन मोबाईलच्या टॉर्चचा प्रकाश वापरून प्रसूतीची तयारी केली. अखेर दुपारी १ वाजून ५० मिनिटांनी महिलेची यशस्वी प्रसूती करण्यात आली. जन्मलेल्या बाळाचे वजन २ किलो ४०० ग्रॅम असून, आई आणि बाळ दोघांचीही प्रकृती उत्तम असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

ही यशस्वी प्रसूती वैद्यकीय अधिकारी डॉ. अंकिता म्हात्रे, डॉ. तुषार म्हेत्रे, आरोग्य सहायक सविता रणखांबे, समुदाय आरोग्य अधिकारी सूरज कडू, आरोग्य सेविका अनुष्का थाले, आशा सेविका ज्योत्स्ना शिंदे आणि स्त्री परिचारिका कल्पना महाजन यांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली. वीज नसतानाही धैर्य, तत्परता आणि सेवाभावाच्या जोरावर वैद्यकीय पथकाने आई आणि बाळाचे प्राण सुरक्षित ठेवत आरोग्य सेवेचे संवेदनशील आणि प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. बाळ आणि बाळंतीण सुखरुप असल्याचे यावेळी डॉक्टरांकडून सांगण्यात आले. दरम्यान, डॉक्टर आणि त्यांच्या टीमचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# भरपावसातही न्हावेमध्ये पाणीकपात

## हजारो नागरिक तहानलेले; पाण्यासाठी वीस दिवसांची प्रतीक्षा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पावसामुळे अनेक धरणे पाण्याने भरली आहेत. मात्र, धरणे भरूनही भरपावसात न्हावे गावात पाणीकपातीचे संकट उभे राहिले आहे. सात हजारांहून अधिक नागरिकांना पाण्यासाठी वीस दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे पाणीटंचाईचे भीषण संकट ओढावले आहे. या परिस्थितीत डेंग्यूसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका वाढल्याचा आरोप ग्रामसुधारक मंडळ न्हावेचे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी केला आहे. याकडे ग्रामपंचायतीचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. पान २ वर



### अनधिकृत नळजोडणीकडे दुर्लक्ष

हेटवणे आणि रानसई या धरणांमधून या गावांना पाणीपुरवठा केला जातो. गावातील मुख्य जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र, गावातील मुख्य जलवाहिनीला अनधिकृतपणे नळजोडणी करण्यात आली आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम होत असल्याचा आरोप योगेश पाटील यांच्याकडून करण्यात आला आहे. याबाबत ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी शेंडगे यांच्याशी संपर्क साधला, मात्र होऊ शकला नाही.

## पान १ वरून

## सरकार झुकलं; पण...

निर्णय देण्यासाठी सरकारने शनिवारी दुपारी १२ वाजेपर्यंतचा अवधी मागितला आहे. सरकारने काही पावले मागे घेतली असली, तरी 'राजीनामा मिळाल्याशिवाय आंदोलन मागे नाही,' अशी ठाम भूमिका विद्यार्थ्यांनी कायम ठेवली आहे. बैठकीनंतर सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांनी पत्रकार परिषदेत सरकारच्या भूमिकेची माहिती दिली. नीट पेपरफुटीमुळे मानसिक तणावातून मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या प्रस्तावावर सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. तसेच जंतर-मंतर आंदोलन आणि 'संसद चलो' मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे आणि कायदेशीर कारवाई मागे घेण्याची तयारी सरकारने दर्शविली आहे. मात्र, आंदोलनाची मुख्य मागणी असलेल्या केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. या विषयावर वरिष्ठ पातळीवर चर्चा करून शनिवारी दुपारी निर्णय कळविण्यात येईल, असे सरकारने बैठकीत सांगितल्याचे सीजेपीने स्पष्ट केले. यावर विद्यार्थ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होत नाही, तोपर्यंत जंतर-मंतरवरील आंदोलन सुरूच राहील. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष शनिवारी होणाऱ्या पुढील बैठकीकडे लागले आहे.

## औषध निर्माण अधिकाऱ्यांकडून निषेध

रायगड जिल्ह्यातील सर्व रुग्णालयातीलऔषध निर्माण अधिकारी यांनी शुक्रवारी केला. कायद्याची पायमल्ली करणारी, निंदनीय ही घटना आहे. अशा असभ्यतेच्या वर्तनाने यंत्रणेवर व कायद्याच्या राज्यावर झालेला आघात आहे. त्यामुळे पारटे यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी औषध निर्माण अधिकारी यांनी निदर्शन केली. शासकीय कामात अडथळा करणे. दमदाटी व असभ्य वर्तन करणे या कलमाखाली त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा. ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस बंदोबस्त अथवा सुरक्षा यंत्रणा तातडीने उपलब्ध करण्यात यावी अशा विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले.

## महसूल यंत्रणा जाळ्यात

घेतली होती. मात्र, औद्योगिक क्षेत्रासाठी जमीन संपादन करताना महसूल अभिलेखांमधून त्यांच्या नावाची फेरफार नोंद डावलण्यात आली. त्यानंतर संगनमताने मूळ खातेदार आणि मृत व्यक्तीच्या नावावर ४३.१५ लाख रुपयांचा मोबदला वितरित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात केवळ मोबदला चुकीच्या व्यक्तींना देण्यात आला नाही, तर ७/१२ उताऱ्यात फेरफार करून सरकारी नोंदींमध्ये दिशाभूल करण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाची तसेच तक्रारदाराची आर्थिक फसवणूक झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये मंडळ अधिकारी रविदास जाधव, तलाठी सतीश ढवले, जमीनधारक रितेश किसन पाटील, रिना किसन पाटील (रिना साईराज येलमकर) आणि एजंट कुमार नारायण बैंकर यांचा समावेश आहे. दरम्यान, उपविभागीय अधिकारी (भूसंपादन) कार्यालयाने भूसंपादन प्रक्रिया त्या वेळी उपलब्ध असलेल्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदींनुसार पार पडल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, फेरफार नोंदी वारंवार फेटाळणे, रद्द करणे आणि बदल करणे या प्रक्रियेत तलाठी आणि मंडळ अधिकारी दोषी आढळल्याने त्यांच्यावर विभागीय चौकशीचा प्रस्ताव यापूर्वीच ठेवण्यात आला होता.

**जबाबदारीवरून नवा वाद**

या प्रकरणात महसूल अभिलेखांमध्ये झालेल्या फेरफारांमुळेच संपूर्ण व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. फेरफार नोंदी वारंवार फेटाळणे, त्यानंतर त्या अचानक रद्द करणे आणि अभिलेखांमध्ये कथित बेकायदेशीर बदल करणे या प्रक्रियेत संबंधित तलाठी आणि मंडळ अधिकारी दोषी आढळल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या दोन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यासह प्रशासकीय कारवाईचा प्रस्तावही यापूर्वीच सादर करण्यात आला होता. यामुळे आता या प्रकरणात चूक महसूल विभागाच्या फेरफार प्रक्रियेत झाली की भूसंपादन यंत्रणेने पडताळणी न करता नुकसानभरपाई वितरित केली, यावरून दोन्ही विभागांमध्ये जबाबदारी ढकलण्याचे चित्र समोर येत असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

## घराची भिंत कोसळली

घटनेची माहिती मिळताच उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी त्वरित प्रशासनाशी संपर्क साधून मदतकार्याला गती देण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर त्यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेत दुर्घटनाग्रस्त घराची पाहणी केली. यावेळी त्यांनी फैयाज शेख व त्यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना धीर दिला, तसेच शासनाच्या नियमानुसार आवश्यक ती सर्व मदत तातडीने उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही दिली. सुरक्षेच्या दृष्टीने शेख कुटुंबाची तात्पुरती राहण्याची व्यवस्था अन्य सुरक्षित ठिकाणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनामार्फत घराच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा पूर्ण करण्यात आला असून आर्थिक मदत व इतर आवश्यक शासकीय सहाय्य मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## भरपावसातही न्हावेमध्ये पाणीकपात

पनवेल शहराचा विस्तार होत असताना ग्रामीण भाग अजूनही असुविधांपासून वंचित असल्याचा प्रकार समोर आला आहे. पनवेल तालुक्यातील न्हावे गावात गेल्या अनेक दिवसांपासून तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. त्याचे गंभीर परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनासह सार्वजनिक आरोग्यावरही होऊ लागले आहेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. वीस दिवस आड फक्त अर्धा तास पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे घराघरांत मोठ्या प्रमाणावर पाणी साठवले जात आहे. त्याचा परिणाम मानवी आरोग्यवर होऊ लागला आहे. डेंग्यूसदृश्य परिस्थिती गावांमध्ये निर्माण झाली आहे. आतापर्यंत ७० हून अधिक डेंग्यूचे संशयित रुग्ण म्हणून आढळून आल्याचा आरोप ग्रामसुधारक मंडळ न्हावेचे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी केला आहे. योगेश पाटील यांच्या म्हणण्यानुसार, या गावाची लोकसंख्या साधारण आठ हजार आहे. स्थानिकांसह भाडेकरूंचीही संख्या प्रचंड आहे. अनियमित पाणीपुरवठा केला जात आहे. गावातील पाणीपुरवठा व्यवस्था गेल्या गेल्या काही महिन्यांपासून विस्कळीत झाली आहे. त्यामुळे महिलांसह ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांची मोठी गैरसोय होत आहे. वीस दिवस उशिरा येणाऱ्या पाण्यामुळे पुढील अनेक दिवस पुरेल इतके पाणी प्लास्टीक ड्रममध्ये साठवून ठेवण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. पंधरा ते वीस दिवसाच्या पाणीकपातीचे संकट गावाला भेडसावत असताना भरलेल्या पाण्यामुळे डेंग्यूचाही धोका निर्माण झाला आहे. याकडे ग्रामपंचायतीचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे पाटील यांच्याकडून सांगण्यात आले आहे. केवळ पिण्याच्या पाण्यापुरता मर्यादित न राहता सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर विषय बनल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

## लालपरीची बस, टेम्पोला मागून धडक

असून, या अपघाताची कोणतीही तक्रार दाखल नाही. पोलादपूर बसस्थानकातूक पोलादपूर-बोरिवली ही बस महामार्गावरुन महाडच्या दिशेला जात असताना हॉटेल राजमुद्राजवळ आली. यावेळी त्या बसपुढे असणाऱ्या चिपळूण-बदलापूर बसला ब्रेक न लागल्याने वाहक बाजूला ठोकर बसली. चिपळूण-बदलापूर या बसनेदेखील पुढे असणाऱ्या मालवाहतूक करणाऱ्या टेम्पोला मागून धडक दिल्याने तिहेरी अपघात झाला. महामार्गावर अचानक मोकाट गुरे आल्याने त्यांना वाचविण्यासाठी मालवाहतूक करणाऱ्या टेम्पोने वाहनाचा वेग कमी हळू केल्यानंतर त्यापाठोपाठ येणाऱ्या चिपळूण-बदलापूर बसनेसुद्धा वेग नियंत्रित केला. मात्र, त्या मागून येणाऱ्या पोलादपूर-बोरिवलीवरील चालकाला वेगावर नियंत्रण ठेवता न आल्याने हा तिहेरी अपघातात घडल्याचे प्रवाशांनी सांगितले. या अपघातातील जखमी वसुधा वीर दीक्षित (५०) यांच्यावर मलमपट्टी करण्यात येऊन त्यांना पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले.

## जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

मजली चाळीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत समीर पानसरे (५१), मोहम्मद सैय्यद (७३), इरशाद इलानी (३९), इमान मुल्ला (३९), मुजफर कडवेकर (४२) आणि सादिक सिंधी (४१) या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, सर्व आरोपी नागोठणे मोहल्ला येथील रहिवासी आहेत. पोलिसांनी जुगाराच्या गेम फी म्हणून जमा केलेले प्रत्येकी ३०० रुपये, असे एकूण १ हजार ८०० रुपये तसेच आरोपींच्या अंगझडतीत सापडलेले ४ हजार ४०० रुपये, जुगारासाठी वापरलेला कागद आणि बॉलपेन असा एकूण ६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.पोलीस शिपाई बळी पुट्टेवाड यांच्या फिर्यादीवरून नागोठणे पोलीस ठाण्यात सहाही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान, नागोठणे परिसरातील गावठी दारू, गुटखा आणि इतर अवैध व्यवसायांविरोधातही पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला असून, या धाडसत्रामुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिसांच्या या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

## ... दारातच रुग्णाची हेळसांड!

कधी स्लॅब कोसळणे, कधी छताला गळती, कधी पाणीपुरवठा खंडित होणे, तर कधी एक्स-रे, सीटीस्कॅनसारखी यंत्रणा बंद पडणे अथवा ती चालविण्यासाठी तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध नसणे, अशा समस्यांनी रुग्णालयाचा कारभार अक्षरशः वेढला आहे. आता त्यात आणखी एका गंभीर त्रुटीची भर पडली आहे. शुक्रवारी (दि. २४) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास अत्यवस्थ रुग्णाला घेऊन आलेली रुग्णवाहिका अपघात कक्षासमोर उभी राहिली. त्याचवेळी मुसळधार पाऊस सुरू असल्याने रुग्णाला रुग्णवाहिकेतून बाहेर काढताना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. अपघात विभागासमोर कोणतीही संरक्षक शेड नसल्याने रुग्णाच्या नातेवाईकांनी छत्रीचा आधार घेत रुग्णाला कसेबसे स्ट्रेचरवर हलविले. या प्रकारामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. रुग्णालयाच्या इमारतींच्या डागडुजीवर आणि नवीन बांधकामांवर कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना, अत्यवस्थ रुग्णांना पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी अपघात कक्षासमोर साधे पत्र्याचे शेड उभारण्याचा विचारही प्रशासनाला का सुचला नाही, असा संतप्त सवाल रुग्णांच्या नातेवाईकांकडून उपस्थित केला जात आहे. रुग्णांच्या जीवाशी संबंधित अशा मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन अपघात विभागासमोर कायमस्वरूपी संरक्षक शेड उभारण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## सोमवारी अलिबागमध्ये शेकापची बैठक

आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित असणार आहेत. शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन दोन ऑगस्ट रोजी होणार आहे. शेकाप नेते सरचिटणीस जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा खालापूरमध्ये होणार आहे. रायगड जिल्ह्यासह वेगवेगळ्या भागातून लाल बावट्याचे वादळ खालापूरमध्ये धडकणार आहे. खालापूरमधील राष्ट्रीय महामार्गालगत जुन्या पेट्रोल पंपाच्या जवळ असलेल्या विस्तीर्ण मैदानात हा मेळावा होणार आहे. पुरोगामी विचारांसह, संघर्ष आणि जनतेच्या हक्काचा प्रखर एल्गार हा वर्धापन दिन ठरणार आहे. त्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. तालुका स्तरावर ठिकठिकाणी बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. शेवटची बैठक सोमवारी (दि.२७) अलिबाग, पनवेल व उरण या तालुक्यांमध्ये होणार आहे. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात आढावा बैठक नेतेमंडळींच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. त्यानंतर ही बैठक पनवेल व उरण तालुक्यांमध्ये घेतली जाणार असल्याची माहिती शेकापकडून सांगण्यात आली आहे.

## वर्धापन दिनात सहभागी व्हा : सुरेश खैरे

सहभागी व्हा, असे आवाहन शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी केले. शेतकरी कामगार पक्षाचा ७९ वा वर्धापन दिन सोहळा यावर्षी खालापूरमध्ये होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मुरूडमध्ये आयोजित बैठकीत खैरे बोलत होते. यावेळी शेकाप राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, मुरूड तालुका चिटणीस विजय गिदी, प्रमोद घासे, तुकाराम पाटील, चंद्रकांत कमाने, मनोहर बैले, सोनाली कासार, नंदा पाटील, अरुण मढवी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रविवारी (दि.२) ऑगस्ट रोजी पक्षाचा वर्धापन दिन यशस्वीपणे साजरा करण्यासाठी तालुकास्तरीय आढावा बैठक मूरूडमधील उसरोली येथील आगरी समाज हॉल येथे घेण्यात आली. यावेळी सुरेश खैरे यांच्यासह प्रदीप नाईक आदी पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाची माहिती दिली. वर्धापन दिन म्हणजे सर्व कार्यकर्त्यांसाठी उत्सव आहे. या उत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. शेतकरी कामगार पक्षाने शेतकरी, कष्टकरी, कामगार, वंचित, भूमीपूत्र तसेच विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांवर आवाज उठविला आहे. जनसामान्यांसाठी लढणारा पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाकडे पाहिले जाते. शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी कायमच या भागातील प्रश्न मार्गी लावले आहेत. अन्यायविरोधात त्यांनी खंबीरपणे लढा दिला आहे. अनेक ज्वलंत प्रश्नांवर आवाज उठवून प्रशासनानाला जागे करण्याचे काम त्यांनी केले आहे. शाहू, फुले, आंबेडकर विचारांचा वारसा लाभलेल्या शेकापसाठी आगामी काळ चांगला आहे. पुढे होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शेकापचे उमेदवार निवडून येतील, असा विश्वास सुरेश खैरे यांनी व्यक्त केला.


### रोहा अष्टमी नगर परिषद

ता-रोहा, जिल्हा - रायगड पिन कोड - ४०२१०९
फोन:- कार्यालय ०२१९४ २३५५२०, फॅक्स: ०२१९४-२३४०८७
Email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/आरोग्य/जाहीर सूचना/१२४३/२०२६-२७ दिनांक -२४-०७-२०२६

**जाहीर सूचना**

**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची अंमलबजावणी बाबत**

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून अंमलात आले आहेत.

सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की सदर नियमांनुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४/२०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील -

**१) ओला कचरा :** अन्नाचे अवशेष, भाजीपाला/फळांची साल व देठे, अंड्यांची टरफले, मासे-मांस, चहा पावडर, पालापाचोळा, नारळाच्या करवंट्या, केस व नखे इत्यादी जैवविघटनशील कचरा.

**२) सुका/पुनर्वापरयोग्य कचरा :** प्लास्टिक, थर्माकोल, कागद, पुठ्ठा, धातू, काच, रबर, कपडे, चप्पल-बूट, कातडी, लाकूड इत्यादी.

**३) सॅनिटरी कचरा:** वापरलेले डायपर, सॅनिटरी नॅपकिन/पॅड, टॅम्पॉन, कंडोम, दूषित टिश्यू पेपर इत्यादी.

**४) विशेष/घातक कचरा :** रंग, वार्निश, बल्ब, ट्यूबलाइट, बॅटरी, मुदत संपलेली औषधे, पाऱ्याचे थर्मामीटर व ई-कचरा इत्यादी.

**नागरिकांची जबाबदारी :**
* घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करूनच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे/घंटागाडीत सुपूर्द करणे.
* सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये.
* प्लास्टिक, बांधकाम कचरा, ई-कचरा इत्यादी स्वतंत्रपणे देणे.
* ओला व सुका कचरा मिसळून देऊ नये.
* सॅनिटरी कचरा सुरक्षितरीत्या गुंडाळून देणे.
* कचरा जाळणे, नाले/रस्त्यावर टाकणे किंवा उघड्यावर फेकणे टाळणे.

**लोकप्रतिनिधीची जबाबदारी :**
* आपल्या प्रभाग/वॉर्डात जनजागृती करणे.
* नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी प्रोत्साहन देणे.
* स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय सहभाग घेणे.
* स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करून नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

Bulk Waste Generators **(मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे) यांची जबाबदारी:**

ज्या संस्था/इमारती/संकुलांचे क्षेत्रफळ २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा ४०,००० लिटरपेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो, अशा आस्थापनांना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे. अशा संस्थांनी-
* ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट/बायोगॅस प्रक्रिया करणे.
* कचऱ्याची स्वतंत्र साठवणूक व वर्गीकरण करणे.
* प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये.
* महानगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सूचनांचे पालन करणे.
* अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील.

वरील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांवर "Polluter Pays Principle" नुसार दंडात्मक कारवाई व पर्यावरण भरपाई आकारण्यात येईल.

तरी सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ चे काटेकोर पालन करावे, ही विनंती.

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

**सही/-**
**(कु.वनश्री अवनी समीर शेडगे)**
**नगराध्यक्षा**
**रोहा अष्टमी नगर परिषद**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे आशील श्री. निखिल सुभाष सोनवणे रा. ब्लॉक नं. २०२, ए २, कोस्मोस एम्परेस्स पार्क, ट्रॉपिकल लगून, आनंद नगर जी बी रोड, ठाणे, महाराष्ट्र, ४००६१५ यांनी खालील वर्णनाची नमूद केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक संतोष पांडुरंग घारे रा. माणगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड यांच्या नावे असलेला एकूण क्षेत्रापैकी अविभक्त हिस्सा यांचेकडून कायम विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ६५ | ४ | ०-६४-५० पो.ख ०-०४-०० एकुण ०-६८-५० गुंठे क्षेत्रापैकी अविभक्त हिस्सा संतोष पांडुरंग घारे यांचे मालकीच पूर्वेकडील ०-१६-०५ गुंठे मिळकत सर्वे नं. ६५/५ च्या लगत असलेले क्षेत्र | ९-०६ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे, वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे आशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक २५/०७/२०२६

अधिवक्ता
**ॲड. सौ. शुभांगी आनंद साळवी**
पत्ता - सरमोकादम बंगलो, गाळा नं २
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो.नं. ९९६७८३४६१८/७७९६२०७३८०.



### जाहिर नोटीस

सर्वांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विदयमान मालक १) निलम शिवदास खोकराळे २) भाग्यश्री स्वप्नील मते यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविल्या आहेत सदर जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६० | २ / ब | ०-२६-०० | १-७६ |
| ६० | २/ क | ०-२६-०० | १-७६ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपटटा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २५/०७/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. समर्थ सखाराम पाटील, रा. अलिबाग यांनी खालील नमूद केलेली मिळकतीचे विद्यमान मालक मंदार इंटरप्राईजेस तर्फे भागिदार, अलिबाग रायगड यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

मौजे श्रीबाग ३, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मालमत्ता क्रमांक ALB००००४८१३ वरील 'मंदार इंटरप्राईजेस' तिसऱ्या मजल्यावरील, सदनिका क्र. ३०१, न.पा. घर क्रमांक ६५२/११, कारपेट (चटई क्षेत्र रेरा ६२.७३ चौ. मी., (६७५ चौ. फुट.) ही मिळकत.

वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहित असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणें आहे. तरीही वर नमूद मिळकतीत कोणाचाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, चार्ज, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास अथवा अन्य कोणताही दंगदावा असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २५/०७/२०२६

**ॲड. विजय विठोबा पाटील,**
फ्लॅट क्र. १०४, पहिला मजला, ॲकॉन्स एन्क्लेव्ह,
डॉ. पुष्पलता 'शिंदे हॉस्पिटल समोर,
अलिबाग- रायगड मोबा. ९७६७५२८८८०



### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-लिलाव सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे खालील वेळापत्रकानुसार आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर प्रकाशित केल्यानुसार, व्यावसायिक करारांच्या ई-लिलावाची घोषणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कराराचे नाव | करारांची / लॉटची संख्या | ई-लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | रेल्वेगाडीच्या आतील भागात जाहिरातींचे प्रदर्शन - मडगाव - मंगळुरू सेंट्रल - मडगाव (10107/10108) मेमू रेल्वेगाडी तसेच दिवा - सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106) | 02 | 27.07.2026, 11:00 वा. |
| 2 | मडगाव येथे पार्सल स्कॅनर | 01 | 27.07.2026, 11:00 वा. |
| 3 | प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र (पीएमबीजेके) - मडगाव | 01 | 27.07.2026, 11:00 वा. |
| 4 | रेल्वेगाडीच्या बाह्य भागावर जाहिरातींचे प्रदर्शन - दिवा - सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106), दिवा - रत्नागिरी पॅसेंजर (50104/50103), कोंकण कन्या एक्सप्रेस (20112-20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103) | 03 | 28.07.2026, 11:00 वा. |
| 5 | कुंदापुरा, मुकांबिका रोड बेंदूर, थिवीम, थिवीम-2, कारवार, करमळी येथे पे अँड यूज शौचालय सुविधा | 06 | 28.07.2026, 11:00 वा. |
| 6 | चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, गोकर्ण, होन्नावर, भटकळ तसेच सुरतकल स्थानकांवर डिजी लॉकरची स्थापना | 08 | 28.07.2026, 11:00 वा. |
| 7 | रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिजजवळ होर्डिंगद्वारे जाहिराती - महाराष्ट्र | 07 | 29.07.2026, 11:00 वा. |
| 8 | रेल्वेगाडी क्रमांक 11004, 20112, 10104, 10215, 22907, 56615 - II च्या एसएलआरचे लीजिंग | 06 | 29.07.2026, 11:00 वा. |
| 9 | आडवली, विलवडे, राजापूर रोड, मुकांबिका रोड बेंदूर, कोलाड, मडगाव, रत्नागिरी, खेड स्थानकांवर भाडे रिपीटरची स्थापना | 08 | 30.07.2026, 11:00 वा. |
| 10 | रत्नागिरी, मडगाव, थिवीम, करमळी, कारवार, मुल्की, उडुपी, मुर्डेश्वर स्थानकांवर जाहिरात फलक, होर्डिंग तसेच थिवीम येथे व्हिडिओ वॉलद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिराती | 09 | 31.07.2026, 11:00 वा. |
| 11 | सावंतवाडी रोड, कुडाळ, कणकवली, खेड, सिंधुदुर्ग, संगमेश्वर, थिवीम, करमळी येथील पादचारी उड्डाणपुलांवर जाहिरात फलकांद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिराती, करमळी येथे स्थानक परिसरात व्हिडिओ स्क्रीन तसेच मडगाव येथे कंपाउंड बाउंड्री भिंत व होर्डिंगवर जाहिराती | 11 | 01.08.2026, 11:00 वा. |
| 12 | कुडाळ, सिंधुदुर्ग येथे एसी लाउंजचे संचालन व व्यवस्थापन | 02 | 01.08.2026, 11:00 वा. |
| 13 | रत्नागिरी तसेच उडुपी येथे बाईक पॅकिंग करार | 02 | 01.08.2026, 11:00 वा. |
| 14 | मडगाव, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ, थिवीम, करमळी, उडुपी, सावंतवाडी रोड तसेच कारवार रेल्वे स्थानकांवर पीए प्रणालीद्वारे जिंगल प्रकारच्या जाहिरातींचे प्रसारण | 10 | 14.08.2026, 11:00 वा. |

**चौकशीसाठी कृपया संपर्क साधा** : 1. श्री प्रवीण डावरे, मो. क्र. 9004470597 2. श्री विनय गावंकर, मो. क्र. 9004476129, 3. श्री मधुकुमार शेट्टी, मो. क्र. 9004476082 अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ही वेबसाइट पाहावी.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे आशील १) श्री. हितेंद्र भालचंद्र भडंग रा. : फ्लॅट नं. २०७, दुसरा माळा, बी विंग कॉव्हेरी सीएचएस बी १ बिल्डिंग, रौनक पार्क, रौनक पार्क, पोखरण रोड २, ठाणे, अपना बाजार, ठाणे, महाराष्ट्र - ४००६१० २) श्री. हेमंत सुरेश शिंदे रा. शिवाजी चौक, जुनागाव, सामोदे, सामोदे धुळे महाराष्ट्र ४२४३०६ यांनी खालील वर्णनाची नमूद केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक संतोष पांडुरंग घारे रा. माणगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| ६५ | ५ | ०.२१.८० पो.ख ०.००.५० एकुण ०.२२.३० | ०.२५ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे, वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक हितसंबंध त्यांनी आमचे आशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक २५/०७/२०२६

अधिवक्ता
**ॲड. सौ. शुभांगी आनंद साळवी**
पत्ता - सरमोकादम बंगलो, गाळा नं २
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो.नं. ९९६७८३४६१८/७७९६२०७३८०.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या शेती मिळकती त्यांचे विद्यमान मालक वरूणराज आशिष मांधळे यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| १७५/४ | ००-२५-९० | १२.३८ |
| १७५/५/अ | ००-११-१० | ३.५० |
| १७५/६/अ | ००-०४-५० | १.५० |
| १७५/६/ब | ००-१३-०० | ४.०६ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २५/०७/२०२६

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड



### पनवेल महानगरपालिका
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/ ६५२६/प्र.क्र.७९/२२२८/२०२६ दिनांक: २४/०७/२०२६

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/३३/२०२६- २७ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती -अ, मधील प्रभाग क्र.०१ मधील घोट गाव येथील के.डी. पाटील यांच्या घरापासून ते घोट तळोजा नदी पर्यंत पाईप गटर व गल्ली रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २०,५४,३८५/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.२७/०७/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000040888** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-27/2026-2027.** RFx e-tender for AMC for work of repairs of 220kV Isolator, 100kV Isolator and 22kV Isolator and cable termination and joints at various substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 15,00,000/-, EMD amount Rs. 15,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **24.07.2026, 18:00 Hrs. to 09.08.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 09.08.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **10.08.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**E.H.V. (O&M) Dn. Panvel**

# निवडक

## मुसळधार पावसामुळे वाडा कोसळला



**श्रीवर्धन :** श्रीवर्धन तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वेळास हद्दीत गुरुवारी (दि.२३) रात्री झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. येथील रहिवासी रश्मी तोडणकर यांच्या मालमत्ता क्रमांक ३५७ असलेल्या वाड्याचे छत पूर्णपणे कोसळले आहे. या वाड्यात घरगुती स्तरावर काजू प्रक्रिया उद्योग चालवला जात होता. रात्री झालेल्या संततधार पावसामुळे वाड्याचे छत कोसळून आतील सर्व यंत्रसामग्री नुकसान झाले आहे. यामुळे काजू उद्योगातील मशिन्स व साहित्याचे नुकसान झाले असून व्यवसाय ठप्प झाला आहे. घटनेची माहिती मिळताच तलाठी यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचा पंचनामा केला आहे. प्रशासनाने त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी तोडणकर कुटुंबीयांकडून होत आहे.




## नेरळ परिसरात पर्यटकांसाठी सूचना फलक

**नेरळ :** नेरळ आणि परिसरातील फोटोग्राफरांची संघटना असलेल्या नेरळ फोटोग्राफर असोसिएशनकडून तालुक्यातील धबधब्यांच्या ठिकाणी वर्षासहलीसाठी येणारे पर्यटकांच्या अपघाताची शक्यता असते. त्यामुळे पर्यटकांना त्या-त्या धबधब्यांची माहिती असावी आणि कोणताही अपघात होऊ नये यासाठी असोसिएशनकडून नेरळ परिसरातील धबधब्यांवर फलक लावण्यात आले आहेत. नेरळ परिसरात अनेक धबधबे असून या पाणवठ्यांचे ठिकाणी पर्यटक वर्षासहलीसाठी येत असतात. त्यात बहुसंख्य ठिकाणी असलेल्या धबधब्यांवर येणारे पर्यटक हे नव्याने त्या भागात आलेले असतात. त्यामुळे अपघात होऊन पर्यटकांचे नुकसान होऊ नये यासाठी मागील वर्षाप्रमाणे यावर्षी देखील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सूचना फलक लावण्याचे निर्णय घेतला होता. त्यानुसार नेरळ येथे पोलीस अधिकारी राहुल वारोटे यांनी नेरळ येथील हुतात्मा चौकात नेरळ फोटाग्राफर असोसिएशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी अध्यक्ष चेतन केळकर, सचिव दिलीप मसने, खजिनदार गणेश वेहेले, अमेय चंदन, महेश कडव, दुर्वास सोनावणे यांच्यासह सर्व फोटोग्राफर सहभागी झाले होते.

## बळीराजा लावणीच्या कामात व्यस्त

**तळा :** तळा तालुक्यात भातशेती लावणीच्या कामात सध्या बळीराजा व्यस्त असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. यावर्षी पावसाने उशिरा हजेरी लावून पुन्हा मधेच दडी मारल्याने शेतीच्या कामात अनेक अडचणी आल्या. शेतकऱ्यांना धुळवाफ्याची पेरणी



करताच आली नाही. अनेकांनी चिखलपेरा केला तर काहींनी राहू पध्दतीने पेरणी केली. जून महिन्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने तळ्यामध्ये जुलै महिन्यापासून भात शेतीच्या लागवडीला सुरूवात झाली. यावर्षी तालुक्यात १०५० हेक्टरवर भातशेतीची लावणी करण्यात येणार आहे. आतापर्यंत तळा तालुक्यात अंदाजे सरासरी ५० टक्केपर्यंत पावसाची नोंद झाली आहे. एकंदरीत परिस्थिती समाधानकारक असून शेतकरीवर्ग लावणीच्या कामात व्यस्त आहे. अंदाजे १० दिवसांत लावणीची कामे आटोपतील असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे. पाऊस आजपर्यंत चांगला पडत आहे. त्यामुळे शेती चांगली आहे. तालुक्यात भातशेती क्षेत्रात तंत्रज्ञानाचाही शेतकरी वर्ग वापर करत असून चारसूत्री भातशेती लागवड, सामुहीक शेती, बचतगटांनी केलेली सामुहीक शेती यामुळे अनेक दृष्टीने वेळ व मजूरांची बचत होते. त्याच बरोबर उत्पन्नातही वाढ होत असल्याने शेतकरीवर्ग कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली सामुहिक शेतीकडे वळत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



## उपवासाच्या पदार्थांची बाजारात रेलचेल

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

आषाढी एकादशी असल्याने पनवेल शहरातील भाजी मार्केटमध्ये उपवासासाठी लागणाऱ्या पदार्थांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. विठ्ठल भक्तांसह अनेक नागरिक एकादशीचा उपवास करणार असल्याने रताळी, शेंगा, बटाटे, रताळ्याची पाने तसेच इतर उपवासासाठी उपयोगी भाजीपाला खरेदीसाठी महिला वर्ग मोठ्या संख्येने बाजारात दाखल झाला आहे. सकाळपासूनच बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ वाढली असून विक्रेत्यांनीही खास उपवासासाठी लागणाऱ्या ताज्या भाज्या व कंदमुळे विक्रीसाठी उपलब्ध करून दिली आहेत. विशेषतः रताळी आणि शेंगांना ग्राहकांकडून मोठी मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांवर लाठीमार करणारे सरकार लोकशाहीचे मारेकरी

**शिक्षणमंत्र्यांचा तात्काळ राजीनामा घ्या: शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील**

**| चणेरा | प्रतिनिधी |**

भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे. प्रत्येक नागरिकाला आणि विद्यार्थ्याला शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, सत्तेच्या मस्तीत असलेल्या केंद्र सरकारने हा अधिकारच हिरावून घेतला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी न्याय मागणाऱ्या विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीमार करण्यात आला. ही लोकशाही नसून दडपशाही आहे, असा घणाघाती आरोप शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केला. रोहा येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होत्या.



यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्यांना सरकार पाठीशी घालत आहे. लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले, अनेक कुटुंबे उध्वस्त झाली; तरीही सरकारला त्याची साधी खंत नाही. अनेक दिवस विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी आंदोलन करणाऱ्या सोनम वांगचुक यांचीही सरकारने दखल घेतली नाही. त्यामुळे पंतप्रधानांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा. तसेच चित्रलेखा पाटील म्हणाल्या, आंदोलन दडपण्यासाठी केंद्रीय यंत्रणांचा वापर करून विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला. पण आता देशातील युवक आणि विद्यार्थी संतप्त झाले आहेत. संपूर्ण देशात असंतोषाची लाट आहे. सत्तेच्या मस्तीत वावरणाऱ्या सरकारला जनता आगामी काळात धडा शिकवेल.

> रायगडातील युवकांनी केवळ सोशल मीडियावर संताप व्यक्त करून उपयोग नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. रायगडातील विद्यार्थी सुज्ञ आहेत. योग्य वेळी लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरून आपल्या हक्कासाठी लढतील. राज्यात अनेक आंदोलने झाली; मात्र, विद्यार्थ्यांवर असा लाठीचार्ज यापूर्वी कधी झाला नव्हता. सनदशीर मार्गाने आंदोलन करा; अन्याय झाला तर शेकाप तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील.
> – चित्रलेखा पाटील,
> शेकाप प्रवक्त्या

स्मार्ट मीटरवरून सरकारला इशारा स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावरही चित्रलेखा पाटील यांनी सरकारवर टीका केली. मुख्यमंत्र्यांनीच सक्ती नसल्याचे सांगितले असताना नागरिकांवर अडाणी नावाचा लेंीरिंश खोत सध्या जबरदस्तीने स्मार्ट मीटर लावले जात आहेत. नागरिकांनी या सक्तीला विरोध केला पाहिजे लाईट बिले यांची होळी केली पाहिजे. जर कुणी जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न केला, तर शेकाप कार्यकर्ते नागरिकांच्या पाठीशी उभे राहतील आणि जशास तसे उत्तर देतील, असा इशारा त्यांनी दिला.

शेकापचा वर्धापन दिन म्हणजे आमच्यासाठी पंढरीची वारीफ शेकापच्या आगामी वर्धापन दिनाबाबत बोलताना पाटील म्हणाल्या, शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन म्हणजे आमच्यासाठी पंढरीची वारी आहे. पक्षाचा इतिहास, महापुरुषांचे विचार आणि संघर्षाची परंपरा यांचे स्मरण करण्याचा तो दिवस आहे. यंदाचा वर्धापन दिन त्या निष्पाप २० विद्यार्थ्यांना समर्पित करण्यात येत असून, रोहा तालुक्यातून सुमारे दोन हजार कार्यकर्ते या कार्यक्रमात सहभागी होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजमध्ये विधी साक्षरता

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जनता शिक्षण मंडळ संचलित ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेज, अलिबाग आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या जयवंत केळुसकर सभागृहात विधी साक्षरता शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी आयोजनासाठी मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. या शिबिरात बालकांसाठी सुलभ कायदेशीर सेवा योजना-२०२४, डॉन, अमली पदार्थमुक्त भारत अभियान, कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम, २०१३ तसेच बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा, २०१२ या विषयांवर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



रेवती कंठे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग यांनी बालकांसाठी सुलभ कायदेशीर सेवा योजना-२०२४ तसेच कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम, २०१३ या विषयांवर मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना कायदेशीर हक्क, महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या तरतुदी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध मोफत कायदेशीर सहाय्याची माहिती दिली.

ॲड. चंद्रशेखर कामथे, प्रमुख, यांनी डॉन २०२५ अमली पदार्थ मुक्त भारत अभियान या विषयावर मार्गदर्शन करत अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यावरील कायदेशीर कारवाई तसेच युवकांनी व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी घ्यावयाची जबाबदारी याविषयी सविस्तर विवेचन केले. ॲड. विक्रांत पाटील, पॅनेल वकील यांनी बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा, २०१२ या विषयावर मार्गदर्शन करत बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी, गुन्ह्यांचे स्वरूप, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया आणि समाजाची जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची मान्यवरांनी समाधानकारक उत्तरे देत शंकांचे निरसन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. संदीप घाडगे यांनी केले. महाविद्यालयाच्या विधी सहाय्य समिती मार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रभारी प्राचार्या डॉ. नीलम हजारे आणि प्रा.नीलम म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा. चिन्मय राणे, प्रा. पियुषा पाटील, प्रा. कौशिक बोडस, प्रा. सुरज पुरी, प्रा. हर्षदा चेवले, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माथेरानमध्ये विजेचा लपंडाव

- **ई-रिक्षा चार्जिंग अभावी बंद**
- **विद्यार्थी, नागरिकांचे हाल**



**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान या पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील असलेल्या पर्यटन स्थळी मागील आठवड्यापासून विजेचा लपंडाव सुरू आहे. त्याचा परिणाम माथेरानमधील पर्यावरण पूरक ई-रिक्षा यांच्या चार्जिंगचा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान विजेच्या लपंडावामुळे माथेरानमध्ये बहुसंख्य ई-रिक्षा वाहतूक करण्यासाठी कुचकामी ठरत आहेत. त्यामुळे शाळेतील विद्यार्थी आणि शहरातील नागरिकांचे मोठे हाल होत आहेत.

सध्या सुरू असलेल्या पावसामुळे माथेरानचे पावसाळी पर्यटन बहरून आला आहे, असे असताना विजेच्या लपंडावामुळे शहराची वाहतूक व्यवस्था पाहणाऱ्या बहुसंख्य ई-रिक्षांच्या चार्जिंगचा प्रश्न निर्माण झाला आहे.

वीज खंडित असल्याने चार्जिंग नाही आणि त्यामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, स्थानक नागरिक आणि पर्यटकांना सेवा देण्यास विलंब होत आहे. माथेरानचे पर्यटन वाढीस पर्यावरण पूरक ई-रिक्षा देखील महत्वाचा भाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे चार्जिंग अभावी वीज खंडित झाल्यास त्याचा मोठा फटका पर्यटकांच्या वाहतुकीस होत आहे. ही बाब लक्षात घेऊन माजी नगराध्यक्ष प्रेरणा सावंत यांनी ई-रिक्षांच्या चार्जिंगसाठी जनरेटर खरेदी करण्यात यावेत अशी मागणी केली आहे.

> जनरेटर घेण्याबाबत संघटनेचा विचार आहे. मात्र, किती मोठा जनरेटर घ्यावा यावर एकमत होत नाही. परंतु, सेवा देण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन लवकरच त्यावर निर्णय घेतला जाईल. मात्र, वीज पुरवठा बाबत महावितरणाकडून कोणत्याही प्रकारचे ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याने वीज पुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.
> – सुनील शिंदे सचिव
> श्रमिक रिक्षा संघटना

माथेरान नगरपरिषदेने असा जनरेटर खरेदी करावा आणि किमान दोन चार्जिंग पॉईंट उपल्बध करून द्यावेत अशी देखील मागणी केली आहे. तर बायोगॅस प्रकल्प येथे असलेला जनरेटर सुस्थितीत करून रस्त्यावरील पथदिवे बायोगॅस वर सुरू करावेत आणि तो जनरेटर ई-रिक्षाचार्जिंगसाठी उपयोगात आणला जाऊ शकतो असे मत आणि सूचना प्रेरणा सावंत यांनी केली आहे. दरम्यान, सावंत यांनी ई-रिक्षांसाठी श्रमिक रिक्षा संघटना यांनी जनरेटर खरेदी करावा अशी मागणी केली आहे.



● आषाढी एकादशीचे औचित्य साधून अलिबागमधील पीएनपी होली चाईल्ड शाळेच्या वतीने दिंडी काढण्यात आली होती. यामध्ये विद्यार्थी विठ्ठल, रखुमाई, वारकऱ्यांच्या वेषात सहभागी होऊन विठू नामाच्या गजरात तल्लीन झाले होते. (छायाचित्र- समीर मालोदे)




● आषाढी एकादशीचे औचित्य साधून अलिबागमधील आत्मनिर्भर पालक संचलित विशेष मुलाच्या शाळेच्या वतीने दिंडी काढण्यात आली होती. यामध्ये विद्यार्थी विठ्ठल, रखुमाई, वारकऱ्यांच्या वेषात सहभागी होऊन विठू नामाच्या गजरात तल्लीन झाले होते. (छायाचित्र : समीर मालोदे)

## कोनायन्सस स्कूलची भक्तीमय दिंडी

**| पेण | प्रतिनिधी |**

आषाढी एकादशीच्यानिमित्ताने पेण येथील कोनायन्सस इंग्लिश मिडियम स्कूलच्या वतीने शाळेपासून चावडी नाका येथील गणपती मंदिरापर्यंत भव्य प्रतिकात्मक दिंडीचे आयोजन करण्यात आले.



आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर सकाळपासूनच शाळेच्या परिसरात दिंडीची लगबग सुरू होती. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत मुक्ताई, यांच्यासह विविध संत-महात्म्यांच्या वेशभूषेत सजलेले बाळगोपाळ या दिंडीमध्ये सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या गळ्यात आळंदी ते पंढरपूर या वारी मार्गावरील विविध ठिकाणांचे माईलस्टोन घालून प्रतिकात्मक दिंडीमार्ग साकारण्यात आला होता. त्यामुळे या दिंडीला आकर्षक स्वरूप प्राप्त झाले.

पेण चावडी नाका येथील गणपती मंदिरात दिंडीचे स्वागत पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील, नगरसेविका अंजली जोगळेकर यांनी केले. यावेळी त्यांनी शिक्षकांसोबत फुगडी खेळत आषाढी एकादशीच्या उत्सवाचा मनमुराद आनंद घेतला. या दिंडीमध्ये अध्यक्ष डॉ. मनीष वनगे, उपाध्यक्ष ॲड. मंगेश नेने, डॉ. सोनाली वनगे, प्रकाश गुरव, भुषण कडू, मितेश शहा, जेमीना शिरपुरवाला, सुप्रिया वेखंडकर यांच्यासह शिक्षकवृंद विद्यार्थी सहभागी झाले होते.

**चिमुकल्यांच्या दिंडीतून अवतरली पंढरीची भक्ती | श्रीकृपा स्कूलमध्ये रंगला आषाढी एकादशीचा सोहळा**

## वारकरी संस्कृतीचा गोड संस्कार

**| चौल | प्रतिनिधी |**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत रेवदंडा येथील श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शुक्रवारी (दि.२४) विठ्ठलभक्तीचा अनोखा सोहळा रंगला. वारकरी वेशातील चिमुकले, विठ्ठल-रुक्मिणीच्या आकर्षक वेशभूषा, डोक्यावर तुळशी वृंदावन आणि मुखी अखंड विठ्ठलनाम अशा भक्तिमय वातावरणात शाळा अक्षरशः पंढरीमय झाली होती. विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा आणि आषाढी एकादशीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.




आषाढी एकादशीनिमित्त लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत असताना, विद्यार्थ्यांनाही या समृद्ध परंपरेची ओळख व्हावी या उद्देशाने श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत विठ्ठलनामाचा गजर करत वातावरण भक्तीरसाने भारून टाकले.

याप्रसंगी शाळेची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. टाळ-मृदंगाच्या तालावर अभंग सादर करण्यात आले, तर चिमुकल्या वारकऱ्यांनी पारंपरिक वेशभूषेत दिंडीचा अनुभव साकारला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थित पालक आणि शिक्षकही भारावून गेले.

मुख्याध्यापिका रिया झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम उत्साहात पार पडला. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी फेर धरून, फुगड्या खेळून आणि विठ्ठलनामाचा गजर करत आनंदोत्सव साजरा केला. भगवा ध्वज, तुळशी वृंदावन आणि भक्तीमय वातावरणामुळे संपूर्ण शाळा परिसर विठ्ठलमय झाला होता.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वारी, दिंडी आणि संत परंपरेचे महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका रिया झावरे, शिक्षिका प्रीती म्हात्रे, निधी गुप्ता, सुचित्रा देव, अंकिता नाईक, श्वेता म्हात्रे तसेच संगीता गोंधळी, संपदा मानकर आणि माधुरी चुनेकर यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमाचे पालकांनीही मनापासून कौतुक केले.

> विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान नव्हे, तर आपल्या संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचीही ओळख व्हावी हा या उपक्रमामागील उद्देश होता. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये भक्ती, संस्कार आणि भारतीय परंपरेबद्दल आत्मीयता निर्माण होते. – रिया झावरे,
> मुख्याध्यापिका,
> श्रीकृपा इंग्लिश मीडियम स्कूल

# मग्रुरी, मग्रुरी, मग्रुरी

नरेंद्र मोदी २०१४ मध्ये लोकांचे सरकार आणण्याचे आश्वासन देत होते. म्हणून तर त्यांनी स्वतःला प्रधानसेवक म्हणण्याचे नाटक केले. पण आज २०२६ मध्ये मोदी राजवट सामान्य जनतेपासून शेकडो मैल दूर गेली आहे. मोदी आणि त्यांचा भाजप आजही निवडून येत असतील. पण लोकांच्या हृदयातले स्थान त्यांनी गमावले आहे. त्याला कारण आहे मोदींच्या सत्तेने दाखवलेली मग्रुरी. माज. उद्दामपणा. आणि, ही मग्रुरी मोदींचे मंत्री, भाजपचे नेते यांच्यापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. ती सत्तेच्या सर्व यंत्रणांमध्ये पाझरलेली आहे. आपल्या लोकशाही व्यवस्थेत न्यायालयांकडे खूप मोठी सत्ता असते.ही कोण्या पक्षीय सत्तेला बांधलेली नसतात व नसावीत असे गृहित आहे. पण आता तीदेखील राजकीय सत्ताधीशांप्रमाणे वर्तन करू लागली आहेत. दिल्ली आंदोलनातील पोलिसांच्या लाठीमाराबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला गेला तेव्हा महामहीम सरन्यायाधीशांनी आमचा वेळ वाया घालवू नका असा बाणेदार जबाब दिला. याच सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी केली होती. त्यातूनच कॉकरोच जनता पार्टीचा जन्म झाला. त्यानंतर त्यांनी आपल्या बोलण्याचा विपर्यास केला गेला असा खुलासा केला. पण बूंद से गई वो हौद से नही आती तसा प्रकार झाला. आज तीच झुरळे राष्ट्रीय स्तरावरचे आंदोलन उभे करीत असतील तेव्हा न्यायाधीशांच्या हृदयाला भगदाडे पडत असतील यात शंका नाही. मात्र न्यायालयांनी समतोल राहणे व वागणे अपेक्षित असते. एरवी सामाजिक महत्वाच्या प्रश्नांवर न्यायालये स्वतःहून दखल घेतात. कितीतरी आंदोलनांमध्ये न्यायालयांनी यापूर्वी आंदोलकांच्या बाजूने हस्तक्षेप केला आहे. सरकारला चार गोष्टी सुनावल्या आहेत. पण आता बदलत्या राजवटीत सर्वच बदलले आहे. न्यायालये आंदोलकांच्या बाबतीत संवेदनशील उरलेली नाहीत. मुंबईत जरांगे पाटील यांचे आंदोलन शांततापूर्ण रीतीने चालू होते. पण न्यायालयाला एकाएकी ते खटकले. दक्षिण मुंबईत हाहाकार उडाला आहे असे जणू चित्र उभे केले गेले व जरांगे यांना बेमुदत धरणे कसे करू दिले जाते असा सवाल केला गेला. सरन्यायाधीशांनी तर पुढचा टप्पा गाठला आणि न्यायाची गरज असलेल्यांसाठी आपल्याकडे वेळ नाही असे उत्तर दिले.

## पोलिसांचा नंगानाच

वास्तविक दिल्लीमध्ये काय घडले ते जगाने पाहिले. त्याबद्दल चिंता व्यक्त केली.वीस जुलैला कॉकरोच जनता पार्टीच्या मोर्चाच्या वेळी पोलिसांनी अक्षरशः नंगानाच केला. रस्त्यावरून शांततेने चाललेल्या तरुण मुलामुलींना विनाकारण झोडपून काढले. अश्रुधूर सोडला. मुलींशी गैरवर्तन केले. या मुलांनी मोबाईलवर याचे व्हिडिओ शूट केले म्हणूनच ते सर्व जगाला कळले. अन्यथा, मोदी सरकारची दलाली करणाऱ्या टीव्ही वाहिन्यांवरून हे आपल्याला कधीच कळले नसते. एका डीसीपी दर्जाच्या अधिकाऱ्याने एका मुलीला अकारण थप्पड मारली. एका ठिकाणी पोलिसच खासगी गाडीच्या काचा फोडताना दिसतो. आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली वगैरे स्टोऱ्या मिडियात सोडण्याचा भाजपने प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. आंदोलकांनी दंगा किंवा हिंसाचार केला, किंवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले, नागरिकांशी गैरवर्तन केले असा एकही व्हिडिओ, एकही पुरावा केंद्र सरकारला आजतागायत देता आलेला नाही. असा एक जरी व्हिडियोआला असता तरी सरकारने आकाशपाताळ एक केले असते. आंदोलनाला बदनाम केले असते. हे शांततापूर्ण आंदोलन चिरडण्याचा सरकारने पुरेपूर प्रयत्न केला. जंतरमंतरवर जाऊन आंदोलकांचे स्टेज तोडण्यात आले. लांबा नावाच्या एका वर्दीतील गुंडाने तर कळस गाठला. त्याने आंदोलकांना तर मारहाण केलीच. शिवाय, अभिजित दीपकेसोबत वाद घातला व त्याचा माईक खेचून घेतला. याचे व्हिडिओ उपलब्ध आहेत. दिल्ली पोलिस ही मग्रुरी करताहेत कारण त्यांना भाजपच्या सत्तेचा पाठिंबा आहे. मोदी सरकारातील सर्व यंत्रणांच्या सत्ता डोक्यात गेली आहे. याचमुळे सरकारने कॉकरोच पार्टीच्या दोघा नेत्यांना बैठकीसाठी बोलावून पहिल्या दिवशी दोन तास बसवून ठेवले. आज सरकार दिल्ली पोलिसांच्या अत्याचारांबद्दल माफी मागायला तयार नाही. उलट आंदोलकांवर गुन्हे दाखल केले गेले आहेत. मुंबईत एकही हिंसक प्रकार घडलेला नसताना निव्वळ आंदोलनासाठी जमले म्हणून ९०० गुन्हे नोंदण्यात आले आहेत. पोलिसांनी गुन्हे दाखल करायचे आणि मग नागरिकांनी न्यायालयाचे खेटे मारत राहायचे हे यामागचे कारस्थान आहे.

## फूट पाडण्याचे प्रयत्न

दरम्यान, परिस्थिती हाताबाहेर जाते आहे हे लक्षात येताच मोदी सरकार आंदोलनात फूट पाडण्याचे प्रयत्न करू लागले आहे. त्यांना काहीसे यश मिळताना दिसते आहे. सोनम वांगचुक यांनी गुरुवारी मध्यरात्री अचानक आपले उपोषण मागे घेणे ही संशयास्पद गोष्ट आहे. वांगचुक यांचे काम मोठे आहे. त्यांच्या उपोषणामुळे या आंदोलनाला बळ मिळाले हेही खरे आहे. मात्र त्यांच्याकडून अशी कच खाण्याची अपेक्षा नव्हती. एवीतेवी ते रुग्णालयात होतेच. तिथे त्यांच्यावर उपचारही सुरू होते. अशा स्थितीत त्यांनी जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत गुचपूचपणे उपोषण सोडणे हा आंदोलनाला दगा देण्याचा प्रयत्न होता. मुळात धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा ही आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. त्यातच दिल्ली पोलिसांच्या अत्याचाराबद्दल त्यांच्यावर कारवाई करावी ही मागणीही महत्वाची ठरली आहे. त्याबद्दल कोणतेही आश्वासन मिळालेले नसताना वांगचुक यांनी त्याच सरकारच्या प्रतिनिधींच्या हस्ते उपोषण सोडणे हे कोणालाही पटणारे नाही. वांगचुक यांनी उपोषण सोडले याचा सर्वांनाच आनंद होईल. पण ते अशा प्रकारे सोडावे हे दुःखदायक आहे. वांगचुक किंवा अगदी दीपके हे भाजप व संघाच्या अजेंड्यानुसार वागत आहेत असा अनेकांचा आरोप आहे. राहुल गांधी यांच्या काँग्रेसला शह देण्यासाठी हे सर्व चालले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. दीपके यांनी आपल्या वक्तव्यातून आतापर्यंत तरी हा आरोप खोडून काढला आहे. मोदी हे हुकुमशहा आहेत व मोदींचाच राजीनामा मागावा लागेल अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. या स्थितीत वांगचुक यांनी मात्र काहीशी माघार घेतलेली दिसते. सुदैवाने जंतरमंतर किंवा देशभर जमलेली आंदोलक मंडळी या राजकारणाच्या पलिकडे आहेत. वांगचुकच काय, उद्या दीपके व इतरांनाही बाजूला ठेवून हे तरुण पुढे जातील असे आजचे चित्र आहे. कारण, पेपर फुटणे, नोकऱ्या न मिळणे हे त्यांना स्वतःला झालेले त्रास आहेत. त्यातून त्यांची करियर बरबाद झालेली दिसते आहे. या बरबादीविरुध्दचा संताप हा त्यांच्या पोटातून आलेला आहे. वांगचुक किंवा दीपके हे त्या संतापासाठी माध्यम पुरवणारे नेते ठरले. पण म्हणून हे तरुण सदैव त्यांच्या पायाशी निष्ठा वाहणार नाहीत हे भाजपने लक्षात ठेवायला हवे. मोदींनी काल मध्यरात्री आणखी एक व्हिडियो जारी केला आहे. पण मोदींची जादू संपलेली आहे. आपण पाठिंबा देणाऱ्यांची एक अभंग, अभेद्य भिंत निर्माण केली आहे हा मोदींचा भ्रम तरुणांनी पार तोडून फोडून टाकला आहे.

**| विचार**

# आषाढ... परंपरेतला अन् प्रत्यक्षातला

*आषाढ मनात आशा घेऊनच उजाडतो. व्याकूळ होऊन संपूर्ण सृष्टी पावसाची वाट बघू लागते. इतर ऋतुंपेक्षा पावसाळ्यामध्ये परिवर्तनाचे, सर्जनाचे सामर्थ्य असते. त्यात आषाढातला पाऊस हा जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे तनामनाचा, सृष्टीचा स्वभाव बदलून टाकतो. मात्र यंदाच्या आषाढाला अनेक गमतीशीर, गंभीर, अनपेक्षित घडामोडींची पार्श्वभूमी लाभली. त्यामुळे मानवी मनाचा नव्याने ठाव घेण्याची संधी मिळाली.*



**डॉ. साधना कुलकर्णी**

यंदा बहुप्रतिक्षित पाऊस, उशिरा का होईना पण आला. वैशाख वणव्यात शरीर मनाची लाही लाही होत असताना आषाढाची चाहूल लागते. आषाढ मनात आशा घेऊनच उजाडतो. व्याकूळ होऊन संपूर्ण सृष्टी पावसाची वाट बघू लागते. उन्हाळा आणि हिवाळ्यापेक्षा पावसाळ्यामध्ये परिवर्तनाचे, सर्जनाचे सामर्थ्य असते. त्यात आषाढातला पाऊस हा जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे तनामनाचा, सृष्टीचा स्वभाव बदलून टाकतो. हा पाऊस भूमीला तृप्त करतो, शेतकऱ्यांच्या जीवात जीव आणतो, कवी मंडळींच्या मनात कल्पनांचे मोहोर फुलवतो, साहित्यिकांच्या प्रतिभेला बहर आणतो, प्रेमिकांच्या मनात विरहाची आग पेटवतो तर जुन्याजाणत्यांना आठवणीत रमवून टाकतो. असा अनेकांच्या भावविश्वात वेगवेगळे बदल हा पहिला पाऊस घडवून आणत असला तरी सर्वसाधारणतः सार्वत्रिक आनंदाचं वातावरण निर्माण करण्याची शक्ती त्यात असतेच. आणि मग जुन्या कटू घटना काही काळासाठी तरी विस्मरणात जातात आणि मनात फक्त पाऊस उरतो.

या वर्षीचा उन्हाळा जरा जास्तच जाणवला. अर्थात आयुष्याचे कितीही उन्हाळे बघितले तरी... यंदाचा उन्हाळा जरा जास्तच हो, असं म्हणण्याचा प्रघात आहे. पण खरंच या उन्हाळ्यात डोक्यावर सूर्य आग तर ओकत होताच पण आजूबाजूला ज्या घटना घडत होत्या. त्यामुळे वातावरणातील दाहकता कमालीची वाढली होती. सुरूवातीला मे महिन्यात आला तो अधिक मास. अधिक मासात धार्मिक कार्य करायचा वरून (वरून म्हणजे साक्षात वरून - श्री विष्णू भगवानांकडून बरं का...) परवानाच मिळालेला असतो. पण आदेशानुसार कार्यवाही करायची नाही, हा आपल्या भूतलावरचा नियम. त्यामुळे अधिक मासात जनमानसातले अधिक अतिरेकी धार्मिक रूप बघून भर मे महिन्यात जरा जास्तच घाम फुटला. आदेशानुसार जप, तप, व्रतवैकल्य सोडून यच्चयावत जामात मंडळींना दानधर्म करण्याचे सामूहिक उत्सव ठिकठिकाणी साजरे केले गेले. जितक्या जास्त जामातांचं पूजन, तितके जास्त पुण्य पदरी पडणार याची खात्री असल्यामुळे सख्खे, चुलत, मामे, मावस... अशा सगळ्याच जावई वर्गाला प्रचंड लाभ मिळाला. याशिवाय नदीत स्नान करण्याचे आणि तिला प्रदूषित करण्याचे शास्त्रदेखील आवर्जून पाळले गेले. एकंदरीत, हा उन्हाळा श्वशुरांना जरा भारीच गेला.

त्यात नेमकं 'नीट' पेपरफूट प्रकरण उद्भवलं. खरं तर पेपर फोडण्याची यंत्रणा प्रचंड कठीण आणि किचकट असावी, असं माझं निष्पाप मन सांगतं. वास्तविक, या पेपरफुटी यंत्रणेत गुंतण्यापेक्षा 'नीट'चा अभ्यास नीट होऊ शकेल, हे ही माझं प्रामाणिक मत. पण हल्ली 'बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको' या पंथाचे लोक अल्पसंख्य असल्याने शिक्षक- विद्यार्थी, राजकारणी इ.इ. अनेकांनी या पेपरफुटी प्रकरणात नीट सहकार्य केले. त्यानंतर लगोलग टीईटीचाही पेपर फुटल्याने शिक्षकांचीही प्रवेश परीक्षा रद्द झाली. पेपरफूट प्रकरण तापल्यामुळे उन्हाळा अर्थातच जास्त कोपला. या घटना कशाबशा पचवण्यासाठी निष्पाप जनतेची भर उन्हाळ्यात प्रचंड ऊर्जा खर्च झाली. तेवढ्यात भावी नवऱ्याला लोहगडावरून ढकलून देऊन हत्या केल्याची बातमी समोर आली. लग्नाला नकार देण्याचा एक नवीन पर्याय तरूण विवाहेच्छू मंडळींसमोर उघड झाला. या घटनेच्या अनेक बाजूंचं माध्यमावर प्रचंड चर्वितचर्वण आणि दळण दळलं गेलं. इतकं की त्यात गुंतल्यामुळे या दाहक उन्हाळ्याकडे लक्ष द्यायला फुरसत मिळाली नाही.

एखाद्या निष्पाप व्यक्तीचा जीव घेणं ही इतकी सहज, सोपी आणि साधी प्रक्रिया असते, याचा साक्षात्कार आजच्या तरूण पिढीला तसंच शालेय पिढीलाही झाल्याच्या धक्क्यातून सावरत नाही तोच विनोदाची (?) एक जात समोर आली. ज्या विनोदाला लाखो फॉलोअर्सनी उचलून धरलं, पुलं, आचार्य अत्रे, द. मा. मिरासदार, वि. आ. बुवा, मंगला गोडबोले, शिरीष कणेकर यांच्या विनोदावर पोसलेल्या आमच्या निष्पाप पिढीसमोर एका नवीनच विनोदाचं महाद्वार उघडलं. वैद्यकीय, शिक्षण घेताना मृतदेहाचं डिसेक्शन करणं हा एक महत्वाचा टप्पा असतो. त्यामुळे शरीररचना स्पष्टपणे लक्षात येते. या संदर्भात एका स्टँड अप कॉमेडी शोमध्ये, पुरुष शरीराचं डिसेक्शन करताना...'त्याच्या काही अवयवांवरून आम्ही ज्योक्स करतो' असे गौरवोद्गार प्रथितयश कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीने हसत हसत काढले. या तिच्या विनोदबुद्धी(?)ला प्रचंड लाईक्स येऊन क्षणार्धात ती प्रसिध्द झाली.

**"घटं भिंद्यात्? पटं छिंद्यात्?**
**कुर्यात्? रासभरोहणम्? ।**
**येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुष भवेत्? ॥"**

एका संस्कृत सुभाषितानुसार आजकालची परिस्थिती अशी आहे. प्रसिध्द होण्यासाठी कर्तृत्व, गुणवत्ता, कौशल्य यांची अजिबात गरज नाही. कपडे फाडणे, भांडी फोडणे, गाढवावर बसणे इत्यादी कृतींमुळेच माणूस कमालीच्या प्रसिद्धीला पावतो. असे अनेक सांस्कृतिक, वैचारिक, सामाजिक धक्के बसत असताना साक्षात वैशाख वणवाही फिका पडला. 'मै चाहे ये करू, मै चाहे वो करू, मेरी मर्जी' हे गोविंदाचं गाणं मला अचानक आठवलं आणि हे गीतलेखन करणाऱ्या त्या द्रष्ट्या कवीवर्याचं मला विलक्षण कौतुक वाटलं. मी करेन ती पूर्व दिशा, असा कमालीचा आत्मविश्वास या गाण्यात आहे, जो हल्ली सगळ्यांमध्ये आढळतो. तो योग्य आहे की अयोग्य हे काळच ठरवणार.

या सगळ्या घटना कमी होत्या की काय, म्हणून धार्मिक स्तरावर एक धक्कादायक प्रकार उघडकीला आला. संपूर्ण देशाचं आराध्यदैवत असलेल्या, अभिमानाचा विषय असलेल्या अयोध्येच्या श्रीराम मंदिरात देणग्यांच्या निधीमध्ये, दागिन्यांमध्ये अफरातफर होण्याचा अनवस्था प्रसंग समोर आला. कायम विश्वास आणि श्रध्दा ठेवावी अशी काही ठिकाणं समाजमनात असतात, ज्यावर घाव घालून या प्रसंगाने वैशाख वणव्यावरही कडी केली. पण, आणखी एक गंमतीची गोष्ट सांगायचीच राहीली. नुकतंच ऑटोचालकांना मराठीचे धडे देणं सुरू केलं गेलं होतं. तीन महिन्याची आगाऊ फी घेऊन मराठी शिकवणी आता कुठे रंगात आली होती तोच विधानसभेच्या सभापतींनी संसदेत अभिजात मराठीचा नवीन आविष्कार सादर केला. शिकवणीतले यूपी भय्या विद्यार्थी लगेच तावातावाने घरी आले आणि दुगनी फीसवा वापस दे दे, असं धरणं देऊन बसले. या आर्थिक फटक्यामुळे भर वैशाखात हुडहुडी भरली. असा हा चित्रविचित्र घटनांनी भरलेला वैशाख या वर्षी जरा जास्तच जाणवला आणि पावसाची वाट बघताना डोळ्यात प्राण आले. 'मै चाहे ये करू, मै चाहे वो करू, मेरी मर्जी' असं पावसानं म्हटलं असतं तर? माणूस आपल्या मर्जीने कसाही वागतो, पण निसर्गाने, ऋतूने नियमाप्रमाणेच वागावं अशी अपेक्षा करतो. पण पाऊस उशिरा का होईना, बरसला आणि साऱ्या कटू घटनांचा विसर पडेल असा आनंदही त्याने दिला. समाजाची ही रीतच आहे. प्रसंग घडतात, गाजतात, चर्चा होतात आणि विस्मरणात जातात. घटनांमधून काही बोध घ्यावा, शिकवण घ्यावी अशी आज कुणाचीही मनोभूमिका नाही. शेवटी कालाय तस्मै नमः हेच खरं. हे लिहिता लिहिता इंद्रायणी नदीला पूर आल्याच्या बातम्या ऐकू आल्या. दरड खचून रहदारी बंद झाली. आता इंदिरा संत यांच्या कवितेतल्या ओळींप्रमाणे 'नको नको रे पावसा असा धिंगाणा अवेळी' असं म्हणायची वेळ तर येणार नाही ना, अशी भीती वाटू लागली. पण त्यापेक्षा त्याच चालीवर 'नको नको रे माणसा असा बेभान तू होऊ, आपल्याच लेकरांचा तू काळ नको होऊ' असं म्हणणं जास्त संयुक्तीक वाटत आहे. आपल्या पुढच्या पिढीवर नेमके काय संस्कार घडतील, याचा विचार प्रत्येकाने करणं गरजेचं आहे. असो. इंद्रायणीला पूर आला, तरी वारकऱ्यांच्या विठ्ठल भक्तीचा महापूर इंद्रायणी नक्कीच समजून घेईल, कारण ती निसर्गाचा एक अंश आहे, माणूस नाही.

**| चर्चा आजची**

# आधुनिकतेच्या युगातही वारी परंपरा कायम

भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. या भूमीला लाभलेले सर्वात मोठे सांस्कृतिक व आध्यात्मिक वैभव म्हणजे पंढरीची वारी. आजच्या आधुनिकतेच्या युगात अनेक वाहतुकीची साधने उपलब्ध आहेत. यातून सहज, आरामदायी आणि सुरक्षित प्रवास करता येतो. मात्र तरीही लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने पायी प्रवास करतात. कधी कडक ऊन तर कधी मुसळधार पाऊस अशा बदलत्या वातावरणात हा प्रवास चालू असतो. काही वारकरी तर अनवाणी पायाने चालत असतात. त्यामुळे त्यांच्या पायाला फोडही येतात. मात्र पांडुरंगाच्या दर्शनाच्या ओढ मनात असल्याने त्यांना हा प्रवास सुखकर वाटत असतो. यात तरुण पिढीच नाही तर वृद्ध देखील मोठ्या हौसेने सहभागी झाल्याचे दिसून येते.

समाजातील भेदभाव दूर करण्यासाठीच संतांनी वारीची परंपरा सुरू केली आणि आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. वृद्धांप्रामाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली असून आतातर परदेशातील लोकही खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येत असल्याचे दिसून येते.

वारीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिथे असलेला समताभाव. वारीत कोणी श्रीमंत नसतो, कोणी गरीब नसतो. जात, पात, धर्म या सगळ्या भिंती गळून पडतात. सर्वजण एकमेकांना माऊली म्हणून हाक मारतात आणि एकमेकांच्या पाया पडतात. हा संस्कार समाजात सामाजिक सलोखा आणि बंधुभाव टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

वारी ही बघण्यापेक्षा अनुभवण्याची गोष्ट आहे. कारण आजच्या डिजिटच्या युगात माणूस पैसे कमावताना, नात्यांसोबतच जबाबदाऱ्या सांभाळताना स्वतःलाच हरवून बसला आहे. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण युगात माणसाला मानसिक शांततेची गरज आहे आणि वारी म्हणजे स्वतःला पुन्हा एकदा शोधण्याचा एक प्रवास आहे. वारी माणसाला स्वतःकडे पाहायला, स्वतःच्या मनात डोकवायला शिकवते. नामस्मरण, अभंग, संतांचे विचार, नामाचा गजर आणि अनेक वारकऱ्यांसोबतचा प्रदीर्घ प्रवास मन हलकं होते. मनातील दुःख, अहंकार, चिंता तसेच नकारात्मक विचार दूर होतात.



**अंतरा पारंगे**

वारी माणसाला कठीण परिस्थितीतही आनंदी आणि समाधानी राहण्याची कला शिकवते. शेकडो मैलांचा पायी प्रवास, मिळेल ते अन्न आणि जागा स्वीकारणे, यातून वारकऱ्यांची शारीरिक क्षमता आणि मानसिक सहनशीलता वाढते. हा प्रवास माणसाला शिस्त, संयम आणि संकटांशी सामना करण्याचे बळ देतो. माणूस जेव्हा आपल्या सुख-सोयी सोडून, कडक ऊन-पावसाची पर्वा न करता शेकडो किलोमीटर पायी चालतो, तेव्हा त्याचा मीपणा गळून पडतो. वारीच्या वाटेवर ठिकठिकाणी हजारो मदतीचे हात वारकऱ्यांची सेवा करताना दिसून येतात. कोणी अन्नदान करतो, कोणी वैद्यकीय मदत देतो, तर कोणी मोफत सेवा पुरवतो, कोणी विश्रांतीची सोय करताना दिसून येते. यातूनच मनात परोपकाराची भावना रुजते. तर लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची ही शिस्त समाजाला दिशा देणारीच असते.

वारी स्पर्धा नाही तर सहप्रवास हवा, स्वार्थ नको सहकार्य करूया, मी-मी नाही आपण म्हणायला शिकवते. आजच्या युगात प्रत्येक जण एकमेकांच्या पुढे जाण्यासाठी धडपडत असल्याचे दिसून येते. मात्र वारी कोणाला मागे टाकून नाही तर एकमेकांचा हात धरून पुढे जाण्याचे शिकवते. कारण वारीच्या वाटेवर प्रत्येकाचे ध्येय आणि पोहोचण्याचे ठिकाण एकच असते.

वारी ही केवळ भक्ती, संस्कृती, परंपराच नाही तर रोजगार आणि अर्थव्यवस्थेला बळ देणारा उत्सव आहे. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी येतात. त्यामुळे चहाच्या टपऱ्या, फुलविक्रेते, वस्त्रांची दुकाने आणि पूजासाहित्याची विक्रेत्यांना मोठा रोजगार मिळतो. दिंडयांच्या स्वयंपाकासाठी मोठया प्रमाणावर भाजीपाला, अन्नधान्य खरेदी केले जाते. यातूनच शेतकरा वर्गालादेखील रोजगार मिळतो. बाजारपेठेत कुंकू, बुक्का, अष्टगंध, तुळशीमाळ, टाळ, मृदंग, प्रसाद यांसारख्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री होते. त्यामुळे अनेक लघुउद्योजक, कारागीर आणि व्यापाऱ्यांच्या हाताला काम मिळते. वारी केवळ व्यापाऱ्यांनाच नव्हे, तर वाहतूक, हॉटेल, फुलविक्रेते, हातगाडीवाले, स्थानिक शेतकरी आणि इतर अनेक छोट्या व्यवसायांनाही आधार देते. ट्रॅक्टर, टेम्पो चालक, आणि तंबू व्यवस्थापकांना मोठा रोजगार मिळतो. त्यामुळे वारी ही श्रद्धेबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारी चळवळ ठरते. विशेष म्हणजे, गोपीचंदन, अष्टगंध, कुंकू आणि बुक्का यांसारख्या पारंपरिक वस्तूंना आजही मोठी मागणी आहे. आधुनिकतेच्या युगातही भारतीय संस्कृतीच्या परंपरेची मुळे किती घट्ट रोवली गेला आहेत, याचा दाखला मिळतो. तर मोबाईलमध्ये रमणारी तरूण पिढीही जेव्हा वारीत टाळ मृदुंगाच्या ताळावर बेभान झालेली दिसून येते तेव्हा ही वारी परंपरा कायम कायमच टिकून राहील असा विश्वास वाटतो. **राम कृष्ण हरी...!**

**लोकसंसद**

## पावित्र्याने भारलेली आषाढी एकादशी!

आज (२५ जुलै) आषाढी एकादशी आहे. समस्त महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पांडुरंगाची, श्रीविठ्ठलाची मोठ्या भक्तीभावाने पूजा, आराधना, व्रत व उपवास करण्याचा पवित्र दिवस. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून टाळ, मृदूंगाचा गजर व हरिनामाचा जयघोष करत पंढरपूरच्या दिशेने तहानभूक विसरून उन्हा-पावसाची, कशाचीही तमा न बाळगता गेल्या महिनाभरापासून खडतर प्रवास करत शेकडो मैल पायी निघालेल्या वारकऱ्यांचा आणि पांडुरंगाच्या भेटीचा दिवस! खरे तर गेल्या काही शतकांपासून चालत आलेली ही वारकरी परंपरा म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही, तर तो महाराष्ट्राचा सांस्कृतिक आणि सामाजिक समरसतेचा, बंधुभावाचा आत्मा आहे. लाखो वारकरी जात, पात, धर्म आणि श्रीमंत-गरीब असा कोणताही भेदभाव न बाळगता एकत्र पायी चालतात. विशेष म्हणजे आजच्या वेगवान डिजिटल युगातही आषाढी वारीचे आकर्षण जराही कमी झालेले नाही. कारण तरुण पिढीही मोठ्या संख्येने या वारीत दिसून येत आहे. या दिवशी देव चार महिन्यांसाठी निद्रिस्त होतात असा समज आहे, म्हणून आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी असेही म्हटले जाते. तसेच या एकादशीला पद्मा एकादशी असेही एक नाव आहे. या दिवसापासून चातुर्मासही सुरू होईल आणि २० नोव्हेंबरला देवउठनी एकादशीला (कार्तिकी एकादशी) चातुर्मास संपेल. पवित्र्याने भारलेल्या आषाढी एकादशीच्या या दिवशी सर्वांना सुख, समाधान लाभावे हीच त्या पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे**

**| दिनविशेष**

# पंढरपूरची वारी- एक आध्यात्मिक सोहळा

महाराष्ट्रातील सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे पंढरीची वारी. दरवर्षी आषाढी - कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केल्यानंतर विठुरायाचे झालेले मुखदर्शन साक्षात भगवंतप्राप्ती झाल्याचे सुख त्यांना देते. आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत.



एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।। असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।, असे म्हटले जाते. संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणाऱ्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते.

या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी!

**- मोक्षदा घाणेकर**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२५ जुलै
१)श्रीम.निशा सखाराम साळुंखे मु.कुरूळ, अलिबाग, दि.२५-७-१९४८
२)श्री.अशोक विष्णु जोशी मु.ब्राम्हणआळी, अलिबाग दि.२५-७-१९६३
३)श्री.रमेश शांताराम पाटील मु.मुळे, अलिबाग दि.२५-७-१९५९


**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहा नंद)
- मुख्य संपादक, कृषीवल


# काळींजे जि.प. शाळेची दुरवस्था

## ● विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका ● पालकांमध्ये काळजीचे वातावरण

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील काळींजे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाली असून, शालेय विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. शाळेच्या इमारतीच्या पिलरला मोठे तडे गेले असून, स्लॅबचा सिमेंट-काँक्रीटचा भाग ढासळू लागला आहे. अशा धोकादायक परिस्थितीत विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत असल्याने पालकांमध्ये काळजीचे वातावरण निर्माण झाले आहे.




काळींजे येथील या जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग आहेत. सध्या ३८ विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांना घडवण्यासाठी तीन शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांवर अपघाताची टांगती तलवार धरली गेली आहे. ग्रामीण भागातील मराठी शाळा टिकवणे आणि समृद्ध करणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु, या शाळांच्या दुरुस्तीकडे आणि सुरक्षेकडे होणारे दुर्लक्ष पाहता मराठी शाळांचा ऱ्हास करण्यास शासनच जबाबदार आहे का? असा प्रश्न आता पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

एकीकडे शासन मराठी शाळा वाचवण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या जाहिराती करते, तर दुसरीकडे प्रत्यक्ष ग्रामीण भागातील शाळांची अशी दुरवस्था झाली आहे. एखादी दुर्घटना घडण्यापूर्वी शिक्षण विभागाने व प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन काळींजे शाळेच्या नवीन इमारतीचा प्रस्ताव तात्काळ मंजूर करावा, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

> काळींजे शाळेची इमारत धोकादायक झाली आहे. पिलरला गेलेले तडे पाहता कोणतीही दुर्घटना घडू शकते. आम्ही यासंदर्भात पंचायत समिती आणि शिक्षण विभागाकडे पाठपुरावा केला आहे. शासनाने तातडीने या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून नवीन इमारतीसाठी निधी मंजूर करावा.
> – उदय पाटील, माजी सरपंच, काळींजे

# नेरळ विद्या भवन शाळेत वृक्षारोपण

**| नेरळ | प्रतिनिधी |**

धामोते येथील नेरळ विद्या भवन माध्यमिक विद्यालय शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ मुंबई शहर (अ) यांच्या वतीने शैक्षणिक उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत पर्यावरण रक्षणासाठी बहुगुणी वनौषधी कडुनिंब, जांभूळ, वड, पिंपळ यांसारख्या मानवी जीवनात ऑक्सिजनचे अनन्यसाधारण महत्त्व असणाऱ्या विविध फळाफुलांच्या ५० रोपांची लागवड शाळेच्या निसर्गरम्य वातावरणात करण्यात आली.



नेरळ विद्या भवनमध्ये आयोजित कार्यक्रमात जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ मुंबई शहर यांचे मुख्य संयोजक विनय पडवळ, मुंबई शहर(अ) तालुका प्रमुख, बेस्ट उपक्रमातील निवृत्त अधिकारी, लालबाग सेवा केंद्राध्यक्ष श्रीकांत विश्वनाथ खामकर यांच्या संकल्पनेतून १४ स्वयंसेवकांच्या उपस्थितीत करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गातील पाच विद्यार्थ्यांच्या गटात प्रत्येकी एक झाड जोपासण्यासाठी गट विभागणी करून वृक्ष संगोपन आणि वृक्षसंपदा संवर्धन करण्यासाठी शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी ढोल ताशा लेझीम पथकाच्या गजरात वृक्षदिंडी काढली. हे या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य ठरले.

# धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने वृक्षारोपण

**| सुधागड/पाली | प्रतिनिधी |**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने सुधागड तालुक्यातील उद्धर आणि वऱ्हाड येथे श्री सदस्यांनी वृक्षारोपण केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड करणे ही काळाची गरज आहे. ही गरज ओळखून दरवर्षी श्री सदस्य मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करतात आणि ते वृक्ष मोठे होईपर्यंत आवडीने त्या वृक्षांचे संवर्धनदेखील करतात. रविवारी ७५ श्री सदस्यांनी उद्धर रामेश्वर मंदिर आणि वऱ्हाड येथे एकूण १३६ वृक्ष लागवड करण्यात आली. यामध्ये वड, काजू, आंबा, कडुलिंब, करंज या प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.





# सभापतीपदी जाकीर अली हमदुले

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मांडला येथील मरहूम भाईसाहेब घये सभागृहात मंगळवारी (दि.२१) सुदर्शन सहकारी भात गिरण व भात खरेदी विक्री संघ लि. मांडला संस्थेच्या सभापतीपदाची निवड घेण्यात आली. सुदर्शन सहकारी भात गिरण व भात खरेदी विक्री संघ, मांडला संस्थेच्या रिक्त असलेल्या सभापती पदासाठी संचालक जाकीर अली हमदुले यांच्या एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक अधिकारी प्रमोद वाघमारे यांनी जाकीर अली हमदुले यांची सभापतीपदासाठी बिनविरोध निवड जाहीर केली. या निवडणुकीसाठी उपसभापती रफायल लुविज वेगस, संचालक संतोष कांबळी, संचालक प्रदिप धनावडे, संचालिका यास्मीन आताउल्ला घये, संचालक फैयाज दळवी, संचालिका लक्ष्मी थळे, संचालक निस्सार नाईक, तज्ञ संचालक मंगेश थळे व मॅनेजर अरुण गुरव यांनी सहभाग घेतला.

# ‘जीवन रक्षा अभियान’ अंतर्गत जनजागृती

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल रेल्वे स्थानक परिसरात वाढत्या अपघाती मृत्यू व जखमी होण्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने बुधवारी (दि.२२) ‘जीवन रक्षा अभियान’ अंतर्गत विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली. ही मोहीम सकाळी ९.३० ते ११ या वेळेत फलाट क्रमांक २/३ च्या सीएसएमटी बाजूस पार पडली. मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात पोलीस अधिकारी, कर्मचारी व होमगार्ड यांनी मानव साखळी उभारून प्रवाशांना रेल्वे



रूळ ओलांडण्याचे धोके समजावून सांगितले. लोकल पकडण्याच्या घाईत अनेक प्रवासी जीव धोक्यात घालून ट्रॅक ओलांडत असल्याने त्यांना सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

मोहीमेदरम्यान ‘अवाजवी धाडस टाळा, जीवन अनमोल आहे’, ‘लाईन क्रॉसिंग करू नका, घरी कोणीतरी तुमची वाट पाहत आहे’, ‘धावती लोकल थांबत नाही, तुम्ही थांबा’, ‘रेल्वेचे नियम पाळा, अपघात टाळा’ अशा प्रभावी घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. तसेच रेल्वे प्रवासादरम्यान स्टंटबाजी टाळण्याचे, संशयास्पद वस्तूंना हात न लावता तात्काळ रेल्वे पोलिसांना माहिती देण्याचे आणि अडचणीच्या प्रसंगी जीआरपी हेल्पलाइन क्रमांक १५१२ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

या मोहिमेत दोन पोलीस उपनिरीक्षक, सुमारे ३० पोलीस अंमलदार व १० होमगार्ड सहभागी झाले होते. प्रवाशांनीही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत रेल्वे पोलिसांच्या जनजागृतीचे स्वागत केले.

‘वेळ वाचविण्यासाठी आयुष्य धोक्यात घालू नका. सुरक्षित प्रवास हीच खरी जबाबदारी आहे,’ असा संदेश देत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी सर्व रेल्वे प्रवाशांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले.

# कोतवालवाडी ट्रस्टकडून फिरता दवाखाना

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील आरडे येथे असलेल्या गोरक्षनाथ मठ परिसरासाठी कोतवाल वाडी ट्रस्टकडून फिरता दवाखाना सुरू करण्यात आला आहे. अशी सेवा सुरू झाल्याने येथील स्थानिक रहिवाशी यांच्या आरोग्याची सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

कर्जत तालुक्यातील बहुतांश भाग शहरापासून दूर असल्याने त्यांना वैद्यकीय सेवा पोहोचवणे तसेच वैद्यकीय सेवेसाठी दूर प्रवास करून जावे लागत आहे. छोट्यामोठ्या आजारांसाठी जवळ उपचार मिळावे, यासाठी गेल्या सहा महिन्यापासून उत्तम शेळके यांनी डॉ. संजय भामरे यांच्याशी संपर्क साधून प्रयत्न करत होते.



त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून २१ जुलै २०२६ रोजी गोरक्षनाथ मठ आढे येथे लार्सन अँड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, जे व्ही गोकल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व कोतवालवाडी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने फिरता दवाखाना सुरू करण्यात आला आहे.

आरोग्य शिबिरामध्ये रुग्णाला सर्व सेवा आणि औषधे मोफत आहेत. त्यामध्ये आरोग्य तपासणी (वजन, रक्तदाब व रक्त तपासणी) डायबेटीस (मधुमेह) तपासणी, अॅनेमिया तपासणी (शरीरातील रक्ताचे प्रमाण तपासणे) औषधे मोफत वाटप करण्यात आले.

यामध्ये ६० महिला व पुरुष यांनी पहिल्याच दिवशी फिरत्या दवाखान्याचा लाभ घेतला. आर्डे, आसे, माले, फराट पाडा, पोंढ्याची वाडी, खडक वाडी, खरोड वाडी व परिसर यांना फिरत्या दवाखान्याचा लाभ मिळणार आहे.

फिरत्या दवाखान्यासाठी एक मोठी अॅम्बुलन्स, त्यासोबत डॉक्टर संजय भामरे, रोहित बांगारे, सुनिता आडे व वाहनचालक सागर यांच्या संपूर्ण टीमने नागरिकांना वैद्यकीय सेवा पुरवल्याने नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

# शैक्षणिक साहित्य वाटप



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण पूर्व विभागातील रा.जि.प. शाळा पाले येथे शेवेगावचे शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते मयुर सुतार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पाले प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व छत्री वाटप करण्यात आले. यावेळी सत्कारमूर्ती मयूर सुतार यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष मेनन म्हात्रे पत्रकार तुळशीदास पाटील सामाजिक कार्यकर्ते विजय म्हात्रे शिक्षणप्रेमी तनवी पाटील, निधी पाटील तसेच शाळेच्या उपशिक्षिका चैताली इत्यादींच्या उपस्थित मयुर सुतार यांचा वाढदिवस साजरा करून विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले.

## शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा | निलेश घाटवळ यांचे जनतेला आवाहन

# मुख्यमंत्री जन आरोग्य अभियानाला सुरुवात

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मुरुड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्ली-मांडला येथे मुख्यमंत्री जन आरोग्य अभियानाला सुरुवात करण्यात आली. हे अभियान तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षयकुमार सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्या ज्योती नागांवकर, मुरुड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, सरपंच सपना पाटील, वैद्यकीय अधिकारी अक्षय पाटील, वैद्यकीय अधिकारी आशिया खान,




आरोग्य सहाय्यक गणेश शिंदे, तालुका सिकलसेल सहाय्यक शालिकराव पावरा, आरोग्य सेवक राजेंद्र चुनेकर, आरोग्य सहाय्यक परिक्षित कोळी, आरोग्य सहाय्यक अमित करमळे, आरोग्य साहाय्यिक जयमाला वाघमारे, औषध निर्माता अधिकारी अनिकेत हजारे, सर्व आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, गटप्रवर्तक आशा वर्कर, इतर कर्मचारी, स्थानिक नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर अक्षय सोळंके राष्ट्रीय कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी सर्व लाभार्थी रुग्णांची आरोग्य तपासणी, विविध आजारांचे निदान, आवश्यक उपचार, आरोग्यविषयक जनजागृती तसेच शासकीय आरोग्य योजनांची माहिती देण्यात आली.

मुरुड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ यांनीदेखील आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळणे हा शासनाचा प्राधान्यक्रम आहे. या अभियानामुळे आरोग्य सुविधा अधिक प्रभावीपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतील. तरी या शिबिराच्या जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती निलेश घाटवळ यांनी जनतेला करण्यात आले.

मुख्यमंत्री जन आरोग्य अभियानामध्ये आरोग्य तपासणीमध्ये डोळे तपासणी, गरोदर माता तपासणी, मधुमेह तपासणी, सिकलसेल तपासणी, क्षयरोग तपासणी, कुष्ठरोग तपासणी, गर्भवती माता तपासणी, रक्त तपासणी, असंसर्गजन्य आजाराची तपासणी, एचआयव्ही तपासणी अशा आजारांची तपासणी करण्यात आली.

# निवडक



## ‘व्यसन चांगल्या गोष्टीचे करा’

**अलिबाग :** स्पर्धा विश्व अकॅडमी अलिबाग येथे अॅड. निहा अनिस राऊत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून व्यसनमुक्ती संदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लायन्स क्लब श्रीबागच्या एम. जे. एफ. अॅड. निहा अनिस राऊत, डी. सी. ग्लोबल क्लॉज यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी दारू, तंबाखू या व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी माहिती देत प्रत्येकाने व्यसन चांगल्या गोष्टीचे करा, अभ्यासाचे करा, व्यायामाचे करा, एकमेकांना मदत करण्याचे करा, असे बहुमोल मार्गदर्शन केले. तर महाराष्ट्राच्या गायिका अॅड. कलाताई पाटील यांनी भगवत गीतेचे महत्त्व उपस्थित युवक- युवतींना सांगितले. या कार्यक्रमास प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी व स्पर्धा विश्व अकॅडमीचे विद्यार्थी उपस्थित होते.



## ‘अजित हरित अभियान’ अंतर्गत वृक्षारोपण

**माणगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि.२२) जावळी येथे ‘अजित हरित अभियान’ (एक वृक्ष : हरित भविष्य) अंतर्गत भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती वरदा सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. ‘‘झाड लावू... झाड जगवू... हरित महाराष्ट्र घडवू...’’ हा संदेश देत मान्यवरांच्या हस्ते विविध रोपांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माणगाव, ग्रुप ग्रामपंचायत लोणशी आणि गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जावळी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा आणि तीर्थस्वरूप श्री. नानासाहेब धर्माधिकारी इंग्लिश स्कूल, जावळीच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वृक्षारोपणाच्या माध्यमातून अजितदादांच्या विकासविचारांना वंदन करत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

## चौक येथे मोफत नेत्र तपासणी



**रसायनी :** चौक येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. याचा फायदा अनेकांनी घेतला. रोटरी क्लब पनवेल ऑफ मिडटाऊन, जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था, चौक आणि लक्ष्मी आय केअर क्लिनिक पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने हे भव्य मोफत नेत्र तपासणी शिबीर पार पडले. हे शिबीर जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ.मिलिंद भगत, राजेंद्र ठाकरे,रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ संचालक रो.सुनील कुरूप, रो. रेश्मा कुरूप, लक्ष्मी आय क्लिनिकच्या डॉ. अश्विनी बोडके, मल्लिका थेवर, रो. विजय निगडे, ज्योती माने, माजी उपसरपंच गणेश कदम, रोटरी क्लब पनवेल ऑफ मिडटाऊनचे अध्यक्ष रो. प्राचार्य प्रशांत माने यांच्या उपस्थितीत पार पडले. याप्रसंगी ४६ महिला व ३६ पुरुष यांची नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी १९ जणांना चष्म्याचे वाटप करण्यात आले.

## हर्षद पाटील अध्यक्षपदी



**अलिबाग :** लायन्स क्लब ऑफ अलिबाग मांडवा यांचा लायन वर्ष २०२६-२७ च्या पदग्रहण, शपथविधी व नवीन सदस्य प्रवेश सोहळा क्षात्रैक्य समाज हॉल, कुरुळ येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याप्रसंगी सोहळ्यात लायन हर्षद पाटील यांनी अध्यक्षपदाची, लायन मृदुला राऊत यांनी सचिवपदाची आणि लायन निकिता पाटील यांनी खजिनदारपदाची शपथ घेतली. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रांतपाल लायन अनिल जाधव उपस्थित होते. माजी प्रांतपाल, मल्टिपल कौन्सिल चेअरमन पीएमजेएफ लायन फिरोज कात्रक यांच्या हस्ते नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण व शपथविधी सोहळा पार पडला. तसेच जीएसटी समन्वयक पीएमजेएफ लायन अनिल म्हात्रे यांनी नवीन आठ सदस्यांना लायन्सची शपथ देऊन क्लबमध्ये सन्मानपूर्वक प्रवेश दिला.

## शिवशांती स्नेहालय संस्थेची सभा

**अलिबाग :** शिवशांती स्नेहालय सेवाभावी संस्था, वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्र, अलिबाग या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.१९) भारती दीनानाथ तरे सभागृह, श्रीबाग येथे पार पडली. या सभेत संस्थेचा १३ वा वर्धापनदिन व वार्षिक अहवाल सादर करण्यात आला. यादरम्यान, संस्था आता यशस्वी वाटचाल करत १२व्या वर्षात पदार्पण करत असून, आर्थिक अडचणींची शर्यत पार करून वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्राची इमारत वाडगाव येथे खऱ्या अर्थाने भक्कमपणे उभी राहत आहे, हीच संस्थेची खरी ताकद असल्याचे प्रतिपादन यावेळी अध्यक्ष डॉ. सुभाष शिवराम म्हात्रे यांनी केले. संस्थेची स्थापना करण्यामागे अध्यक्ष डॉ. सुभाष शिवराम म्हात्रे यांची सेवाभावी वृत्ती असून, गोरगरिबांसाठी आपले उरलेले आयुष्य मार्गी लावावे या उदात्त हेतूने त्यांनी या संस्थेची पायाभरणी केली होती. आज या संस्थेला ११ वर्षे पूर्ण झाली असून संस्था यशस्वीरीत्या प्रगतीपथावर वाटचाल करत आहे. सभेमध्ये संस्थेच्या वास्तूच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. याप्रसंगी समर्थ फाऊंडेशनच्या अध्यक्षा अॅड. मनस्विनी मोहिते यांनी वृद्धाश्रमासाठी ५० हजार रुपयांची देणगी जाहीर करून संस्थेच्या उपक्रमास मोलाचा हातभार लावला.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थि मौजे बोर्झे, ता. पेण, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-बोर्झे, ता. पेण, जि. रायगड येथिल**

| मालक/ कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १. धर्मुबाई भाई म्हात्रे<br>२. के. पांडुरंग आबू पाटील मयत तर्फे वारस-<br>दयानंद पांडुरंग पाटील<br>नलिनी संदीप पाटील<br>चांदी नरेश म्हात्रे<br>सुलोचला कृष्णा मोकल<br>धनुबाई विठ्ठल म्हात्रे | ७१ | १ | ०-०५.८० | ०.४९ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील धर्मुबाई भाई म्हात्रे वगैरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि:२५/०७/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता: फ्लॅट नं.ए-२, जयनगर को.ऑप हो.सोसा. लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे आधारणे, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल संजय सुधीर पडवळ यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.विजय भानुदास पाटील यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| गाव | सर्व्हे नं./गट नं./ हि.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| आधारणे | २९/अ/११ | ५.२८.००<br>पो. ख.१.७४.००<br>एकुण क्षेत्र ७.०२.०० | ७.४९ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी खरेदीखत लिहुन देणार श्री.विजय भानुदास पाटील यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.२०.०० हे.आर. आकार ०.२८ रु.पै. इतके क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप:- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण:- पेण
दि:-२४/०७/२०२६

**हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलिस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो.नं ९८२२०३०३८९

## उपविभागीय अधिकारी, रोहा उपविभाग, रोहा यांच्या न्यायालयात जाहीर नोटीस

आरटीएस विलंबमाफी क्र. ६१/२०२६

१. श्री. भवत कर्मतीभाई डोडिया
२. श्री. भावेश जयंतीभाई डोडिया,
दोघेही रा. जय धामनिवास, वृंदावन नगर मोगलवाडी, खोपोली, ता. खालापूर
जि. रायगड, महाराष्ट्र - ४१०२०३ ... अपिलार्थी

विरुद्ध

१. स्टार इंडिया प्रोजेक्ट कंपनी
कार्यालय नं. १८ मोरया र न्यू लिंक रोड,
अंधेरी वेस्ट, मुंबई ४०००५३
२. ॲशले कॉन्सेसीओ भागिदार स्टार इंडिया प्रोजेक्ट कंपनी
रा. स्टार इंडिया प्रोजेक्टेड,
क्रेस्टीक प्लाझा, ७ वा माळा, इनफरनिटी मॉल,
अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००१३
३. प्रदीप अमरकुमार सज्जन भागिदार स्टार इंडिया प्रोजेक्ट कंपनी
रा. ७०८, क्रिस्टल पॅराडाईस ऑफलिंक रोड
वीरा देसाई रोड, अंधेरी वेस्ट, मुंबई ४०००५३
व रा. ४६०, सेक्टर ३०, फरीदाबाद, हरियाणा १२१००३ ... उत्तरार्थी
४. सुदाम दशरथ मोहिते
रा. परळी, ता. सुधागड, जि. रायगड
५. यशानंद मधुसूदन पाटील,
रा. फ्लॅट बी/१०, जागृती बिल्डींग राज कुंज सी.एच.एस.
चेंबूर, मुंबई- ४०० ०७४
६. नेहा भिमराव पाटील,
७. वंदना भिमराव पाटील,
अ.क्र. ६ व ७ रा. रू. नं. आर-२०४,
रोव हाऊस गांधी हॉस्पिटल जवळ, सेक्टर ४,
नवी मुंबई, ऐरोली ठाणे, महाराष्ट्र- ४०० ७०८

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते कि, अपिलार्थी यांनी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये मौजे माणगाव बु., ता. सुधागड येथील ग. न. २०२ या जमीन मिळकतीबाबत फेरफार क्र. ७६०, ८४५, ८४६ च्या विरोधात अपील दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक ०६/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वत:अथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमुद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.
दि. २२/०७/२०२६

**उपविभागीय अधिकारी**
**रोहा विभाग रोहा**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे वाघाची वाडी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील परिशीष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल १ श्री. रामचंद्र विठठल चपळहगावकर, २.श्री.अशोक कुमार महाबळ शेटटी, सर्व रा.मौजे पनवेल, तालुकापनवेल, जिल्हा-रायगड यांचेकडून नोंदणीकृत खरेदी खताने मालकीहक्काने कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत

**:: मिळकतीचे वर्णन ::**
**मौजे - वाघाची वाडी, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गट नं. व उपविभाग क्र | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ५/१/४ | १४.५८.८०<br>पोट ख. २.४८.२०<br>एकुण १७.०७.०० | २४.०४ |
| वर नमूद मिळकतीपैकी श्री १ श्री. रामचंद्र विठठल चपळहगावकर, २. श्री.अशोक कुमार महाबळ शेटटी यांचे मालकीचे एकुण क्षेत्र | १०.५८.८०<br>२.४८.२०<br>एकुण १३.०७.००<br>क्षेत्रापैकी खरेदी क्षेत्र<br>०.६०.०० | १७.४५ |
| एकुण खरेदी करावयाचे क्षेत्र | ०.६०.०० गुंठे | |

सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशीष्टातील वर्णन केलेल्या मिळकती मधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वाहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारे हरकत, तक्रार दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत तक्रार दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा वैगरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशीष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यांनंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक :- २४/०७/२०२६

**श्री. किशोर अ.धाकड**
ॲडव्होकेट

## अलिबाग नगरपरिषद

**निविदा सूचना**

अलिबाग नगरपरिषदेकरीता खालील प्रमाणे इच्छुक पुरवठादारांकडून ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषदेतील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना पावसाळी रेनकोट पुरविणेबाबत. | २७/०७/२०२६ ते ०४/०८/२०२६ वेळ: सायं ०४.०० पर्यंत |

वरील प्रमाणे इच्छूक पुरवठादाराकडून विहित नमुन्यामध्ये ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सादर करताना प्रत्येकाचे स्वतंत्र निविदा सादर करणे आवश्यक आहे. निविदे संबंधित अधिक माहिती अलिबाग नगरपरिषद आरोग्य विभागत उपलब्ध आहे.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ ( डी ११ )
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबाग चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०३.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २०.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री सूर्यकांत यशवंत खोत यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक २८.०९.२०२० पर्यंतची रक्कम रुपये ४,९१,३३८/- व दिनांक ०१/०४/२०२० पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १३ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिणित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे अलिबाग नगर परिषद ता. अलिबाग मधील श्री सूर्यकांत यशवंत खोत यांच्या नावे असलेली भूखंड क्र इ - १०८ व मिळकत क्र Z1ASB22611 येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक २८.०९.२०२० पर्यंतची रक्कम रुपये ४,९१,३३८/-व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री सूर्यकांत यशवंत खोत**

मौजे अलिबाग नगर परिषद ता. अलिबाग हद्दीतील श्रीबाग क्षेत्र विकास योजना क्र २ मधील भूखंड क्र इ-१०८ क्षेत्र ५० चौ मी जागा व त्यावर बांधकाम केलेले श्री सूर्यकांत यशवंत खोत यांच्या नावे असलेली मिळकत क्र Z1ASB22611 क्षेत्र २९३.६३ चौ फु हे घर

स्थळ : अलिबाग
दिनांक : २४.०७.२०२६

सही/-
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११(डी ११ )
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबाग चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०३.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २०.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री सूर्यकांत यशवंत खोत यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक २८.०९.२०२० पर्यंतची रक्कम रुपये ७७१३५/- व दिनांक ०१/०४/२०२० पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १३ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे अलिबाग नगर परिषद ता. अलिबाग मधील श्री सूर्यकांत यशवंत खोत यांच्या नावे असलेली भूखंड क्र इ-१०८ व मिळकत क्र Z1ASB22611 येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक २८.०९.२०२० पर्यंतची रक्कम रुपये ७७१३५/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री सूर्यकांत यशवंत खोत**

मौजे अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग हद्दीतील श्रीबाग क्षेत्र विकास योजना क्र २ मधील भूखंड क्र इ-१०८ क्षेत्र ५० चौ मी जागा व त्यावर बांधकाम केलेले श्री सूर्यकांत यशवंत खोत यांच्या नावे असलेली मिळकत क्र Z1ASB22611 क्षेत्र २९३.६३ चौ फु हे घर

स्थळ : अलिबाग
दिनांक : २४.०७.२०२६

सही/-
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो, माणगाव यांचे न्यायालयात**

प्रस्ताव मृ. क्र. १०९/२०२६

१. सागर जनार्दन गोरेगावकर,
रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड ... अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड ... सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, गोरेगाव. ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने मृत्यू नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी भिमा रामजी गोरेगावकर, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. ०८/१०/१९८२ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

भिमा रामजी गोरेगावकर, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. ०८/१०/१९८२ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रामपंचायत गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत गोरेगाव, ता. माणगाव यांनी त्यांच्या मृत्यूची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच भिमा रामजी गोरेगावकर, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या मृत्यूची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत गोरेगाव यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास भिमा रामजी गोरेगावकर, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. ०८/१०/१९८२ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव
दिनांक : १४/०७/२०२६.

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार माणगाव**

## जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड व नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं. के ६२९/१ अे, क्षेत्र १२०.४ चौ.मी. सत्ताप्रकार अे, ६२८, क्षेत्र ६२.८ चौ.मी. सत्ताप्रकार अे, ६२८/१ क्षेत्र १९६.५ चौ.मी. सत्ताप्रकार अे, ६२९/अे, क्षेत्र १२२.० चौ.मी. सत्ताप्रकार अे, ६२९/१/अे/१, क्षेत्र ३.०७ चौ.मी. सत्ताप्रकार सी, ६२९/१ब, क्षेत्र १२८.८ चौ.मी., या मिळकती मधील प्रस्तावित ''कृष्णा/कृष्ण मंदिर - ए को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी'' या इमारती मधील तिसऱ्या मजल्या वरील निवासी सदनिका क्र.३०१ क्षेत्र ६३० चौ.फुट बिल्टअप (५८.५२ चौ.मी.) (ज्यास नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000001390 जुना मालमत्ता क्र. Z1MKT001392 असे वर्णन आहे) हि मिळकत श्री. सतीश रमेश भगत, कु.भावेश सतीश भगत व कु. मिहीर सतीश भगत सर्व मु. ए-२/१०४, जयदिप पार्क, माझीवाडा विलेज रोड, फातीमा चर्च च्या जवळ, माझीवाडा, ठाणे ४००६०१ यांचे मालकीची असुन त्यांनी माझे आशिल यांस सोबत कायम खरेदी देण्याबाबत नोंदणीकृत साठेकरार केला आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिल यांस दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिन, साठेकरार, वगैरे दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल हे सदर मिळकती संदर्भातील खरेदीखत पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख २२.०७.२०२६

**ॲड. विनोद गजानन माळी**
मु. कुबेराक्षे, २०२, बी विंग, मधूर मार्ट समोर,
मारूती नाका, पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम १९( डी ११ )
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा हाशिवरे चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०४.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २४.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री प्रल्हाद कृष्णा कोळी यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ११.११.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ३,१८,३५६/- व दिनांक १३/०४/२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज ११ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे ग्रामपंचायत कोप्रोली ता. अलिबाग मधील श्री प्रल्हाद कृष्णा कोळी यांच्या नावे असलेली मिळकत क्र ५६१ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ११.११.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ३,१८,३५६/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री प्रल्हाद कृष्णा कोळी**

मौजे ग्रामपंचायत कोप्रोली ता. अलिबाग मधील श्री प्रल्हाद कृष्णा कोळी यांच्या नावे असलेली मिळकत क्र ५६१ क्षेत्र ६५९ चौ फु हे घर

स्थळ : अलिबाग
दिनांक : २४.०७.२०२६

सही/-
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११(डी ११ )
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबाग चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०३.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २०.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री सागर रमेश पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ०३.१२.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ४,२७,७००/- व दिनांक ०१/०४/२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज ११ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे ता.अलिबाग मधील श्री रमेश मणिराम पाटील यांच्या नावे असलेली मिळकत क्र ४१२ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ०३.१२.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ४,२७,७००/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री सागर रमेश पाटील**

मौजे ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे ता. अलिबाग मधील श्री रमेश मणिराम पाटील यांच्या नावे असलेली मिळकत क्र ४१२ क्षेत्र ४८३ चौ फु हे घर

स्थळ : अलिबाग
दिनांक : २४.०७.२०२६

सही/-
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे आंबिवली त. कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खाली सविस्तरपणे नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे निश्चित ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आंबिवली त. कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड**

| जमिन मालकांचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| रत्नमाला नारायण पाटील | १/२/अ | ०-७१-४०<br>पो.ख. ०-१६-२०<br>एकुण ०-८७-६० | ८.३१ |

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि. २१/०७/२०२६

**विरेंद्र त्रिं. कुळकर्णी**
ॲडव्होकेट, पनवेल
पत्रव्यवहाराचा पत्ता:- फ्लॅट नं. १/५०१-५०२, नील पार्क,
तालुका पोलिस स्टेशनजवळ, ता. पनवेल,
जि. रायगड. ४१० २०६, फोन नं. ०२२३१८५०६०६

## जाहीर नोटीस
**अलिबाग येथील प्रमुख जिल्हा न्यायाधीश रायगड यांचे कोर्टात,**

नि. ६०/ ड
दिवाणी अपील क्रमांक २४४/२००७
पुढील तारीख १८/०८/२०२६

अनंत घारपुरे वगैरे. ....... अपेलंट

**विरुद्ध**

मंजुळाबाई पानसरे वगैरे. ....... रेस्पॉडंट

अपेलंट यांनी सदरील अपिल अलिबाग येथील दिवाणी कोर्टाने रेग्युलर मुकदमा १४४/१९९२ या कामामध्ये दिलेल्या निर्णयाविरुद्ध दाखल केले आहे.

सदर अपिलातील प्रस्तावित रेस्पॉडेंट क्रमांक २/१ समता अमित पानसरे आणि प्रस्तावित रेस्पॉडंट क्रमांक २/३ संचित अजित पानसरे यांस शिवम् सोसायटी, ब्राह्मण आळी, येथे नोटीस पाठविली असता बजावणी झालेली नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित रेस्पॉडंट क्रमांक २/२ श्वेता मिलिंद राऊत यांस श्रीवर्धन येथे नोटीस पाठविली असता बजावणी झालेली नाही व त्या मुंबई येथे रहात असल्याबाबत बेलिफ रिपोर्ट आला आहे.

तरी सदर प्रस्तावित रेस्पॉडंट यांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येत आहे की, या अपिलाची पुढील तारीख १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या कोर्टात स्वतः अथवा प्राधिकृत व्यक्तीमार्फत त्यांनी हजर व्हावे व आपले म्हणणे दाखल करावे. त्याचप्रमाणे बनावणीकरिता स्वतःचा पत्ता दाखल करावा.

सदर तारखेस हजर होण्यास म्हणणे देण्यास व पत्ता दाखल करण्यास कसुरी केल्यास सदर प्रस्तावित रेस्पॉडंट यांचे नांव अपिलाचे कामी रेस्पॉडंट क्रमांक २ यांचे वारस म्हणून समाविष्ट केले जाईल आणि/अथवा अन्य योग्य तो हुकुम करणेत येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १५/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने दिले.

| | | |
|---|---|---|
| **लिपीक**<br>**जिल्हा न्यायालय,**<br>**अलिबाग -रायगड** | **कोर्टाचा शिक्का** | **अधिक्षक**<br>**जिल्हा न्यायालय,**<br>**अलिबाग- रायगड** |

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-उमरोली ता.कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मंगेश बाळाराम निमणे | ५८ | १/ब | ०-१६-००<br>यापैकी<br>०-०८-०० | ० = १० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

हे सर्वास कळावे.
ठिकाण :- नेरळ
दिनांक :- २५/७/२०२६

**ॲड अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट ब्लॉक नं -१०१
नेरळ ता. कर्जत जि. रायगड
मो. ९८८१२७९८१७


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. **मोबाईल** : ७५५९१८४६१२
- **वाडगाव अलिबाग येथे विलावर** राहण्यासाठी एक जोडपे हवे आहे. कृपया पुढील नंबर वर संपर्क करावा. ९८२२९३८४४४
- **अलिबाग साईइन रिसॉर्ट येथे** बँक ऑफिससाठी रिटायर व्यक्ती Computer ज्ञान आवश्यक व वेटर पाहिजेत. अर्जासह समक्ष भेटा साई इन रिसॉर्ट, चोंढी, अलिबाग.
- **८-१५ ते १० या** वेळात घरकामासाठी बाई पाहिजे. **संपर्क**-९२८४५५५३१४

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**



## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाचे निर्णय आज घ्यावेत. धनलाभाचे योग आहेत. विद्यार्थ्यांची विद्याभ्यासात प्रगती होईल.
- **वृषभ** : कौटुंबिक वाद–विवाद संभवतात. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **मिथुन** : महत्त्वाच्या कामांना विलंब नको. आर्थिक स्थिती साधारण राहील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **कर्क** : व्यवसायात समाधान लाभेल. जिद्द आणि चिकाटीनं वाटचाल करावी. नव्या ओळखी कामी येतील.
- **सिंह** : कौटुंबिक समस्या ताण वाढवतील. वाहन, यंत्राचा वापर काळजीनं करा. चोरी, नुकसान संभवतं.
- **कन्या** : कार्याला नवी दिशा मिळेल. नोकरीत कामाचा ताण राहील. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **तूळ** : नवे विचार कृतीत येतील. अवास्तव अपेक्षा ठेवू नका. स्थावर प्रश्नात तडजोडीवर भर द्यायला हवा.
- **वृश्चिक** : इतरांचं सहकार्य लाभेल. संततीबाबत महत्त्वाचे निर्णय घेता येतील. थोरामोठ्यांच्या भेटी होतील.
- **धनु** : व्यवसायात अनुभवींचा सल्ला घ्यावा. डोळ्यांचे विकार संभवतात. प्रक्रिया उद्योगात नवे करार होतील.
- **मकर** : शैक्षणिक क्षेत्रात अनुकूलता राहील. सरकारी कामांना गती येईल. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल.
- **कुंभ** : व्यवसायात बदलांना चालना मिळेल. प्रवासात नुकसान संभवतं. आर्थिक बाबतीत काळजी घ्यावी.
- **मीन** : वैवाहिक सौख्य लाभेल. मित्र–मैत्रिणींच्या भेटी होतील. ग्रहमानाच्या अनुकूलतेचा लाभ घ्यावा.

## दिन विशेष

### २५ जुलै

२०१४ : ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रियनाथ पाठक यांचा अपघाती मृत्यू.
२०१५ : आंबेडकरी चळवळीचे अग्रदूत, माजी राज्यपाल रा.सू.गवई यांचे निधन.
२०१७ : देशाचे चौदावे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा शपथविधी संपन्न. राष्ट्रपती म्हणून कारकिर्दीला सुरूवात.
२०१८ : पाकिस्तानमध्ये मतदानावेळी हिंसाचार. क्वेट्टातील आत्मघाती बाँबस्फोटात ३५ ठार.

## टेक फन

### मस्त पॉकेट एसी

दोस्तांनो, उन्हाळ्यात खूप उकडतं. घरात एसी लावला तरी बाहेर गेल्यावर घामाच्या धारा लागतात. अशावेळी आपण 'थंडाथंडा कूलकूल' रहाण्याचे पर्याय शोधत असतो. काहीतरी गारेगार प्यायलं जातं. पण उन्हाळ्यात एखादा एसी आपल्या शरीरावरच बसवला तर... काय धम्माल येईल ना! उन्हाळ्यात घरी बसावं लागणार नाही. बाहेर गेल्यावरही गारेगार वाटेल. सोनी कंपनीने मोबाइलपेक्षाही लहान आकाराचा एसी तयार केला आहे. हा एसी कपड्यात अगदी सहजपणे बसवता येतो. 'रेऑन पॉकेट' असं याचं नाव आहे. हा एसी ठेवण्यासाठी विशिष्ट प्रकारची पिशवी बनवण्यात आली आहे. हा एसी मानेच्या खाली कुठेही बसवता येईल. 'रेऑन पॉकेट एसी' बनवण्यासाठी 'थर्मोइलेक्ट्रिक पेल्टियर'चा वापर करण्यात आला आहे. हा घटक खूप लवकर थंड किंवा गरम होतो. या स्मार्ट एसीमध्ये लिथियम बॅटरी बसवण्यात आली असून ती फक्त दोन तास चार्ज करावी लागते. यानंतर संपूर्ण दिवस एसी सुरू रहातो. हा एसी सध्या जपानमध्ये विक्रीसाठी उपलब्ध असेल. हा एसी लावल्यानंतर छान गारेगार वाटेल एवढं नक्की!

## आरोग्यमंत्र

### पीसीओडीमुळे...

गर्भाशयामधील बीजांडाच्या भागी पाण्याच्या बुडबुड्यासारख्या ग्रंथी तयार होण्याची शारीरिक समस्या म्हणजेच वैद्यकीय भाषेत पीसीओडी. हा त्रास असणाऱ्या महिलांची मासिक पाळी वेळेवर येत नाही. वेळेवर येत असली तरीही त्यातून स्त्रीबीज बाहेर पडत नाही. काही कारणांमुळे ही समस्या उद्‌भवते. त्यात आळशीपणाने फक्त बसून राहणं, सतत मेद वाढवणारे पदार्थ खाणं, फास्ट फूड, तळलेले पदार्थ, जंक फूड अतिप्रमाणात खाणं, दिवसा झोपणं आणि रात्री उशीरापर्यंत जागणं, सतत अपचन, पोट साफ न होणं, व्यायाम न करणं, वजन वाढणं आदींचा समावेश असू शकतो. काही लक्षणांवरुन ही समस्या ओळखता येते.



✻ मासिक पाळीमध्ये अनियमितता. ✻ मासिक पाळी उशिरा येणं. ✻ मासिक पाळी आल्यानंतर अंगावरून जास्त जाणं. ✻ वजन वाढणं. ✻ चेहऱ्यावर, पोटावर लव येणं, चेहऱ्यामध्ये बदल होऊन तो पुरूषी दिसणं. ✻ त्वचा रुक्ष होणं. शरीरामध्ये जडपणा येणं. याखेरीज पीसीओडी झालेल्या युवती वा महिलांच्या वर्तनातली बदल दिसू लागतो. लाजाळूपणा, माया, प्रेम कुठे तरी कमी होत जातं. पीसीओडी झालेल्या स्त्रियांमध्ये पुरुषी अहंकार यायला लागतो. हे मानसिक बदल घडतात ते प्रोजेस्टेरॉनच्या वाढलेल्या प्रमाणामुळे. यावरूनच पेशंटला बघितल्यानंतर वा बोलण्यातूनही पीसीओडीचा आजार असल्याचं समजतं.

## स्टाईल स्टेटमेंट

### आरामदायी विमानप्रवासासाठी...

✻ विमानातल्या तापमानात सातत्याने बदल होत असतात. त्यामुळे पेहरावात लेअरिंगला प्राधान्य द्या. लेअरिंगमुळे तुम्ही विमानातलं थंड तापमान सहन करू शकाल. स्कार्फ, आरामदायी जॅकेट्स आणि सॉक्सचा वापर करून लेअरिंग करा. फार जाड किंवा वजनदार जॅकेट्स टाळा.

✻ प्रवासादरम्यान पॉलिस्टर, रेयॉन, नायलॉनचे कपडे घालणं टाळा. अशा कपड्यांमुळे तुम्हाला त्रास होऊ शकतो. खूप अस्वस्थ वाटू शकतं. असे कपडे घाम शोषून घेत नाहीत. त्यामुळे कॉटन, लिननच्या कपड्यांना प्राधान्य द्यावं. असे कपडे आरामदायी असतात.

✻ बैठ्या प्रवासामुळे शरीराला नैसर्गिकरित्या सूज येत असल्याने घट्ट कपडे घालू नका. लेगिंग्ज, जीन्सऐवजी मोकळ्याढाकळ्या कॉटन पँट्स, ट्राउझर्स, ट्रॅक पँट्स कॅरी करता येतील. यामुळे पायांमध्ये गोळे येणार नाहीत. टॉप आणि बॉटम सैलसर असेल याची काळजी घ्या.

## पंचांग

**शनिवार, २५ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
आषाढ शु. ११ (आषाढी एकादशी),
चंद्रराशी : वृश्चिक,
नक्षत्र : ज्येष्ठा, योग : ब्रह्मा,
सूर्योदय ६.१५ सूर्यास्त ७.१५

## फॉरवर्ड्स

**गज़ब क़ी धूप हैं हमारें शहर में यारों...**

**लेक़िन दिल क़िसी क़ा भीं पिघलतां देख़ा नहीं हमनें...!**

## भटकंती

कळसूबाई परिसरात सकाळी पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येत असतो. सूर्योदयाचा सुंदर नजारा दिसतो. सकाळची सूर्यकिरणं अंगावर झेलत आपण मस्तपैकी ट्रेकिंग करू शकतो.इथे तुम्ही वन्यजीवनाचा आनंद लुटू शकता. कळसूबाई–हरिश्चंद्रगड अभयारण्याला भेट द्यायला विसरू नका. कसळूबाई मंदिरातही जा. बारी या गावापासून कळसूबाईच्या ट्रेकिंगला सुरूवात होते. भंडारदऱ्यापासून हे गाव दहा किलोमीटर अंतरावर आहे. नाशिकहून हे ठिकाण जवळ आहे. मुंबई–पुण्याहूनही कळसूबाईला जाता येतं. मग यंदाच्या मान्सूनमध्ये कळसूबाईची सैर नक्की करा.

## करिअरवाटा

### प्रकाशन व्यवसाय करताना...

प्रकाशन व्यवसायाचा व्याप विस्तारत आहे. ई–बुक्स ही संकल्पना रूढ होत असली तरी पुस्तकं विकत घेऊन वाचणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. या विश्वात संहिता निवडण्यापासून पुस्तकाची विक्री करेपर्यंत अनेकांचा सहभाग मोलाचा ठरतो. या व्यवसायाचे तीन भाग करता येतील. प्रादेशिक भाषांमधील पुस्तकं काढणारे प्रकाशक हा यातील पहिला भाग. हिंदी आणि इंग्रजीतून पुस्तकं काढणाऱ्या प्रकाशकांच्या मानाने प्रादेशिक भाषांमधील पुसतकं काढणाऱ्या प्रकाशकांची कमाई कमी असते. या पार्श्वभूमीवर प्रकाशन संस्थांमध्ये प्रामुख्याने भाषिक कौशल्यं असलेल्या उमेदवारांना मागणी असते. प्रकाशन संस्थांच्या कामातला पहिला महत्त्वाचा भाग पुस्तकाची निवड हा असतो. प्रकाशकांकडे अनेक लेखकांच्या संहिता येऊन पडलेल्या असतात. मात्र त्यातली कोणती संहिता निवडावी आणि तिच्या आधारे तयार होणारं पुस्तक कितपत विकलं जाईल याचा अभ्यास करावा लागतो. म्हणून संहितेची निवड करणारा कर्मचारी किंवा समीक्षक हा प्रकाशन व्यवसायात मोक्याचा समजला जातो. आलेल्या संहितेवर संपादकाचा हात फिरतो. पुस्तक अनावश्यक मोठं होत असेल तर ते सुटसुटीत करावं लागतं. इथे उमेदवारांना चांगल्या संधी मिळतात.



## खेचाखेची

### जन्म आभाळी

खूप वर्षांपूर्वी, एक महिला विमानप्रवासात प्रसूत झाली आणि तिला मुलगी झाली. त्या बातमीचे हेडिंग होते...

'तिच्या भाळी , जन्म आभाळी.'

## वेगळं काही

रेल्वे स्थानकांवर पडलेल्या बाटल्या गोळा करून त्यापासून टी–शर्ट आणि टोप्या तयार करण्यात येणार आहेत. याआधी पाटना रेल्वे स्थानकावर हा उपक्रम राबवण्यात आला. आता देशातल्या २२५० रेल्वे स्थानकांवर मशीन बसवण्यात येणार आहे. यामुळे या बाटल्या रिसायकल करून त्याचा पुर्नवापर करता येईल. या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक स्थानकावर दररोज सरासरी ३०० बाटल्यांचं रिसायकलिंग केलं जाईल. याद्वारे ५८ हजार टी शर्ट तयार केले जातील. प्लास्टिक बाटल्यांपासून तयार केलेले टी शर्ट अधिक काळ टिकतात, असं प्लास्टिक बाटल्यांपासून टी शर्ट तयार करणाऱ्या 'बायोक्रश' या कंपनीचं म्हणणं आहे. १२ बाटल्यांपासून एक टी शर्ट बनवला जातो.

## लाईफस्टाईल

### 'पावसाळा स्पेशल' फॅशन

पावसाळ्यात पेहरावामध्ये काही बदल करावे लागतात. सहाजिकच त्यानुसार खरेदी करणं गरजेचं ठरतं. मान्सून सेलमध्ये खरेदी करताना ही बाब लक्षात घ्यावी. सेलला शक्यतो दुपारच्या वेळी भेट द्यावी. या सुमारास गर्दी कमी असल्याने वस्तूंची निवड शांतपणे करता येते. शॉपिंगवेळी हातात सहज कॅरी करता येण्यासारखी बॅग ठेवावी. त्यामुळे बॅग सावरण्यासाठी लागणारी एनर्जी वाचते आणि शॉपिंगचा थकवा जाणवत नाही. पावसाळ्यात बाहेर पडतानाशक्यतो डार्क रंगाचे कपडे परिधान करावे. कॉटन, पॉलिएस्टर, सिंथेटिक अशा प्रकारचं फॅब्रिक वापरण्याला प्राधान्य द्यावं. या दिवसात जीन्स वापरणं शक्यतो टाळावं. पावसाळ्याच्या दिवसात सर्वत्र रंगांची उधळण सुरू असते. यामुळे मेक अपचं तंत्र अवलंबताना निसर्गातला हा बदल आपल्या लूकमध्ये आणण्याचा प्रयत्न करावा. सध्या सात रंगांच्या मेक अपचा ट्रेंड आहे. यामध्ये सप्तरंगी आयशॅडो, लिपस्टिक यांची सुंदर कलाकुसर चेहऱ्यावर करु शकता. मेक अप करताना कँडी आणि मेटॅलिक कलरचा वापर करू शकता. ओठांवर या रंगांच्या उभ्या किंवा आडव्या स्ट्रीप्स काढू शकता.



## सुडोकू १३१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | ३ | | ८ | | |
| | | २ | | ४ | | | | ३ |
| ७ | | | १ | | ५ | | | ४ |
| ५ | ६ | | | | ८ | | | ९ |
| | | | ७ | | ४ | | | |
| ३ | | | ६ | | | | ५ | ७ |
| ८ | | | ४ | | १ | | | ६ |
| ४ | | | | ८ | | ३ | | |
| | | ९ | | २ | | | | १ |

**टीप –**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ६ | ७ | ३ | ९ | २ | ५ | ८ |
| २ | ५ | ८ | १ | ४ | ६ | ७ | ३ | ९ |
| ९ | ३ | ७ | २ | ८ | ५ | ४ | ६ | १ |
| ८ | ७ | २ | ३ | १ | ४ | ६ | ९ | ५ |
| ३ | १ | ९ | ५ | ६ | २ | ८ | ७ | ४ |
| ५ | ६ | ४ | १ | ७ | ८ | ३ | १ | २ |
| ६ | २ | १ | ८ | ९ | ३ | ५ | ४ | ७ |
| ४ | ९ | ५ | ६ | २ | ७ | १ | ८ | ३ |
| ७ | ८ | ३ | ४ | ५ | १ | ९ | २ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक १३१



**आडवे शब्द :–**
१) विचार न करता मनात येईल तसे बोलणे (वा.प्र.)
१०) कार्य, काम
१२) उद्याच्या नंतरचा दिवस
१३) बडबड
१४) बरोबर आलेला फौजफाटा
१६) जाळणे(प्रेत)
१८) खूण, इशारा
२०) धान्याचे जाडसर पीठ
२१) शंकराच्या डोळ्यांची संख्या
२३) सूट
२४) पर्जन्य
२६) सुगंध
२८) गणेशाची आई
२९) अंधार
३१) लाकडी जिना
३४) खुळचट, दुर्बळ माणूस
३५) अत्यंत गोड चव, बोलणे इ
३६) गव्हाची एक जात
३७) समतल
३९) पोट
४०) थुईथुई नाचणारा
४१) श्रीमंत, धनवान
४२) हा शब्द दोनदा लिहिल्यास एक मैदानी खेळ
४३) नष्ट, नामशेष
४६) अजगर
४७) फाजील अभिमान, अहंकार
४९) तुटण्यास कठीण, कडक व चिवट
५०) गणपती
५२) पूजेचे ताट
५४) रामाचे एक नाव
५५) दरवाजा
५७) हस्त
५९) जय पराजय
६१) ऐट, डौल
६२) दृष्टादृष्ट
६७) अर्धी ओंजळ
६९) प्रहर
७१) निवड न करता, एकंदरीने सर्व
७४) बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दोर
७६) पैशाशी पैसा जोडणारा, चिक्कू माणूस
७७) कपाळभर लावलेले कुंकू
७९) फुरसत
८०) सैन्य दल
८१) सबब, निमित्त

**उभे शब्द :–**
१) हजेरी
२) खंदक
३) मध्यस्थ
४) आयुष्य
५) ब्राह्मण
६) सौंदर्य लाभलेली
७) वड
८) डोके
९) रक्ताचा रंग
१०) रात्री चमचणारा किटक
११) खर्चाच्या विरुद्धची बाजू
१५) उत्तराधिकारी
१७) नांगर
१८) अखंड पडणारा पाऊस
१९) शोध, माग
२२) नूतन
२३) सगळीकडे
२५) ओहोटीच्या विरुद्ध
२७) सलोखा, मेळ, एकीकरण
२८) फार मोठी आणि पुष्कळ पापे
३०) घाण
३२) भय, दरारा, इभ्रत
३३) सेवक
३५) रतिचा पती, सुंदर पुरुष
३६) फळांपासून केलेले पेय
३८) आमंत्रण देणे, बोलाविणे
३९) गौरीहर
४१) च्या बरोबर(हिं)
४४) विपत्तीची कहाणी
४५) पत्थर
४६) येणे, येऊन पोहोचणे
४८) तसराळे
४९) राबता, जाणेयेणे
५१) अंगावर येणारा काटा
५३) मौज, एका रागाचे नाव
५६) वितरण
५८) मुलगी
६०) प्राण
६३) अळशी नावाचे धान्य
६४) मोठी जाड तलवार
६५) बाण
६६) भरीवच्या विरुद्ध
६८) मलई
७०) उंदीरासारखा एक प्राणी
७१) संपूर्ण
७२) युद्ध
७३) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
७४) शरीर
७५) ढीग
७८) चेष्टा, टिंगल

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त





# अशोक हांडे! मराठी बाणा आणि ताठ कणा

रंगबहार

**शरद कोरडे**

“मंगल गाणी दंगल गाणी“ पासून अशोक हांडे यांचे चौरंग संस्थेचा प्रवास सात ऑगस्ट १९८७ सालापासून सुरू झाला. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील उंब्रज या गावी ५जुलै १९५७ मध्ये जन्मलेले व तेथेच लहानपण गेलेले अशोक हांडे यांनी आपल्या गावाकडील अनेक प्रकारच्या लोककलांचा वारसा मिळविला. गावामध्ये तमाशाला बंदी होती; पण भजन, कीर्तन, लळीत आणि नाटक यांची परंपरा होती. लळीताचा मान हांडे यांचे घराण्यात होता व सूत्रधारपद तर त्यांच्या घरातच होते. त्यांचे आजोबा नथुजी विठोजी पाटील हांडे म्हणजे गावातील एक हुशार पण निरक्षर अवलिया होते. ते पौराणिक ग्रंथांचे अर्थ सांगत. गावातील भांडण तंटे सोडवत. सरकार दरबारातील कामे करून देत असत, आईचे माहेर म्हणजे जुन्नर तालुक्यातीलच काळवाडी हे गाव. त्याची तऱ्हा तर आणखी वेगळी होती. या गावात जत्रेला तमाशाचे फड लागत. गॅसच्या बत्त्यांच्या उजेडात हे तमाशे कालीमातेच्या मंदिरासमोर होत. हौसाबाई काळे, चंद्रकांत ढवळपुरीकर मंडळी, मंजुळा कोल्हापूरकर, दत्ता महाडिक, दादू इंदुरीकर आदी तमाशा साम्राटांचे तमाशे गावाच्या जत्रेत होत, आणि हे सारे आजोळी पाहायला अशोक हांडे यांना लहानपणी संधी मिळाली. एका बाजूला लोकनाट्य तमाशांचे वर्ग, तर दुसरीकडे भजन, कीर्तन व लळीत अशा सर्वांगीण लोककला व संस्कृतीचे पाठ लहान वयातच मिळाले. त्यांचे वडील किसनराव नाथजी हांडे हे इयत्ता सातवीला म्हणजे व्हर्निक्युलर फायनलमध्ये पुणे जिल्ह्यात दुसरे आले होते. त्यांना तलाठ्याची नोकरी चालून आली; पण, ‘तलाठी झाल्यास तर वाईट मार्गाने पैसा मिळवशील’ असे म्हणून आजोबांनी त्यांना मुंबईला हमाली करायला पाठवले. कॉफर्ड मार्केटमध्ये त्यांनी काही काळ हमाली केली, त्यानंतर त्यांना एका मीलमध्ये कामगार म्हणून नोकरी मिळाली, आणि तेथे त्यांनी मुंबईत आंब्याचा व्यवसाय सुरू केला. वृत्तीने वारकरी. त्यामुळे ‘देवाचीये द्वारी उभा क्षणभरी’ असा जीवन सिद्धांत. माऊलीची भक्ती आणि माऊलीचे कृपा हेच तत्त्वज्ञान. वडील मुंबईला आणि मुले सर्व गावाला आईजवळ अशी त्या काळजी जगण्याची अपरिहार्यता त्यांच्याकडे होती. पुढे प्राथमिक शिक्षण झाल्यावर अशोक हांडे आईसह मुंबई काळबादेवीला आले. त्यांनी रुपारेल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व शिक्षण घेत असताना त्यांनी वडिलांना आंब्याच्या व्यवसायात मदत करण्यास सुरुवात केली. कोकणातील हापूस आंबे मुंबईत आणून विकायचा व्यवसाय खूप चागला चालला. त्यामुळे आर्थिक स्थिरता आली. अशोक हांडे यांनी लहान वयातच लोककलांचे बाळकडू घेतले होते. भारुड, भजन, लळीत, नाटक असा उत्साही बाज, तर जात्यावरची गाणी, मोटेवरची गाणी, बैलगाडी वरची गाणी, शेतात काम करताना लयबद्ध गाणी, इथपासून ते उजाडता उजाडता आलेला वासुदेव, लग्नानंतरच्या जागरणात आलेली वाघ्या मुरळी गोंधळी, जोगवे, वैदेही आदी लोककलांचे शिक्षण त्यांना बालवयातच मिळाले होते; पण आत दडलेला कलावंत त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. या लोककलांवर व लोकगीतांवर आधारित दर्जेदार मराठी कार्यक्रम करायचे ठरवून त्यांनी प्रथम ‘मंगल गाणी ते दंगलगाणी’ हा कार्यक्रम रसिकांत समोर आणला. सकाळच्या भूपाळीपासून उजाडता उजाडत्या गावात येणारा वासुदेव, लग्नानंतरच्या जागरणाला आलेली वाघ्या मुरळी, गोंधळी, लमानांचे तांडे, शिवमंदिरात एकतारीवर भजन म्हणणारा साधू असा मराठी संगीताचा अस्सल बाज त्यांनी संगीत नृत्य माध्यमातून ‘मराठी बाणा’ रंगमंचावर आणला आणि प्रेक्षकांचा त्यांना उदंड प्रतिसाद मिळाला. ५०-६० कलाकारांच्या तांड्यासह महाराष्ट्रभर व अन्य प्रदेशातही अनेक कार्यक्रम झाले व ‘चौरंग’ संस्थेचे नाव सर्वत्र झाले. त्यानंतर कार्यक्रमाचा पट व विविध विषय यांच्यामुळे कलाकारांची संख्या १५० वर गेली. अनेक जुन्या-नव्या चित्रपट गीतांवर आधारित गाणे व नृत्य यांचा मेळ साधून प्रसंगी प्रोजेक्टरवर पाठीमागे दृश्य दाखवीत ‘आवाज की दुनिया’ व ‘मराठी बाणा’ या गीतनृत्यांचा अप्रतिम कार्यक्रम चौरंगने रसिकांसमोर सादर केला, आणि रसिकांना तृप्त केले. भारतातील स्वातंत्र्यसंग्रामावर आधारित क्रांतिकारकांच्या बलिदानावर व सत्याग्रहांवर व भारतीय राजकारणावर तसेच सर्व विविध स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास सांगणारा ‘आझादी ६०’ हा स्फूर्ती देणारा कार्यक्रम रंगमंचावर आणून चौरंगने आपले राष्ट्रीय कर्तव्य ही पार पाडले. कवी पी. सावळाराम यांच्या गीतांवर आधारित ‘गंगा यमुना’, लता मंगेशकर यांच्या गाजलेल्या गाण्यांवर व त्यांच्या वयाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने ‘अमृत लता’, माणिक वर्मा यांनी गायलेल्या गाण्यांवर आधारित ‘माणिक मोती’ हा कार्यक्रम सादर केला. ‘माणिक मोती’ या कार्यक्रमाचे निवेदन भक्ती बर्वे यांनी केले होते. त्यानंतर मधुबाला या हिंदी चित्रपटसृष्टीला पडलेल्या नितांत सुंदर स्वप्नांवर आधारित ‘म धुरबाला’ हा कार्यक्रम व त्यानंतर ‘गाणे सुहाने’ असे दर्जेदार कार्यक्रम अशोक हांडे यांनी रसिकांना बहाल केले. गेली तीन दशके चौरंगने आपले दर्जेदार कार्यक्रम घेऊन महाराष्ट्रभर नव्हे तर; देशाच्या कोपऱ्या-कोपऱ्यात दौरे केले. विदेशांत ही लंडन, न्यूयॉर्क, दुबई, युरोप आदी ठिकाणी गेल्या ४० वर्षांत केलेल्या कार्यक्रमांची संख्या सुमारे सात हजारांवर आहे. या सर्व कार्यक्रमांवर सोन्याचा कळस चढवला तो ‘मराठी बाणा’ या कार्यक्रमाने. या कार्यक्रमाचे मोठे नेपथ्य, कपडे पट, ध्वनी नियंत्रण, प्रकाशयोजना, मेकअप, गायक गायिका, वाद्य वृंद व तंत्रज्ञान, बॅकस्टेज वर्कर्स, कलाकार असा दीडशे माणसांचा तांडा घेऊन चौरंगने विदेश दौरेही केले. मराठी भाताचे आतापर्यंत दोन हजारांहून जास्त प्रयोग झाले आहेत. रिलायन्स इंडस्ट्रीजच्या चैनी साहेबांनी एम.टी.डी.सी.एच्या माध्यमातून एक परदेशी क्रुझ भाड्याने घेऊन मुंबई ते गोवा अशा कोकण दर्शनाचा कार्यक्रमाला आखला. यांत अनेक देशांचे राजदूत, परदेशी पाहुणे व अनेक मान्यवर व्यक्ती अशा तीनशे जणांना आमंत्रित केले होते. त्यांना आपली परंपरा, नृत्य व मराठी संस्कृतीची झलक दिसेल असा कार्यक्रम करण्याचे आव्हान चौरंगच्या हांडेंनी स्वीकारले . ‘आपली बोली आपला बाणा’ हा कार्यक्रम २३ नोव्हेंबर २००३ रोजी १०० कलाकारांना घेऊन अशोक हांडे यांनी केला व भाषा कळत नसतानाही देशो देशींच्या प्रतिनिधींनी या प्रयोगाचे तोंड भरून कौतुक केले. व हाच कार्यक्रम पुढे ‘मराठी बाणा’ म्हणून दीडशे कलाकारांसह मराठी रंगभूमीवर आला व त्याने इतिहास घडविला. मधुबाला हे हिंदी चित्रपटसृष्टीला पडलेले एक सोनेरी स्वप्न! हिला भारताची मर्लीन मेनरो म्हणून गौरविले जाते, हीच हसणं मुरडणं लाजणं या सगळ्यांवर प्रेक्षकांना घायाळ करणारी अलौकिक सौंदर्याची खाण, जी एक जागतिक दंतकथा बनलेली मधुबाला या चित्रपटसृष्टीत होऊन गेली हेच एक आश्चर्य होते. चौरंगाने तिच्या जीवनपटाचा वेध ‘मधुरबाला’ या कार्यक्रमात घेतला. अशोक हांडे यांनी गायक, वादक व प्रेक्षक या त्रिकोणाला चौथी मिती दिली. प्रत्यक्षातले वास्तव आणि चित्रपटातला आभासी वास्तव यांची नाट्यमय वळण घेत पटकथा लिहिली. मधुबालाचे यश, आनंद आणि यातना, दुःख यांचा सुरेख संगम साधून मानवी नात्यांना आगळे परिणाम दिले व मधुरबालाने कार्यक्रमाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं. अशोक हांडे यांनी चौरंगाच्या कार्यक्रमासाठी पटकथा ही कार्यक्रमाची जान आहे हे हेरून सांगितीक कार्यक्रमात निवेदन प्रभावी होण्यासाठी किस्से, शेरोशायरी, भारदस्त शब्दांकन करून आपले कौशल्य पणाला लावले व कार्यक्रम यशस्वी केले. चौरंगची ही घोडदौड अजूनही त्याच वेगाने सुरू आहे याबाबत अशोक हांडे यांना शुभेच्छा देऊया. ●●

---

# जागरूकतेची नवी पहाट



तरुणांनो, तुम्ही रोज जे खात आहात, ते सुरक्षित आहे का? हाच अंगावर काटा आणणारा प्रश्न घेऊन येतोय धाडसी चित्रपट ’द इंडिया स्टोरी : स्लो पॉइझन इन प्रोग्रेस’. आपल्या शेतीत होणारा कीटकनाशकांचा अनिर्बंध वापर आणि त्याचा आपल्या आरोग्यावर होणारा जीवघेणा परिणाम यावर हा चित्रपट थेट प्रकाश टाकतो.

ग्लॅमरच्या दुनियेपलीकडे जाऊन समाजाला अंतर्मुख करायला लावणारी एक अत्यंत महत्त्वाची कथा दिग्दर्शक चेतन डीके यांनी पडद्यावर आणली आहे. यात काजल अग्रवाल आणि श्रेयस तळपदे यांच्या तगड्या भूमिका असून, हा केवळ चित्रपट नसून लाखो लोकांच्या अस्तित्वाचा लढा आहे. झी स्टुडिओजची भव्य निर्मिती असलेला हा चित्रपट हिंदी, तेलुगू आणि तमिळ भाषेत तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात येत आहे. हा मनोरंजनाचा नवा ट्रेंड चुकवू नका,

---

# यामीचे राष्ट्रीय यश



बॉलिवूडमध्ये स्वतःच्या हिंमतीवर स्थान निर्माण करणाऱ्या तरुणाईची आयकॉन यामी गौतम हिने इतिहास रचला आहे! ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवर यामीने आपले नाव सुवर्ण अक्षरात कोरले आहे. तिचा अत्यंत गाजलेला आणि अंगावर शहारे आणणाऱ्या ’आर्टिकल ३७०’ या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा राष्ट्रीय पुरस्कार पटकावला आहे, तर स्वतः यामीला ’सर्वोत्कृष्ट अभिनेत्री’ हा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

’हा सन्मान म्हणजे केवळ एक ट्रॉफी नसून, अनेक वर्षांच्या अखंड परिश्रमाचे आणि प्रतीक्षेचे फळ आहे, हा सन्मान आयुष्यभर लक्षात राहील’ अशी भावनिक दाद यामीने सोशल मीडियावर दिली आहे. स्टारडमपेक्षा अभिनयाचा कस महत्त्वाचा असतो, हे यामीने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. दर्जेदार सिनेमा काय असतो आणि तो कसा जगला जातो, हे अनुभवण्यासाठी तरुणांनी ’आर्टिकल ३७०’ पुन्हा एकदा अनुभवायलाच हवा. यामीच्या या अभूतपूर्व आणि प्रेरणादायी यशाचा जल्लोष आता संपूर्ण सिनेसृष्टीत साजरा होत आहे!

---

# ‘रामायण’साठी साई पल्लवींची विशेष तयारी



आध्यात्मिक रूपेरी महागाथा आणि सिनेविश्वातील सर्वात भव्य आणि बहुप्रतीक्षित चित्रपट ’रामायणः पार्ट-१’ ची अधिकृत घोषणा झाली असून, दिल्लीतील ’प्रथम संकल्प’ या दैवी सोहळ्याने या महासिनेमाच्या मोहिमेला सुरुवात झाली आहे. या भव्य कार्यक्रमात सिनेसृष्टीसह आध्यात्मिक क्षेत्रातील दिग्गजांची मांदियाळी जमली होती. अभिनेता यशने यावेळी रणबीर कपूरच्या समर्पणाचे कौतुक केले, तर संपूर्ण सोहळ्याचे आकर्षण ठरली ती सीतेची भूमिका साकारणारी तरुणांची लाडकी अभिनेत्री साई पल्लवी!

दिग्दर्शक नितेश तिवारी यांनी साई पल्लवीच्या अफाट तयारीचे कौतुक केले आहे. या पवित्र भूमिकेसाठी स्वतःला मानसिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या शक्य तितके शुद्ध ठेवण्याचा अनोखा प्रयत्न केल्याचे साईने सांगितले. आजच्या ग्लॅमरस युगात भूमिकेच्या पावित्र्यासाठी घेतलेली ही मेहनत तरुणाईला थक्क करणारी आहे. भारतीय संस्कृतीचे सर्वात मोठे महाकाव्य आता नव्या पिढीसाठी अत्यंत भव्य दिव्य रूपात रुपेरी पडद्यावर येण्यास सज्ज झाले आहे.

---

# हास्याचा खळखळता झरा मराठमोळ्या विनोदाचा अफलातून जल्लोष!

## श्रमेश बेटकर

**धनंजय शेटये**

**शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी डोंबिवली येथील सर्वेश हॉल येथे सायंकाळी ७.०० वाजता सादर झालेला श्रमेश बेटकर यांचा ‘थोडं नॉटी थोडं थाटी!!’ हा मराठमोळा स्टॅण्ड-अप कॉमेडी शो रसिकांसाठी हास्याचा, आनंदाचा आणि निव्वळ मनोरंजनाचा अविस्मरणीय सोहळा ठरला. प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा कार्यक्रम हाऊसफुल्ल झाला आणि सभागृहात सुरुवातीपासून शेवटपर्यंत हास्याच्या लाटा उसळत राहिल्या.**



आजच्या धकाधकीच्या, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनात दोन तास मनमुराद हसविणे हे खरोखरच एखाद्या तपस्वी कलाकारालाच शक्य होते. श्रमेश बेटकर यांनी आपल्या विलक्षण विनोदबुद्धीच्या, तल्लख निरीक्षणशक्तीच्या आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर हे अशक्य वाटणारे कार्य सहज साध्य करून दाखवले. आबालवृद्ध प्रेक्षकांना एकाच छताखाली खळखळून हसवत त्यांनी प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंदाचे इंद्रधनुष्य फुलवले.

श्रमेश बेटकर यांच्या सादरीकरणाची खरी ताकद म्हणजे विनोदाचे अचूक टायमिंग, नेमकी शब्दफेक, मराठी भाषेवरील प्रभुत्व आणि सहजसुंदर संवादशैली. त्यांच्या प्रत्येक वाक्यातून बुद्धिमत्तेचा झरा वाहताना जाणवतो. साध्या-साध्या दैनंदिन प्रसंगांमध्येही ते असा विनोद शोधतात की, प्रेक्षक नकळत स्वतःच त्या प्रसंगांमध्ये रमून जातात आणि हास्याचा प्रचंड स्फोट घडतो. कार्यक्रमात त्यांनी केवळ विनोदच नाही तर आपल्या अभिजात वक्तृत्वकलेचा, सुरेल गायनाचा आणि दमदार नृत्याविष्काराचादेखील अप्रतिम संगम घडवून आणला. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ स्टॅण्ड-अप कॉमेडी न राहता एक संपूर्ण मनोरंजन महोत्सव बनला. त्यांच्या नृत्यातील उत्स्फूर्तता, गायनातील माधुर्य आणि अभिनयातील सहजता यामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत प्राप्त झाली. श्रमेश बेटकर यांच्या विनोदाची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे त्यांच्या राजकीय कोपरखळ्या. त्या कोणत्याही विशिष्ट व्यक्तीवर किंवा पक्षावर भाष्य करण्यासाठी नसून, समाजातील भ्रष्ट प्रवृत्ती, विसंगती आणि दांभिक मानसिकतेवर नेमके बोट ठेवणाऱ्या आहेत. अत्यंत संयम, संवेदनशीलता आणि तारतम्य राखत त्यांनी सामाजिक वास्तवावर भाष्य केले. त्यामुळे प्रेक्षक केवळ हसत नाहीत, तर अंतर्मुखही होतात. विनोदाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याची ही कला अत्यंत थोड्या कलाकारांकडे असते आणि श्रमेश बेटकर यांनी ती समर्थपणे आत्मसात केली आहे.त्यांच्या लेखनात मिश्कीलपणा आहे, निरीक्षणात सूक्ष्मता आहे आणि सादरीकरणात जिवंतपणा आहे. समाजातील विविध स्वभाव, नातेसंबंध, कौटुंबिक घडामोडी, बदलती जीवनशैली आणि मानवी स्वभावातील विसंगती यांचे त्यांनी केलेले चित्रण इतके वास्तववादी आहे की प्रत्येक प्रेक्षकाला त्यात स्वतःचे प्रतिबिंब दिसते. हाच त्यांच्या लोकप्रियतेचा खरा गाभा आहे.

संपूर्ण दोन तासांचा कार्यक्रम कुठेही रेंगाळत नाही, कंटाळवाणा होत नाही किंवा गती सोडत नाही. उलट, प्रत्येक क्षणी नवा विषय, नवा पंच, नवा विनोद आणि नवा आनंद प्रेक्षकांच्या भेटीला येत राहतो. टाळ्यांचा कडकडाट, हास्याचे फवारे, “वन्स मोअर”च्या आरोळ्या आणि सततचा लाफ्टर यामुळे सभागृह अक्षरशः दुमदुमून गेले होते. एकट्या कलाकाराच्या खांद्यावर संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी असते. दोन तास हजारो प्रेक्षकांना खिळवून ठेवणे हे खरोखरच शिवधनुष्य पेलण्याइतके कठीण काम आहे. मात्र श्रमेश बेटकर यांनी आपल्या असामान्य कलागुणांच्या बळावर हे आव्हान अत्यंत समर्थपणे पेलले. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने, अफलातून लेखनशैलीने आणि प्रभावी रंगमंचीय उपस्थितीने हा शो एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला. आजच्या काळात प्रेक्षकांना केवळ विनोद नको असतो, तर दर्जेदार, सुसंस्कृत आणि कुटुंबासह पाहता येईल असे मनोरंजन हवे असते. श्रमेश बेटकर यांचा ‘थोडं नॉटी थोडं थाटी!!’ हा कार्यक्रम या सर्व अपेक्षांवर शंभर टक्के खरा उतरतो. हास्य, व्यंग, संगीत, नृत्य, अभिनय, सामाजिक भान आणि मराठमोळा संस्कार यांचा सुरेख मिलाफ या कार्यक्रमात अनुभवायला मिळतो.

अल्पावधीतच प्रचंड लोकप्रिय ठरत असलेला हा शो भविष्यात मराठी स्टॅण्ड-अप कॉमेडीच्या क्षेत्रात एक वेगळा मापदंड निर्माण करेल, यात शंका नाही. श्रमेश बेटकर यांच्यासारख्या गुणी, अभ्यासू आणि समर्पित कलाकारामुळे मराठी मनोरंजनविश्व अधिक समृद्ध होत आहे, ही प्रत्येक मराठी रसिकासाठी अभिमानाची बाब आहे.



# बालांगण

# पावभाजीची रंजक गोष्ट



वाचा तर खरं

मित्रांनो, रस्त्याच्या कोपऱ्यांपासून एखाद्या फॅन्सी रेस्टॉरंट्सपर्यंत सगळीकडे पावभाजीचा सुगंध तुमचे लक्ष वेधून घेतो ना? असे असताना तुम्हाला सांगितले गेले की, पावभाजीचा संबंध महाराष्ट्राशी नसून अमेरिकेशी आहे तर विश्वास बसेल का?

पण हे खरं तर. तुमच्या या आवडत्या स्ट्रीट फूडच्या कथेत अमेरिकन यादवी युद्धाचा एक मनोरंजक ट्विस्ट लपलेला आहे. पावभाजीचा जन्म आपल्या मुंबईत झाला असला तरी १८६० च्या अमेरिकन यादवी युद्धाने तिची लोकप्रियता आणि गरज वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात अमेरिकेत यादवी युद्ध सुरू असताना कापसाच्या जागतिक पुरवठ्यावर वाईट परिणाम झाला होता. अशा परिस्थितीत ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतातील कापसाच्या गिरण्यांना कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवण्याचे आदेश दिले. स्वाभाविकच मुंबईतील गिरणी कामगारांना कापसाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस काम करावे लागत होते. त्यांच्या कामाच्या शिफ्ट लांबत होत्या आणि जेवायलाही जास्त वेळ नव्हता. अशावेळी त्यांना लवकर मिळणाऱ्या, पोटभर आणि स्वस्त जेवणाची गरज होती. जेवल्यानंतर लगेचच शारीरिक श्रम करावे लागत असल्यामुळे अन्न हलके असणेही गरजेचे होते. मुंबईच्या रस्त्यावरील हुशार विक्रेत्यांना ही गरज समजली आणि त्यांनी उरलेल्या भाज्या एकत्र करुन, त्यात काही मसाले घातले आणि ब्रेड रोलवर पसरवून सर्व्ह करायला सुरुवात केली. त्या काळात ते एक फास्ट फूड होते. म्हणजेच सुरुवातीला पावभाजी फक्त गिरणी कामगारांचे जेवण होती, परंतु हळूहळू तिची लोकप्रियता वाढत गेली. अनेकांनी पावभाजी हा एक सोपा आणि चविष्ट पर्याय म्हणून स्वीकारला. काही काळातच पावभाजी मुंबईच्या कानाकोपऱ्यात पसरली. करण्यास सोपी, उत्तम चव आणि कमी किमतीमुळे सर्व वर्गातील लोकांमध्ये तिची प्रसिद्ध वाढली.

# 'ओके'चा इतिहास



टेक्नो टिप्स

छोट्या दोस्तांनो, आपण सगळेच एखाद्या गोष्टीला सहमती देताना 'ओके' हा शब्द वारंवार आणि अगदी सहजतेने वापरतो. किंबहुना, जगभरात सर्वांना समजणारा हा शब्द आहे. पण याची सुरुवात एका विनोदाने झाली, हे तुम्हाला माहिती आहे का? ओके या शब्दाची उत्पत्ती समजून घेण्यासाठी आपल्याला १८३९ मध्ये जावे लागेल. तेव्हा अमेरिकन वर्तमानपत्रांमध्ये एक विचित्र ट्रेंड चालत असे. तो म्हणजे जाणूनबुजून चुकीचे स्पेलिंग वापरणे.

तर तेव्हा ओके 'ऑल करेक्ट' असे लिहिले जायचे जो 'ऑल करेक्ट' चा जाणीवपूर्वक चुकीचा लिहिलेला प्रकार होता. १९ व्या शतकात अमेरिकन वर्तमानपत्रांमध्ये या प्रकारची भाषाशैली प्रचलित होती. विनोदी लेखांमध्ये, 'ऑल करेक्ट' हे 'आल करेक्ट' असे लिहिले जात असे आणि तेच पुढे 'ओके' झाले. त्या काळात वर्तमानपत्रांमध्ये जागेची कमतरता नसली तरीही संक्षेपांचा वापर करण्याची एक फॅशन बनली होती. अर्थात १८४० ची अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक झाली नसती तर ओके हा शब्द कदाचित विसरला गेला असता. पण तो जिवंत राहिला कारण या निवडणुकीत उमेदवार मार्टिन व्हॅन ब्यूरन यांना त्यांच्या मूळ ओल्ड किंडरहूक या गावावरुन 'किंडरहूक' हे टोपणनाव मिळाले. मग समर्थकांनी त्यांच्या क्लबचे नाव 'ओके क्लब' ठेवले आणि त्याचे घोषवाक्य बनले, 'आम्ही ओके आहोत!'. आणि तेव्हापासून ओके या शब्दाला राजकीय लोकप्रियता मिळाली. लोक त्याचा अर्थ ओल्ड किंडरहूक असा मानू लागले.

ओकेच्या अर्थ आणि उत्पत्तीबद्दल नंतर अनेक भाषा सिद्धांतही समोर आले. काही लोकांनी त्याचा संबंध चोक्टॉ जमातीच्या ओके या शब्दाशी जोडले. तथापि, भाषाशास्त्रज्ञांनी नंतर सिद्ध केले की ओके हे प्रत्यक्षात 'ऑल करेक्ट' चेच संक्षिप्त रूप आहे आणि त्याची मुळे वर्तमानपत्रांमधील विनोदी लेखांशी संबंधित आहेत. तेव्हा आता ओके म्हणताना ही गंमत लक्षात ठेवा.



# आदर दाखवण्याचा योग्य उपाय

एटिकेट्स

तुम्ही अनेक लोकांना 'लेडीज फर्स्ट' म्हणताना ऐकले असेल. तुमच्यातील काही मुलगेही हा नियम पाळत असतील. याचा अर्थ महिला वा मुलींना आधी जागा देणे, असा असतो. पार्ट्यांमध्ये पुरुष पुढे जातो आणि बायकांसाठी दार उघडतो. काही जण त्यांच्यासाठी खुर्ची ओढतात तर काही जण सार्वजनिक ठिकाणी रांगेत उभ्या असणाऱ्या महिलांना पुढे येण्यास सांगतात. हे एक चांगले वर्तन समजले जाते. मात्र लेडीज फर्स्ट म्हणण्याचा ट्रेंड कुठून सुरू झाला? हे अनेकांना माहिती नसते.

छोट्या मित्रांनो, ही परंपरा युरोपपासून सुरू झाली. त्यावेळी तेथील श्रीमंत लोक महिलांचा आदर केला पाहिजे, असे मानणारे होते. त्या काळात महिलांना शारीरिकदृष्ट्या नाजूक मानले जात होते. म्हणूनच, सुरुवातीपासूनच पुरुषांना महिलांसाठी दार उघडण्यास, त्यांना पुढे जाऊ देण्यास किंवा त्यांना बसण्यासाठी खुर्ची देण्यास शिकवले जात होते. या परंपरेचा अर्थ महिलांना कमकुवत समजणे नव्हता तर त्यांना आदर आणि प्रेम देणे असा होता.

पुढे १९१२ मध्ये टायटॅनिक जहाज बुडत होते, तेव्हाही 'लेडीज अँड चिल्ड्रन फर्स्ट' म्हणत महिला आणि मुलांना बुडत्या जहाजातून प्रथम बाहेर काढण्याचे निर्देश देण्यात आले होते. ही घटनाही 'लेडीज फर्स्ट'च्या विचारसरणीला बळकटी देणारी ठरली. म्हणूनच टायटॅनिक घटनेनंतर हा शिष्टाचार मोठ्या प्रमाणात स्वीकारला गेला. आजही अनेकजण आवर्जून असे वागतात. तर मग तुम्हीही हा नियम पाळणार ना?

# बाजी राऊत
## १२ वर्षांचा अमर हुतात्मा

प्रेरणास्रोत

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यामध्ये ओडिशातील बालवीर बाजी राऊत यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी देशासाठी प्राणार्पण करणारे बाजी राऊत हे भारतातील सर्वांत लहान हुतात्म्यांपैकी एक मानले जातात. त्यांचा जन्म ५ ऑक्टोबर १९२६ रोजी तत्कालीन ढेंकानाल संस्थानातील नीलकंठपूर या गावात एका गरीब कुटुंबात झाला. लहान वयातच वडिलांचे छत्र हरपल्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. ते ब्राह्मणी नदीवर नाव चालवून आईला हातभार लावत असत. त्याच काळात ढेंकानाल संस्थानातील जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरोधात प्रजामंडळ चळवळ सुरू झाली होती. या चळवळीचा प्रभाव बाजी राऊत यांच्यावर पडला आणि त्यांनी लहान वयातच स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला.

११ ऑक्टोबर १९३८ च्या रात्री बाजी राऊत यांच्या आयुष्यातील ऐतिहासिक घटना घडली. प्रजामंडळाच्या कार्यकर्त्यांचा पाठलाग करणारे संस्थानचे सशस्त्र पोलीस ब्राह्मणी नदी ओलांडण्यासाठी त्यांच्या नावेजवळ आले. त्यांनी बाजी राऊत यांना नाव सोडण्याचा आदेश दिला. मात्र प्रजामंडळाच्या कार्यकर्त्यांना वाचवण्यासाठी आणि चळवळीशी निष्ठा राखण्यासाठी त्यांनी पोलिसांना नदी पार करण्यास ठाम नकार दिला. अवघ्या बारा वर्षांच्या या मुलाच्या धाडसाने संतप्त झालेल्या पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यामध्ये बाजी राऊत यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर इतर काही कार्यकर्त्यांनाही गोळ्या घालण्यात आल्या. या क्रूर घटनेने संपूर्ण ओडिशा हादरला आणि संस्थानातील दडपशाहीविरुद्ध जनतेचा संताप आणखी तीव्र झाला.



बाजी राऊत यांच्या बलिदानाचा देशभरात मोठा प्रभाव पडला. त्यांच्या पार्थिवावर कटक येथे हजारो लोकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ओडिशाचे प्रसिद्ध कवी सच्चिदानंद राऊतराय यांनी त्यांच्या स्मरणार्थ 'बाजी राऊत' ही दीर्घ कविता लिहिली. या कवितेमुळे बाजी राऊत यांचे शौर्य आणि त्याग अधिक व्यापकपणे लोकांपर्यंत पोहोचले. ओडिशामध्ये त्यांच्या नावाने शाळा, संस्था, रस्ते आणि विविध स्मारके उभारण्यात आली आहेत. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानाची आठवण म्हणून दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. देशभक्ती, धैर्य आणि निःस्वार्थ त्यागाचे प्रतीक म्हणून आजही त्यांचे नाव घेतले जाते. इतक्या लहान वयात देशहितासाठी मृत्यूला सामोरे जाण्याचे उदाहरण भारतीय इतिहासात अत्यंत दुर्मीळ आहे.

आजच्या पिढीसाठी बाजी राऊत यांचे जीवन प्रेरणादायी आहे. देशासाठी प्रेम, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची हिंमत आणि आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहण्याची शिकवण त्यांच्या जीवनातून मिळते. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी केवळ मोठ्या नेत्यांनीच नव्हे, तर सामान्य नागरिक आणि लहान मुलांनीही मोठे योगदान दिले, याची जाणीव बाजी राऊत यांच्या बलिदानातून होते. त्यांचे शौर्य हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक तेजस्वी पर्व आहे. देशभक्ती, निष्ठा आणि धैर्य यांचे जिवंत प्रतीक म्हणून बाजी राऊत यांचे नाव भारताच्या इतिहासात कायम अजरामर राहील.

# मैदानी खेळ खेळा



फिट राहा

आजच्या काळात मोबाईल, टॅब आणि संगणक हे आपल्या जीवनाचा भाग बनले आहेत. त्यांचा योग्य वापर केला तर अनेक चांगल्या गोष्टी शिकता येतात. पण दिवसभर मोबाईलवर गेम खेळणे किंवा व्हिडिओ पाहत बसणे हे आपल्या आरोग्यासाठी चांगले नाही. जास्त वेळ स्क्रीनसमोर बसल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो, मान आणि पाठ दुखू शकते, झोप नीट लागत नाही आणि अभ्यासातही लक्ष कमी लागते. काही मुले मोबाईलशिवाय राहू शकत नाहीत. हीच सवय हळूहळू व्यसनात बदलू शकते. त्यामुळे मोबाईलचा वापर मर्यादित वेळेसाठी आणि पालकांच्या मार्गदर्शनाखालीच करायला हवा. याउलट मैदानी खेळाने आपले शरीर आणि मन मजबूत होते. हाडे आणि स्नायू बळकट होतात. आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढते. आत्मविश्वास वाढतो. तसेच निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवल्याने मन प्रसन्न राहते. मोबाईलवरील गेममध्ये आपण एकटे खेळतो, पण मैदानी खेळांमध्ये अनेक मित्र भेटतात. मित्रांसोबत खेळताना सहकार्य, शिस्त, प्रामाणिकपणा आणि संघभावना यांसारखे चांगले गुण आपोआप विकसित होतात. त्यामुळे खेळ हा केवळ मनोरंजन नसून, तो आपल्या आरोग्याचा महत्त्वाचा भाग आहे.

रोज एक-दोन तास मैदानावर खेळण्याने मोबाईलची ओढही कमी होते. निरोगी आणि आनंदी आयुष्य जगायचे असेल तर मोबाईलचा वापर कमी करा आणि मैदानी खेळांना जास्त वेळ द्या. आजच एक संकल्प करूया- 'रोज खेळू मैदानात, राहू निरोगी आणि आनंदात!'

# भारतामधले 'जुळ्यांचे गाव'



अजब-गजब

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे आणि येथे अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या विज्ञानालाही कोड्यात टाकतात. यापैकीच एक सर्वात मोठे रहस्य म्हणजे केरळमधील मलप्पुरम जिल्ह्यातील 'कोडिन्ही' हे छोटेसे गाव. या गावाला आज जगभरात 'ट्विन टाऊन' किंवा 'जुळ्यांचे गाव' म्हणून ओळखले जाते. साधारण दोन हजार कुटुंबे किंवा लोकसंख्या असलेल्या या गावात अधिकृतपणे २२०हून अधिक जुळ्या भावंडांच्या जोड्या (सुमारे ४०८हून अधिक जुळे लोक) राहतात, तर दरवर्षी येथे साधारण १५हून अधिक नवीन जुळ्या जोड्या जन्माला येतात. या लहानशा गावाच्या लोकसंख्येपैकी जवळपास १० टक्के नागरिक हे जुळ्या भावंडांपैकी एक आहेत. त्यामुळे देश-विदेशांतील शास्त्रज्ञ, वैद्यकीय तज्ज्ञ आणि संशोधकांचे लक्ष अनेक वर्षांपासून या गावाकडे वेधले गेले आहे.

कोडिन्ही गावात प्रत्येक एक हजार जन्मांमागे सुमारे ४५ जुळ्या मुलांच्या जन्माची नोंद होते. विशेष म्हणजे कोडिन्हीतील महिलांनी बाहेरील गावातील पुरुषांशी विवाह केला किंवा गावातील पुरुषांनी इतर गावांतील महिलांशी विवाह केला, तरी अशा कुटुंबांमध्येही जुळ्या मुलांच्या जन्माचे प्रमाण तुलनेने अधिक असल्याचे निरीक्षण संशोधकांनी नोंदवले आहे. हा केवळ योगायोग नसून यामागे काही विशिष्ट जैविक किंवा पर्यावरणीय कारण असावे, अशी शक्यता व्यक्त केली जाते.

सामान्यतः जुळ्या मुलांचा जन्म हा आनुवंशिकता, आईचे वय, आरोग्य, आहार आणि इतर जैविक घटकांवर अवलंबून असतो. मात्र कोडिन्हीमध्ये दिसणारे प्रमाण खूपच वेगळे आहे. त्यामुळे आनुवंशिक, जैविक, आण्विक, वंशपरंपरागत तसेच हवामानाशी संबंधित विविध घटकांचा अभ्यास केला जात आहे. स्थानिक वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. कृष्णन श्रीबिजू यांच्या मते, अधिकृत नोंदींमध्ये २२०हून अधिक जुळ्या जोड्यांचा समावेश असला, तरी प्रत्यक्ष संख्या त्याहून अधिक असण्याची शक्यता आहे. जगातील सरासरीच्या तुलनेत कोडिन्हीमध्ये जवळपास सहापट अधिक जुळ्या मुलांचा जन्म होत असल्याने अनेक देशांतील संशोधक येथे भेट देऊन माहिती संकलित करत आहेत. तरीही या रहस्यामागील नेमके कारण शोधण्यात अद्यापि यश आलेले नाही.

कोडिन्हीची ओळख भारतातील 'जुळ्यांचे गाव' म्हणून निर्माण झाली असली, तरी या घटनेकडे अंधश्रद्धेच्या किंवा चमत्काराच्या दृष्टीने पाहिले जात नाही. उलट यामागील वैज्ञानिक कारणांचा शोध घेण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. या गावामुळे आनुवंशिकता, मानवी आरोग्य आणि जन्माशी संबंधित संशोधनाला नवी दिशा मिळाली आहे. या वैशिष्ट्यामुळे कोडिन्ही हे केरळमधील एक महत्त्वाचे पर्यटन आकर्षणही ठरत असून, अनेक पर्यटक या गावाला भेट देत आहेत. कोडिन्ही हे गाव आपल्या अनोख्या वैशिष्ट्यामुळे विज्ञान, निसर्ग आणि मानवी जीवनातील अद्भुत विविधतेचे हे एक विलक्षण उदाहरण मानले जाते.

# असं आहे खवय्यांचं शहर



नॉलेज

आपला देश विविधतेने नटला आहे. इथल्या प्रत्येक प्रांताचं एक वेगळेपण आहे. आपल्या देशातलं प्रत्येक शहरही वेगळं आहे. तिथले खाद्यपदार्थ, पर्यटनस्थळं यात विविधता आढळते. चला तर, मग सिटी ऑफ जॉय म्हणजेच कोलकाताची माहिती घेऊ.

✻ १९११ पर्यंत कलकत्ता म्हणजे आजचं कोलकाता ही भारताची राजधानी होती. व्यापाराच्या दृष्टीने या शहराचं बरंच महत्त्व असल्यामुळे ब्रिटिशांनी कोलकात्याला राजधानीचा दर्जा दिला होता. त्यानंतर दिल्ली भारताची राजधानी बनली.

✻ कोलकात्यातल्या लोकांना फूटबॉल प्रचंड आवडतं. मात्र क्रिकेटवरही त्यांचं प्रेम आहे. ईडन गार्डन्स हे जगातलं तिसरं सर्वात मोठं क्रिकेट मैदान कोलकात्यात आहे.

✻ दक्षिणेश्वर काली मंदिर, व्हिक्टोरिया मेमोरियल, मार्बल पॅलेस, फोर्ट विलियम आणि हावडा ब्रिज ही कोलकात्यातली महत्त्वाची पर्यटनस्थळं आहेत.

✻ कोलकाता हे खवय्यांचं शहर आहे. इथे चविष्ट बंगाली मिठाया मिळतात. तसंच माछेर झोल, मिष्ठी दही, गोलगप्पा इथे आवडीने खाल्ले जातात. त्यामुळे कोलकात्याला गेल्यावर हे पदार्थ चाखायलाच हवेत.

✻ कोलकात्यात पुस्तक महोत्सवाचं आयोजन केलं जातं. या महोत्सवाला लोक मोठ्या संख्येने येतात. असं हे कोलकाता पश्चिम बंगालची राजधानी आहे. देशातल्या चार महानगरांमध्ये कोलकाताची गणना होते.

# निसर्गाचे रहस्य



गप्पांगण

केळी हे एक सुपरफूड असल्याचे तुम्ही जाणत असाल. त्यामुळे केळी खाल्याने आपल्याला त्वरित ऊर्जा मिळते. शिवाय अनेक आजारांपासून शरीराचे संरक्षण करण्यास देखील याची मदत होते. स्नायूंच्या बळकटीप्रमाणेच शरीरात इलेक्ट्रोलाइट्चे संतुलन राखण्यासाठीही केळी वरदान ठरतात. हे फक्त एक फळ नाही तर गुणधर्मांचा खजिना आहे. पण केळी थोडीशी वाकलेली का असतात, याचा तुम्ही कधी लक्षात घेतले आहे का? मुलांनो, त्यामागे निसर्गाचे एक रहस्य लपलेले आहे. म्हणूनच सरळ-चपटी केळी क्वचितच दिसतात. केळीच्या वाकड्यापणाचे सर्वात मोठे कारण म्हणजे 'फोटोट्रॉपिझम' म्हणजेच वनस्पतींचा सूर्याकडे झुकणे हे आहे. केळीचे झाड फळे देण्यास सुरुवात करते तेव्हा कळ्या खाली वाकलेल्या असतात. म्हणजेच फळाची सुरुवातीची वाढ गुरुत्वाकर्षणाच्या दिशेने होते. फळ वाढू लागताच केळीमधल्या पेशी सूर्यप्रकाशाकडे वाकू लागतात. ही एक नैसर्गिक प्रक्रिया असते ज्यामध्ये फळ हळूहळू वरच्या दिशेने वाढू लागते. अशा परिस्थितीत सूर्याकडे झुकल्यामुळे केळी सरळ होण्याऐवजी वरच्या दिशेने वाकलेली आणि वाकडी दिसतात.

## दोस्त हे मस्त

### एंजल शार्क



एंजल शार्क नावाचा एक प्राणी आहे. काळा समुद्र, भूमध्य समुद्र आणि नॉर्दन अटलांटिक समुद्र या भागात हा शार्क आढळतो. एंजल शार्कची मोठ्या प्रमाणावर शिकार होत आहे. त्यामुळे त्यांची संख्या कमी होत चालली आहे. भूमध्य समुद्र तसंच इतर भागात खूप कमी शार्क दिसतात. सध्या शार्कची ही प्रजाती वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## खादाडी

### चविष्ट बिस्किट केक



तुम्ही बिस्किटांचा केक बनवू शकता. यासाठी हाईड अँड सिक बिस्किटांचा एक पुडा घ्या. पारले जीचाही पुडा घ्या. दोन चमचे साखर, अर्धा चमचा बेकिंग पावडर, एक कप दूध, व्हॅनिला इसेन्स आणि चमचाभर बटर हे साहित्य घ्या. आता दोन्ही बिस्किटं मिक्सरमध्ये वाटून घ्या. बारीक पूड करा. ही पूड एका बाऊलमध्ये काढून घ्या. त्यात दूध आणि साखर घालून नीट मिक्स करा. यात बेकिंग पावडर आणि व्हॅनिला इसेन्स घाला. आता केकचा ट्रे घ्या. त्यावर बटर लावा. त्यावर हे मिश्रण ओता. आता हा ट्रे मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. पाच मिनिटांनी काढा. तुमचा बिस्किट केक तयार आहे.

## स्टडी टिप्स

### लागा अभ्यासाला



हळूहळू परीक्षेचे वेध लागतील. आता तुमचा अभ्यास वाढू लागला असेल. त्यामुळे अभ्यासाचा जोर लावायला हवा. आता अभ्यासाचं नियोजन करून कामाला लागा. सकाळी लवकर उठून अभ्यास करा. यासाठी मोबाईलवर अलार्म लावा. अलार्म वाजल्यावर उठा. जवळ कॅलेंडर ठेवा. महत्त्वाच्या दिवसांची नोंद करून ठेवा. कोणत्या विषयाचा अभ्यास किती वेळात होईल हे बघा. त्यानुसार नियोजन करा.

## योगा टाईम

### एकाग्रता वाढवणारं बालासन



आपली एकाग्रता वाढवायला हवी. योगासनांमुळे तुम्ही लक्ष केंद्रित करू शकता. बालासन हा प्रकार खूपच उपयुक्त आहे. बालासन म्हणजे लहान मुलांप्रमाणे डोकं जमिनीवर टेकवणं. या आसनामुळे एकाग्रता वाढते. भरपूर अभ्यास करण्यासाठी तुमची बुद्धी तल्लख व्हायला हवी. बालासनामुळे हे शक्य होतं.

# भारतीय भूमीवर रंगणार अ‍ॅशेसचा थरार?

## १५० व्या वर्षपूर्तीनिमित्त क्रिकेट ऑस्ट्रेलियाची भव्य योजना

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

प्रसिद्ध टी-२० स्पर्धा बिग बॅश लीग भारतात आयोजित करण्याच्या निर्णयानंतर, क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आता एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलण्याचे संकेत दिले आहेत. क्रिकेट जगतातील सर्वात जुनी आणि प्रतिष्ठित मानली जाणारी अ‍ॅशेस कसोटी स्पर्धा भविष्यात भारतात आयोजित करण्याचा मानस क्रिकेट ऑस्ट्रेलियाचा असल्याचे समोर आले आहे. सीएचे टॉड ग्रीनबर्ग यांनी या शक्यतेचा पुनरुच्चार करताना, जागतिक क्रिकेटमध्ये भारतीय क्रीडा बाजारपेठेचे वाढते अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले आहे.



ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात पुढील वर्षी मार्च महिन्यात ऐतिहासिक पहिल्या कसोटी सामन्याच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष कसोटी सामना खेळवला जाणार आहे. सध्याच्या नियोजनानुसार हा सामना ऑस्ट्रेलियाच्या बाहेर आयोजित करण्याचा कोणताही थेट प्रस्ताव नसला, तरी भविष्यात भारतात असा ऐतिहासिक सामना आयोजित करण्याच्या पर्यायाचा गांभीर्याने विचार केला जाऊ शकतो, असे ग्रीनबर्ग यांनी स्पष्ट केले.

क्रिकेट ऑस्ट्रेलिया सध्या भारतीय प्रेक्षक आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यासाठी वेगाने पावले उचलत आहे. याच रणनीतीचा भाग म्हणून यंदाच्या डिसेंबर महिन्यात बिग बॅश लीगचा एक सामना चेन्नई येथे खेळवला जाणार आहे.

या लढतीत मेलबर्न रेनेगेड्स आणि पर्थ स्कॉचर्स हे दोन तगडे संघ आमनेसामने असतील. ऑस्ट्रेलियन क्रिकेटला भारतीय चाहत्यांच्या अधिक जवळ आणण्याच्या दृष्टीने हा एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे.

### १५० वर्षांची ऐतिहासिक परंपरा

अ‍ॅशेस ही क्रिकेट इतिहासातील सर्वात जुनी आणि रोमांचक स्पर्धा मानली जाते, ज्याची सुरुवात १८७७ मध्ये झाली होती. दरम्यान, २०२७ मध्ये खेळल्या जाणाऱ्या पुरुष आणि महिला अ‍ॅशेस मालिकेचे नवे वेळापत्रक नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. या दोन्ही मालिका इंग्लंडच्या भूमीवर एकाच वेळी खेळवल्या जाणार आहेत. यासोबतच, क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच मिक्स डिझॅबिलिटी अ‍ॅशेस (दिव्यांग अ‍ॅशेस) मालिकेचे आयोजनही याच काळात होणार आहे.

भारतात अ‍ॅशेस कसोटीच्या आयोजनाची शक्यता ही देशातील क्रिकेट बाजारपेठेची प्रचंड व्यावसायिक ताकद दर्शवते. भारत हा सध्या जगभरात क्रिकेटचा सर्वात मोठा प्रेक्षकवर्ग असलेला देश आहे.

अशा परिस्थितीत ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमधील महामुकाबला भारताच्या भूमीवर आयोजित केल्यास, त्यातून क्रीडारसिकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण होईलच, शिवाय मोठ्या व्यावसायिक संधींचे नवे दरवाजेही उघडतील.

ग्रीनबर्ग यांनी स्पष्ट केले की क्रिकेट ऑस्ट्रेलिया या कल्पनेला पूर्णपणे नकार देणार नाही. यासाठी त्यांनी इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्ड आणि भारतीय क्रिकेट नियामक मंडळ यांच्यासोबत असलेल्या मजबूत व्यावसायिक व मैत्रीपूर्ण संबंधांचा हवाला दिला.

बीबीसीच्या स्टंप्ड या पॉडकास्टशी बोलताना ग्रीनबर्ग म्हणाले, इंग्लंड आणि भारत या दोन्ही क्रिकेट बोर्डांशी आमचे संबंध अत्यंत सौहार्दाचे आहेत. भारतीय बाजारपेठेत अधिक क्रिकेट सामने सादर करण्यासाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत, यात शंका नाही. सध्या आम्ही असा कोणताही सामना तातडीने आयोजित करण्याचे नियोजन करत नसलो, तरी भविष्यात यावर नक्कीच विचार केला जाईल.

जगातील इतर भागांतील क्रिकेटच्या कलापेक्षा ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि भारत यांच्यातील कसोटी क्रिकेट आजच्या घडीलाही अत्यंत लोकप्रिय आणि मजबूत स्थितीत आहे. म्हणूनच ही परंपरा अधिक समृद्ध करणे आणि वाढवणे हे आमचे ध्येय आहे.

कॅलेंडरमधील मर्यादित वेळेबाबत बोलताना ते पुढे म्हणाले, जागतिक क्रिकेटसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे वर्षातील ३६५ दिवसांचे मर्यादित वेळापत्रक. आपल्याला ज्या प्रकारचे दर्जेदार सामने आयोजित करायचे आहेत, त्यासाठी कदाचित वर्षात आणखी एक-दोन महिन्यांची गरज भासेल.

## अर्जेंटिना फुटबॉल अध्यक्षांची चौकशी?

**ब्युनोस आयर्स :** अर्जेंटिना फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष क्लॉडिओ टापिया यांची लाखो डॉलर्सच्या प्रायोजकत्व निधीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात अमेरिकेच्या फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनकडून चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे. अशी कोणतीही चौकशी झाली नसल्याचा खुलासा अर्जेंटिना फुटबॉल संघटनेने केला आहे. विश्वकरंडक स्पर्धा संपल्यानंतर अर्जेंटिनाचा फुटबॉल संघ अमेरिकेतून चार्टर्ड विमानाने मायदेशी रवाना होण्याच्या तयारीत असताना हा प्रकार घडल्याचे वृत्त आहे. सोशल मीडियावरील वृत्तांनुसार, विमानात जाण्याच्या काही क्षणांअगोदर अर्जेंटिना फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष क्लॉडिओ यांची चौकशी करण्यात आली आणि त्यांचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला. अमेरिकन बँकांमार्फत लाखो डॉलर्सचा प्रायोजकत्व निधी कथितरीत्या मनी लॉंड्रिंगसाठी वापरण्यात आल्याच्या आरोपांसंदर्भात एफबीआयने चौकशी केल्याचे सांगितले जात आहे.

## निवडक

### सिंधू, आयुषकडून निराशा

**चांगझो :** भारताची तारांकित बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू आणि आयुष शेट्टी यांनी चीन खुल्या स्पर्धेत (सुपर १००० दर्जा) विजयाची संधी दवडली. सिंधू आणि आयुषने अनुक्रमे चार आणि तीन मॅच पॉइंटची संधी वाया घालवली. या दोघांसह लक्ष्य सेनलाही पराभवाचा सामना करावा लागल्याने चीन खुल्या स्पर्धेत भारताचे आव्हान दुसऱ्या फेरीतच संपुष्टात आले.सिंधूला चीनच्या चेन युफेईकडून तीन गेमपर्यंत चाललेल्या सामन्यात २१-१६, २०-२२, १८-२१ अशा फरकाने पराभव स्वीकारावा लागला. सिंधूने गेल्याच आठवड्यात जपान बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते आणि तिच्याकडून पुन्हा चमकदार कामगिरीची अपेक्षा होती. पहिल्या गेममध्ये ७-१३ अशा पिछाडीनंतर सिंधूने १६-१६ अशी बरोबरी साधली. यानंतर सलग पाच गुणांची कमाई करत तिने पहिला गेम जिंकला.दुसऱ्या गेममध्ये सिंधूकडे २०-१६ अशी भक्कम आघाडी होती. मात्र, त्यानंतर तिने निराशाजनक कामगिरी केली. टोक्यो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या चेनने दमदार पुनरागमन करताना गेम जिंकला. मग निर्णायक तिसऱ्या गेममध्ये १७-१७ अशी बरोबरी असताना चेनने खेळ उंचावत बाजी मारली.पुरुष एकेरीच्या लढतीत एनहात एन्गुएनने आयुषला १५-२१, २१-१३, २२-२० असे पराभूत केले. निर्णायक तिसऱ्या गेममध्ये आयुषकडे २०-१७ अशी आघाडी होती. मात्र, यानंतर एन्गुएनने अनुभव पणाला लावत सलग पाच गुण कमावले आणि सामन्यात बाजी मारली. अन्य लढतीत, कॅनडाच्या व्हिक्टर लाइने लक्ष्यवर २१-१९, २१-११ अशी मात केली.

### भारतीय संघ घरच्या मैदानावर पाहुणा

**नवी दिल्ली :** भारतीय संघ श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली सप्टेंबर महिन्यात अफगाणिस्तानविरुद्ध तीन ट्वेंटी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. हे सामने १३, १५ आणि १७ सप्टेंबर रोजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळवले जातील. पण, घरच्या मैदानावर खेळणारा भारतीय संघ मालिकेत पाहुणा म्हणून उतरेल. कारण, या मालिकेचे आयोजन अफगाणिस्तान क्रिकेट बोर्ड करणार आहे. वेळापत्रकात काही बदल न झाल्यास, ही मालिका क्रिकेटच्या इतिहासात एक अनोखा विक्रम प्रस्थापित करेल.क्रिकेट इतिहासात प्रथमच भारतीय संघ घरच्या प्रेक्षकांसमोर पाहुणा म्हणून खेळल. अफगाणिस्तानकडे सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी कायमस्वरूपी घरचे मैदान नाही आणि सुरक्षेच्या कारणांमुळे गेल्या अनेक वर्षांपासून ते भारतात आंतरराष्ट्रीय सामने खेळत आहे. अफगाणिस्तान संघाने यापूर्वी ग्रेटर नोएडा, डेहराडून आणि लखनौ येथे आपले घरचे सामने खेळले आहेत. पण, भारतीय संघाविरुद्ध त्यांनी कधीही यजमानपद भूषवलेले नाही. त्यामुळे सप्टेंबरमधील ट्वेंटी-२० मालिका ऐतिहासिक ठरेल.भारतीय संघ ऑगस्ट महिन्यात श्रीलंका दौऱ्यावर दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी जाणार आहे. पहिली कसोटी १५ ऑगस्टला, तर दुसरी कसोटी २३ ऑगस्टपासून खेळवली जाईल. त्यानंतर दोन आठवड्यांच्या विश्रांतीनंतर भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध मैदानात उतरेल. ही मालिका आशियाई स्पर्धेच्या तयारीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरेल. आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेट सामने १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान होतील.

## आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६; क्रिकेट स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर

### भारत पुरुष-महिला संघ थेट उपांत्यपूर्व फेरीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ साठी क्रिकेट स्पर्धेचे ड्रॉ आणि गट गुरुवारी जाहीर करण्यात आले. भारतीय पुरुष आणि महिला संघांनी थेट नॉकआउटमध्ये स्थान मिळवले आहे. यावेळी क्रिकेट स्पर्धेतील सर्व सामने जपानमधील नागोया येथे टी-२० फॉरमॅटमध्ये खेळले जातील.महिला क्रिकेट स्पर्धेचे आयोजन १७ ते २२ सप्टेंबर दरम्यान केले जाईल. त्यानंतर पुरुष क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबरपासून सुरू होईल आणि १ ऑक्टोबरपर्यंत चालेल.



२०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेट स्पर्धेत एकूण १० संघ भाग घेतील. भारताव्यतिरिक्त बांगलादेश, पाकिस्तान आणि श्रीलंकेला थेट उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळाले आहे. तर, अफगाणिस्तान, हाँगकाँग, जपान, मलेशिया, नेपाळ आणि ओमानचे संघ प्राथमिक फेरीत खेळतील. या ६ संघांना २ गटांमध्ये विभागले जाईल. दोन्ही गटांतील टॉप २-२ संघ म्हणजेच एकूण ४ संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचतील.

येथे त्यांची लढत आधीच पात्र ठरलेल्या ४ संघांशी होईल. महिला क्रिकेट स्पर्धेत एकूण ८ संघ सहभागी होतील. या स्पर्धेची सुरुवात थेट उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांनी होईल. भारतीय संघ आपल्या पहिल्या सामन्यात जपानचा सामना करेल.

## भारताचा श्रीलंकेवर २११ धावांनी विजय



**। कोलंबा। वृत्तसंस्था ।**

भारताच्या १९ वर्षांखालील संघाने श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या युवा कसोटी सामन्यात २११ धावांनी शानदार विजय मिळवत दोन सामन्यांची मालिका १-० अशी आपल्या नावावर केली. कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारतीय युवा खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजी अशा दोन्ही विभागांत धडाकेबाज कामगिरी केली.

भारताची सुरुवात मात्र चांगली झाली नव्हती. सलामीचे दोन्ही फलंदाज खातेही न उघडता बाद झाले. पण त्यानंतर कुशाग्र ओझा, कर्णधार यशवर्धन चौहान आणि मनाल चौहान यांनी डाव सावरला. मनाल आणि कुशाग्र यांच्यात चौथ्या विकेटसाठी १५५ धावांची महत्त्वाची भागीदारी झाली. त्यांच्या जोरावर भारताने पहिल्या डावात ४११ धावा केल्या.

लक्ष्याचा पाठलाग करायला आलेला श्रीलंकेचा संघ भारतीय गोलंदाजांसमोर टिकू शकला नाही. संपूर्ण संघ केवळ १४८ धावांत बाद झाला. त्यामुळे भारताला पहिल्या डावात २६३ धावांची मोठी आघाडी मिळाली.दुसऱ्या डावात भारताने पुन्हा आक्रमक फलंदाजी केली. लक्ष्य राजेश रायचंदानीने नाबाद शतक झळकावत १०० धावा केल्या, तर मनाल चौहानने नाबाद ५१ धावांची खेळी केली. भारताने ३ बाद २०८ धावांवर डाव घोषित करत श्रीलंकेसमोर ४७२ धावांचं मोठं लक्ष्य ठेवलं.मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने काही काळ झुंज दिली. कर्णधार विमथ दिनसरा आणि सेनुजा वेकुनागोडा यांनी अर्धशतके झळकावली. मात्र भारतीय गोलंदाजांनी वेळोवेळी विकेट्स घेत श्रीलंकेचा डाव २६० धावांवर रोखला. भारताकडून रोहित यादवने दुसऱ्या डावात सर्वाधिक ४ बळी घेतले, तर सी. वेंकटने ३ विकेट्स मिळवल्या. अखेर भारताने २११ धावांनी सामना जिंकत दोन सामन्यांची कसोटी मालिका १-० अशी आपल्या नावावर केली.

## जॉस बटलरने ख्रिस गेलचा विक्रम मोडला!

**नवी दिल्ली :** इंग्लंडचा यष्टिरक्षक-फलंदाज जॉस बटलर याने ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये मोठ्या विक्रमाला गवसणी घातली. ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये बटलरने युनिव्हर्स बॉस ख्रिस गेल याला मागे सोडून जगात दुसरे स्थान पटकावले. द हंड्रेड ट्वेंटी-२० लीगमधील मँचेस्टर सुपर जायंट्स आणि लंडन स्पीरिट यांच्या लॉर्ड्सवर झालेल्या सामन्यात बटलरने हा विक्रम नोंदवला.



बटलरने या सामन्यता १ चौकार व १ षटकारासह ११ चेंडूंत १६ धावाच केल्या, परंतु तरीही गेलचा विक्रम मोडण्यासाठी त्या पुरेशा ठरल्या. बटलर आता ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा जगातील दुसरा फलंदाज आहे. त्याने ४८७ ट्वेंटी-२० सामन्यांत १४६.७४ च्या स्ट्राईक रेटने १४५७२ धावा केल्या आहेत. त्यात ९ शतकं व १०२ अर्धशतकं आहेत. वेस्ट इंडिजचा दिग्गज फलंदाज गेल ट्वेंटी-२०त सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता, परंतु सहकाही किरॉन पोलार्डने त्याचा हा विक्रम मोडला. पोलार्डच्या नावावर ७४६ सामन्यांत १५१.०२ च्या स्टआईक रेटने १४८०३ धावा आहेत आणि त्यात २ शतकं व ७० अर्धशतकांचा समावेश आहे. गेल आता ४६३ सामन्यांत १४५६२ धावांसह तिसऱ्या क्रमांकावर गेला आहे. पण, ट्वेंटी-२०त सर्वाधिक २२ शतकांचा विक्रम अजूनही त्याच्याच नावावर आहे.

## झिनेदिन झिदान लवकरच फ्रान्स संघाचे प्रशिक्षक

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

दिदिअयर देशाँ यांनी फ्रान्स फुटबॉल संघाच्या प्रशिकपदाची सूत्रे खाली ठेवल्यानंतर त्या ठिकाणी माजी दिग्गज खेळाडू आणि मार्गदर्शक झिनेदिन झिदान यांची नियुक्ती केली जाण्याची शक्यता अधिक आहे. लवकरच ही घोषणा केली जाणार आहे.



पॅरिस येथे पत्रकार परिषद घेऊन दिशाँ यांच्या उत्तराधिकाऱ्याची घोषणा करण्यात येईल, असे फ्रान्स फुटबॉल संघटनेने जाहीर केले आहे.५४ वर्षीय झिदान २०२१ पर्यंत रेयाल माद्रिद क्लबचे प्रशिक्षक होते. त्यानंतर ते कोणत्याही क्लब किंवा संघाशी संबंधित नव्हते. २०१६ ते १९ या कालावधीत त्यांच्या मार्गदर्शनाखाली रेयाल माद्रिदने सलग तीनदा चॅम्पियन्स लीगचे विजेतेपद मिळवले होते.

देशाँ हे १४ वर्षे फ्रान्स संघाचे प्रशिक्षक राहिले आहेत. या विश्वकरंडक स्पर्धेत फ्रान्सचा संघ स्पेनकडून उपांत्य सामन्यात पराभूत झाल्यानंतर त्यांनी प्रशिक्षकपद सोडले. देशाँ यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रान्सने २०१८मध्ये विश्वविजेतेपद मिळवले होते. २०२२मध्ये उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. २०१६मध्ये घरच्या मैदानावर त्यांना युरोपियन अजिंक्यपद (युरो) जिंकता आले नव्हते.

## डब्ल्यूटीसीच्या अंतिम सामन्याची तारीख जाहीर

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ चक्रातील अंतिम सामन्याच्या ठिकाणाची आणि तारखांची अधिकृत घोषणा केली आहे. पुढील वर्षी होणारा हा बहुचर्चित अंतिम सामना इंग्लंडमधील लंडन येथील ऐतिहासिक द ओव्हल मैदानावर खेळवण्यात येणार असून तो ९ जून ते १३ जून २०२७ या कालावधीत रंगणार आहे.




आयसीसीने गेल्या वर्षीच इंग्लंडला सलग तीन वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम सामने आयोजित करण्याचे हक्क दिले होते. त्यानुसार २०२७, २०२९ आणि २०३१ या तीनही स्पर्धांचे यजमानपद इंग्लंडकडे राहणार आहे. प्रत्येक अंतिम सामन्यासाठी कोणते मैदान निवडायचे, याचा निर्णय इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्ड घेणार आहे.

द ओव्हल मैदानावर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना होण्याची ही दुसरी वेळ ठरणार आहे. यापूर्वी २०२३ मध्ये याच मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव करत विजेतेपद पटकावले होते.

गुणांच्या टक्केवारीच्या आधारे ऑस्ट्रेलिया सध्या ८७.५० टक्के गुणांसह अव्वल स्थानावर आहे. त्यांनी आतापर्यंत खेळलेल्या आठपैकी सात कसोटी सामने जिंकले आहेत. गतविजेता दक्षिण आफ्रिका ७५ टक्के गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर कायम आहे. न्यूझीलंडने ७२.२२ टक्के गुणांसह विजेतेपदाच्या शर्यतीत मजबूत उपस्थिती कायम ठेवली आहे. तर मे महिन्यात पाकिस्तानला २-० अशा फरकाने पराभूत केल्यानंतर बांगलादेशाने ५८.३३ टक्के गुणांसह अंतिम फेरीच्या स्पर्धेत दमदार दावेदारी निर्माण केली आहे.

दोन वेळा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या भारताचा संघ सध्या ४८.१५ टक्के गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. भारताने आतापर्यंत नऊपैकी चार कसोटी सामने जिंकले आहेत. श्रीलंका ४१.६७ टक्के गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

इंग्लंडची स्थिती मात्र सध्या फारशी समाधानकारक नाही. इंग्लंड २४.३६ टक्के गुणांसह सातव्या, वेस्ट इंडिज १५ टक्के गुणांसह आठव्या, तर पाकिस्तान ८.३३ टक्के गुणांसह नवव्या स्थानावर आहे. अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी या तिन्ही संघांना आगामी मालिकांमध्ये सातत्यपूर्ण आणि मोठे विजय मिळवणे अत्यावश्यक ठरणार आहे.

## लॉन बॉल्स प्रकारात भारताची आगेकूच

**। ग्लासगो । वृत्तसंस्था।**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या पहिल्या दिवशी, गुरुवारी भारताने लॉन बॉल्स प्रकारात विजयी सलामी दिली. महिला दुहेरी विभागात भारताने अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत टायब्रेकमध्ये माल्टाचे आव्हान परतवून लावले.



रुपा राणी तिर्की आणि पिंकी सिंह जोडीने वर्चस्वपूर्ण सुरुवात करताना पहिला सेट जिंकला. त्यानंतर रेबेका लुइस रिक्सन आणि कॉनी-ली रिक्सन या माल्टाच्या जोडीने झुंजार पुनरागमन करताना दुसरा सेट जिंकत एकूण लढतीत बरोबरी साधली. त्यानंतर झालेल्या टायब्रेकमध्ये भारतीय जोडी पिछाडीवर होती. मात्र, अखेरच्या प्रयत्नात अचूक फेक करत त्यांनी सामना आपल्या बाजूने फिरवला.

भारताच्या चारसदस्यीय महिला संघाने २०२२च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावले होते. त्या संघात तिर्की आणि पिंकी या दोघींचाही समावेश होता. यंदा चारसदस्यीय संघांची स्पर्धा वगळण्यात आली आहे. यावेळी केवळ पुरुष आणि महिला एकेरी व दुहेरी प्रकारातील लढती होणार आहे. लॉन बॉल्समध्ये, कर्णधार आणि सर्वांत अनुभवी खेळाडू स्कीप ही भूमिका बजावतो. हाच खेळाडू सामन्याची रणनीती आखण्यासह प्रत्येक एंडमधील शेवटचे दोन चेंडू टाकतो. एका सेटमध्ये पाच एंड असतात. लीड हा पहिला खेळाडू असतो. मॅट ठेवण्याची जबाबदारी त्याच्यावर असते आणि लक्ष्याच्या शक्य तितक्या जवळ चेंडू पोहोचवण्याचा तो प्रयत्न करतो. त्यानंतर स्कीप खेळाची सूत्रे हाती घेतो.

### सूर्यवंशीची विश्वविक्रमी खेळी | झिम्बाब्वेचा सात गड्यांनी पराभव

## हरारेत भारताची विजयी सलामी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या विश्वविक्रमी अर्धशतकाच्या जोरावर भारताने झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत विजयी सलामी दिली. हरारे येथे झालेल्या पहिल्या टी-२० सामन्यात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने सात सामन्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर विजयाची चव चाखली.

या विजयासह टीम इंडियाने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. १२५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशीने वादळी अर्धशतक झळकावत इतिहास रचला आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नवा विश्वविक्रम आपल्या नावावर केला.



हरारेच्या मैदानातील पहिल्या टी-२० सामन्यात श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला. मयांग यादव आणि प्रिन्स यादव या जलदगती गोलंदाजांनी आपल्या कर्णधाराचा निर्णय सार्थ ठरवताना सुरुवातीलाच यजमानांना धक्क्यावर धक्के दिले. १४ व्या षटकातील पहिल्या चेंडूवर ६४ धावांवर यजमान संघाचा अर्धा संघ तंबूत म घारी फिरला होता. पण अखेरच्या षटकात रायन बर्ल, वेस्ले मधेव्हेर आणि विकेट किपर बॅटर ताडीवनाशे मरुमानी याने केलेल्या नाबाद २७ धावांच्या खेळीच्या जोरावर झिम्बाब्वेच्या संघाने निर्धारित २० षटकात ७ विकेट्सच्या मोबदल्यात १२५ धावा केल्या होत्या. टीम इंडियाकडून मयांक आणि प्रिन्स यांनी प्रत्येकी २-२ तर शिवम दुबे आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी १-१ विकेट आपल्या खात्यात जमा केली.

झिम्बाब्वे दिलेल्या अल्प धावसंख्येचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवा खराब झाली. अभिषेक शर्मा ८ चेंडूत एक धाव करून बाद झाला. पण दुसऱ्या बाजूला वैभव सूर्यवंशीनं आपल्या भात्यातील फटकेबाजीचा खास नजराणा पेश केला. त्याने १८ चेंडूत अर्धशतक झळकावले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)